
# स्त्री-संत प्रभावळ



डॉ. सौ. वीरा मांडवकर

जाणवून दिले आहे. काही प्रमाणात आपापल्या तत्कालीन स्त्रीजीवनाचे प्रतिनिधित्व करीत, आपल्या खडतर जीवनाला तोंड देत, भक्तिरसाचा अद्‌भुत स्रोत आपल्यामधून या स्त्रीसंतांनी पाझरवत ठेवला.

वीरशैव संप्रदायातील भावंडीबाई व इतर महिला, दक्षिणेची मीरा - अक्कमहादेवी, राजस्थानातील मीराबाई, मारवाडातील श्रीराणाबाई, काश्मीरची लल्लेश्वरी, महाराष्ट्रातील महदंबा ते वेणाबाई अशा विविध प्रांतातल्या सुमारे सव्वाशे स्त्रियांचा उल्लेख स्त्रीसंतपरंपरेत केला जातो. याचा अर्थ असा नव्हे की, एवढ्याच स्त्रीसंत संतत्वाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या आहेत. सर्वच संत महिलांचे लेखन आपल्यापर्यंत आलेले असेल आणि प्रत्येक स्त्रीसंताने आपले अनुभव लिहून ठेवलेले असतीलच असे नाही. सुमारे सव्वाशे स्त्रीसंतांचा साहित्यप्रपंच थोड्याफार प्रमाणात उपलब्ध आहे. या संत महिलांचे साहित्य काहीशा प्रमाणात त्या त्या प्रदेशाची, लोकजीवनाची, तत्कालीन रूढीपरंपरांची आणि त्यांच्या संतत्वाची वाटचाल कशी झाली, यावर प्रकाश टाकणारे आहे.

विविध प्रकारच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीतून आलेल्या या स्त्रीसंतांपैकी काही विदुषी जन्मदत्त अध्यात्माचा, भक्तीचा, हठयोगाचा, तत्वज्ञानाचा वारसा घेऊन आलेल्या आहेत. काहींना धर्मपरायणतेच्या, वैराग्यशीलतेच्या गुणांनी प्रभावीत केले आहे. त्यांना लग्न, संसार यांसारख्या गोष्टींमध्ये स्वारस्य दिसत नाही. त्यामुळे स्त्रीच्या जीवनात आवश्यक समजल्या जाणाऱ्या या घटनांना विरोध करण्यासाठी



ISBN 978-81-925945-7-6

स्त्री–संतांचा व त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा
थोडक्यात परिचय करून देणारा संशोधनपर ग्रंथ

# स्त्री-संत प्रभावळ

## प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर

***वक्रतुंड एंटरप्रायजेस***
सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी
कोल्हापूर ४१६ ०१०
भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९
ISBN 978-81-925945-7-6

ISBN 978-81-925945-7-6

- स्त्री–संत प्रभावळ
- (Stree-Sant Prabhaval)
- © डॉ. वीरा मांडवकर

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

- नवीन आवृत्ती ३ नोव्हेंबर २०२२
- प्रती १०००
- प्रकाशक
  वक्रतुंड एंटरप्रायजेस
  सौ. अपर्णा अनिल मोहिते
  सुतारमाळ, जिव्हाळा कॉलनी
  कोल्हापूर ४१६ ०१०
  भ्रमणध्वनी : ९८९०६३०८४९

- मुद्रक
  दमयंती एजन्सी, कोल्हापूर

- मुखपृष्ठ
  भरत यादव
  कोल्हापूर

- मूल्य २१० रुपये

# स्त्री–संत प्रभावळ

## स्त्रीसंतपरंपरा

संतपरंपरेचा अभ्यास करताना स्त्रीसंतांना कमी लेखून चालणार नाही. अनेक स्त्रिया कार्यकर्तृत्वामुळे आणि आध्यात्मिक साहित्यरचनानिर्मितीमुळे संतपदाला पोचल्या. भारतीय संतपरंपरा दीर्घ, व्यापक अशी आहे. समग्र संतांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणे म्हणजे विशाल स्वरूपातील ग्रंथनिर्मिती ठरू शकते व संशोधनही अतिशय व्यापक करणे अपरिहार्य ठरेल. म्हणून येथे निवडक स्त्रीसंतपरंपरेचा आणि स्त्रीसंतांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला आहे.

'स्त्री हे आदिम शक्तीचे रूप आहे. भारताच्या इतिहासात स्त्रीला तिचा आत्मगौरव आणि समानता प्राप्त करून देण्यात स्त्रीसंतांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असे आहे.'[१] महाराष्ट्राची संतपरंपरा पाहिल्यास पुरुषसंतांप्रमाणेच स्त्रीसंतांनीही भरीव कार्य केल्याचे दिसून येते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील विविध क्षेत्रांतील या स्त्रियांचे कार्य म्हणजे आजच्या स्त्रीपुरुष समानतेच्या काळातही पीडित जीवन जगणाऱ्या स्त्रियांसाठी एक आशादायी किरण आहे. भक्तीच्या, अध्यात्माच्या क्षेत्रात आपले अनुभव व्यक्त करून आपल्यातील वेगळेपण स्त्रीसंतांनी

# अनुक्रमणिका

स्त्रीसंतपरंपरा / ३
१. आद्य कवयित्री : महदंबा / ९
२. विद्युल्लतेची कडी : संत मुक्ताबाई / १८
३. गोमंतक स्त्री संत : सोंसूबाई / २९
४. आळवार वैष्णवी : संत अंडाळ / ३५
५. जनाबाई / ४०
६. शिवशरणी संत : अक्कमहादेवी / ४६
७. मधुराभक्तीचा उत्कट आविष्कार : मीराबाई / ५१
८. सोशिकतेच्या मूर्ती : संत सखूबाई / ५७
९. संत सोयराबाई / ६३
१०. चोखोबांच्या शिष्या : संत निर्मळा / ६९
११. योगसाधनांच्या प्रणेत्या : संत तरिगोंडा वेंकम्बा / ७२
१२. परम विठ्ठलभक्त : संत कान्होपात्रा / ७६
१३. विरागिनी मठाधिपती : संत वेणाबाई / ८२
१४. वीरशैव संत कवयित्री भावंडीबाई / ८८
१५. निर्भय विठ्ठलभक्त : संत भागूबाई / ९४
१६. संत बाइयाबाई उर्फ बयाबाई रामदासी / ९८
१७. परम उत्कट भक्त : संत प्रेमाबाई / १०३
१८. अद्भुत गुरुभक्तीचा आविष्कार : संत बहिणाबाई / १०७
समारोप / ११७
संदर्भ / १२३



त्यांना संघर्ष करावा लागला आहे. लोकजीवनातील व व्यावहारिक जगातल्या सर्वमान्य गोष्टी नाकारण्यासाठी या स्त्रियांना बंडखोरी करावी लागली आहे. तरीही बहुतेक स्त्रीसंत 'पूर्वसंचितानुसार वाट्याला आलेल्या 'स्थानी' राहून त्या स्थानानुसार यथोचित कर्मे करून 'फलाशा न धरता कर्मे करीत राहणे' या गीतेच्या शिकवणुकीनुसार आयुष्यात धडपडल्या.'[२]

गिरिधारी गोपालकृष्णामध्ये आपल्या जीवनातील सर्व नाती सामावणाऱ्या मीराबाईच्या जीवनाचा व साहित्याचा परिचय कोणाला नाही? अशा स्त्रियांची बंडखोरी, संघर्ष करण्याची त्यांची आत्मिक शक्ती आणि परमेश्वराशी संवाद साधताना भाषेतून व्यक्त होणारी करुणा, अनन्यागतिकता यांचे संमिश्रण अतिशय काव्यमय आहे. एकाच व्यक्तिमत्त्वातील या दोन परस्परविरोधी भावनांचे साधलेले एकत्रीकरण म्हणजे बिंबप्रतिबिंबाचा मनोज्ञ असा आविष्कार आहे. 'या संत स्त्रियांच्या साहित्यातून स्त्रीत्वाचे चित्रण तर झालेले आहेच; पण तत्कालीन समाजरूढी, धर्मकल्पना, समाजामध्ये स्त्रीला मिळणारे दुय्यम स्थान त्यामुळे तिच्यासमोर प्रश्नांनी घेतलेले उग्र रूप व त्यातून तिने शोधलेला आत्मोन्नतीचा मार्ग याचे चित्रण झाल्याशिवाय राहत नाही.'[३] यांतून सर्वसामान्य स्त्रियांनाही प्रेरणा देणाऱ्या गोष्टी समोर येताना दिसतात. प्रत्येक स्त्रीसंतांची वैयक्तिक व कौटुंबिक जीवनचरित्रे, तिच्या कुटुंबाची सामाजिक व आर्थिक स्थिती, तिच्या सभोवताली असलेले संप्रदाय या सगळ्यांचा विचार तिच्या या संतत्वाशी निगडित आहे. त्याचे स्वरूप तिच्या साहित्यातून, तिने निवडलेल्या विषयांमधून, तिच्या साहित्यातील

भाषेवरून उपमारूपकादी अलंकारांवरून आणि काढलेल्या निष्कर्षांवरून समजून येते.

महाराष्ट्रातील स्त्रीसंतांच्या साहित्याचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, या साहित्यिका संख्येने पन्नास-पंचावन्न भरतील. त्यात समाजातील उच्चनीच सर्व थरांतील महिलांचा समावेश आहे. उदा. मराठीतील आद्य कवयित्री म्हणून संबोधल्या जाणारी महदंबा, ज्ञानदेवादी आत्मसाक्षात्कारी संतांची धाकटी बहीण मुक्ताबाई व तुकारामशिष्या बहिणाबाई यांसारख्या काही संत स्त्रिया उच्चस्तरीय समाजातून परमात्म्याच्या भक्तीकडे वळल्या आहेत. नामयाची दासी जनी, चोखामेळ्याच्या कुटुंबातील त्याची पत्नी सोयराबाई व बहीण निर्मळा या समाजातील तळागाळातल्या असूनही उच्चकोटीची आध्यात्मिक उन्नती साधलेल्या या स्त्रिया, कान्होपात्रेसारखी स्त्री त्यात समाजाच्या दृष्टीने तिरस्करणीय अशा व्यवसायातून आलेली, अशा विविध सामाजिक उच्चनीचतेमुळे व त्यांच्या संप्रदायाच्या प्रभावामुळे त्यांच्या देवावर विसंबण्याच्या वृत्तीतही वेगळेपणा दिसतो.

ज्ञानदेव-नामदेवांनी जी समानतेची शिकवण समाजात रुजविण्याचा प्रसार सुरू केला होता, तो या संत स्त्रियांनी किती सखोलपणे आत्मसात केला आहे, याचे प्रत्यंतर या स्त्रीसंतांच्या साहित्यातून येते. तसेच आपण जगात एकटे नाही, देव सदैव आपला पाठीराखा आहे, अशा श्रद्धेमुळे त्यांच्या भावना प्रकटीकरणातील प्रामाणिकपणा मन मोहविणारा आहे. कोणत्याही बंडखोरीची सुरुवात ही आधी शब्दांनी होते आणि नंतर ती कृतीतून साकार होते. या दृष्टीने आपल्या जीवनातील



व्यथा व आपल्यावरचे अन्याय या स्त्रिया शब्दांतून मांडू लागल्या, हा या काळचा महत्त्वाचा विशेष आहे.

महिला संतांनी दिलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांच्या अभंगरचनांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. 'साडेतीनशे वर्षांपूर्वी एका स्त्रीने आख्यान लावणे, अभंग रचणे, ते गाणे हे पापच मानले जाई. त्या काळात या स्त्री संतांनी ईशस्तुतीचा आपला मार्ग सोडला नाही.'[४] त्यांच्या स्वानुभवाधिष्ठित काव्याने मराठी साहित्य संपन्न झाले. या विविध समाजातील स्त्रीसंतांची समतातत्त्वे पारमार्थिक क्षेत्रातील जातिवर्णभेदाच्या सीमा पार करून गेली. वेदवंचित तळागाळातील, कष्टकरी वर्गातील स्त्रीसंतांनी नामस्मरणाचा, नामघोषांचा वसा देऊन आत्मजागृती केली. वारकरी दिंड्यांमध्ये डोक्यावर पाण्याचा हंडा व तुळशी वृंदावन घेऊन महिला पुरुषांच्या बरोबरीने वारी करू लागल्या. महिलांमधील नामस्मरणाने भक्तीच्या वृद्धीबरोबरच क्षुद्र देवतांचे पूजन हळूहळू कमी होत गेले. नवस, बळीप्रथा आदींचे अडाणी महिलांतील अंधविश्वासाचे प्रकार कमी होऊन पंढरीच्या वारीची, निष्काम भक्तीची सुरुवात झाली. 'मुक्ताई ते बहिणाई या महिला संतांनी समाजाच्या उपेक्षित, तळागाळातील, कष्टकरी स्त्रीवर्गात जे परिवर्तन घडविले, तेच त्यांचे सामाजिक योगदान आहे.'[५]

- प्रा. डॉ.सौ. वीरा मांडवकर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

आचारधर्माचे उल्लंघन करून केसोबास दुपारी झोपला असता महदंबेने त्याची चांगलीच कानउघाडणी केली होती. महदंबा स्वभावतःच जिज्ञासू होती. धर्मासंबंधी, तत्त्वज्ञानासंबंधीच्या चर्चेत ती हिरिरीने भाग घेई. विविध प्रकारचे प्रश्न विचारून आपली जिज्ञासापूर्ती करून घेत असे. तिच्या ह्या अशा स्वभावामुळेच 'चक्रधरांनी 'म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काही पुसतचि असे :' अशी तिची स्तुती केली आहे. नागदेवाचार्य 'म्हातारी धर्मरक्षक : प्रीतिरक्षक : सुहृदत्वे दुःख-निर्वेदु :' अशा शब्दांत तिचे गुणवर्णन करतात.'[१]

महदंबेने आयुष्यभर चक्रधरस्वामींची सेवा करून पंथाला मार्गदर्शन केले व मोक्षपदाला पोचली; म्हणून नागदेवाचार्य तिच्या मृत्युसमयी तिला उद्देशून म्हणतात, 'रूपै, पहिल्या दिसापासौनि सेवटील दिसापर्यंत देवो तुवाचि धरला असे.' ('स्मृतिस्थळ' २५४)

शीघ्र व उत्स्फूर्त कवित्व हे महदंबेचे खास वैशिष्ट्य होते. महदंबेचे 'धवळे' व 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही मराठीतील पहिली कथाकाव्ये होत. तिने चक्रधरांवर आणि नागदेवाचार्यांवर उत्स्फूर्तपणे काही ओव्याही रचल्या आहेत. महदंबेचे 'धवळे' अतिशय प्रसिद्ध आहे. ह्याच काव्याने महदंबेला 'मराठीतील आद्य कवयित्री' म्हणून मान मिळवून दिला. ह्या काव्यामुळे महदंबेचे महानुभाव पंथात



# १. आद्य कवयित्री : महदंबा

(इ.स. १२४२–१३१२ किंवा इ.स. १२२८–१३०३)

भारतात अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या. त्यांच्यापैकी बहुतेक स्त्रिया परमार्थमार्गाकडे वाटचाल करणाऱ्या होत्या. पूर्वी परमार्थ हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय होते. त्या काळात स्त्रीसंतांनी पुरुषांच्या बरोबरीने साधना केली आणि आत्मबलाच्या जोरावर समानताही मिळवली. या आत्मबलामुळेच त्यांना लौकिक जीवनात अधिकार व प्रतिष्ठा प्राप्त झाली.

महाराष्ट्रातील मध्ययुगीन संतांच्या चळवळीने स्त्रीला फार मोठे वरदान दिले. त्यांचे कार्यकर्तृत्व केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नाही तर सामाजिक क्षेत्रातही प्रकर्षाने जाणवते. 'तत्कालीन समाजात अभिप्रेत असलेल्या स्त्री-प्रतिमा नाकारून या संतांनी मुक्त स्त्रीची नवी प्रतिमा उभी केली व जनमानसात बिंबविली.'[६] अशाच अनेक संतांपैकी प्रामुख्याने नाव घ्यावे लागेल ते महदंबेचे. महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांचे अनेक शिष्य होते. त्यांना स्वामींनी उपदेश केला होता. दीक्षा म्हणजेच शिष्यत्व प्रदान केले होते. त्यांपैकी प्रमुख नावे म्हणजे नागदेवाचार्य, नाथोबा वाईदेव, केशवराज उर्फ केसोबास, पंडित दामोदरबास, हिराइसा, भास्करभट्ट बोरीकर इत्यादी. या सर्व प्रमुख

शिष्यांमध्ये अधिकाराने, ज्ञानाने, भक्तीने आणि सद्गुरुशरणतेने विशेष प्रकाशाने शोभून दिसणारी श्रीचक्रधरस्वामींची पट्टशिष्या म्हणजे महदाइसा उर्फ महदंबा.

महदाइसा उर्फ महदंबा ही आद्य कवयित्री म्हणून ओळखली जाते. तिचा जीवनकाल काही अभ्यासकांच्या मते शके ११६४ ते १२३४ तर काहींच्या मते शके ११५० ते १२२५ असा आहे. महदंबेचे पणजोबा देवगिरीच्या महादेवराव यांच्या दरबारातील एक प्रतिष्ठित व्यक्ती होते. त्यांच्या पत्नीचे नाव महदाइसा. ही महदाइसा महदंबेची पणजी होती. महदाइसा हिला भविष्यकथनाची सिद्धी आहे, अशी महादेवरायांपासून सर्वांची श्रद्धा होती. देवगिरीच्या राजघराण्याचे पौरोहित्यदेखील तिच्याकडे होते. अशा ह्या दैवी गुणसंपन्न असलेल्या महदंबेची पणती महदाइसा हिचे मूळ नाव रूपाई होते. महदंबा हे तिच्या पणजीच्या नावावरून श्रीचक्रधरांनी ठेवलेले नाव होय. 'पणजीप्रमाणेच अखंड जागृतता, सतेज बुद्धिमत्ता, विलक्षण चौकस बुद्धी, अलौकिक प्रतिभा ही गुणसंपदा तिच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने आढळून येते. पणजीचे गुण तिच्या पणतीत पूर्णत्वाने आले आणि या 'पणती'च्या 'काव्यज्योती'ने मराठी भाषेचे प्रांगण उजळून गेले.'[७]

महानुभाव पंथातील पंचकृष्णांपैकी चौथा अवतार गुंडमराऊळ म्हणजे श्रीगोविंदप्रभू आणि पाचवा



अवतार चांगदेव राऊळ म्हणजे श्रीचक्रधरस्वामी होत. महदंबेचा सहवास श्रीचक्रधरांशी आणि श्रीगोविंदप्रभूंशी तसेच पंथाचे आद्य आचार्य श्री नागदेवाचार्य, जे महदंबेचे चुलत भाऊ होते, त्यांच्याशी अधिक आला. त्यामुळेच 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ' इत्यादी त्यांच्या चरित्रग्रंथांमधून महदंबेच्या चरित्राविषयी विशेष उल्लेख आढळतो.

महदंबेचा विवाह बालपणातच झाला. दुर्दैवाने लवकरच तिला वैधव्य प्राप्त झाले. त्यामुळे ती परत माहेरी येऊन राहू लागली. लहानपणापासूनच तिच्यावर धार्मिक संस्कार होते. ती अतिशय श्रद्धाळू होती. पुढे तिचा श्रीचक्रधरस्वामींशी संबंध आला. तिने त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. चक्रधरस्वामींची ती अतिशय मनापासून सेवा व भक्ती करीत असे. आपल्या भक्तीतून व सेवेतून तिने समर्पणाचा विचार मांडला आहे. 'ज्याला आपण गुरू मानतो, त्याला सर्वस्व अर्पण केले पाहिजे, असे तिचे (पंथीय) विचार होते.'[८]

महदंबा जशी विदुषी होती, तसेच तिचे व्यक्तिमत्त्व कलासंपन्न होते. रांगोळ्या काढण्यात ती कुशल असून चांगली सुगरणही होती. काशीयात्रेला जाण्यापूर्वी तिने चक्रधरांना श्वेतउपहार दिला होता. पंथाभिमानी म्हणून तिचा लौकिक होता. सोबतच स्पष्टवक्ती म्हणून पंथातल्या लोकांवर तिचा चांगला वचकही होता. आपल्या पंथाच्या

तत्कालीन सामाजिक चालीरीतींचे ज्ञान होते.

'*धवळे* ह्या काव्यात जिवंतपणा आहे, चैतन्य आहे, स्त्रीहृदयाचा एक सहज हुंकार आहे. आधीच श्रीकृष्ण चरित्र सर्वांना आकर्षित करणारे, त्यात गुरुस्वरूप असलेल्या गोविंदप्रभूंचा आदेश व त्याच्या जोडीस स्वतः स्त्री असल्याने स्त्रीसुलभसहजतेने रुक्मिणीच्या भावभावनांचे शब्दचित्रण करण्यात महदंबेला विलक्षण यश मिळाले आहे.'[१२]

एकूणच कथानिवेदन, व्यक्तिचित्रण, प्रसंगनिर्मिती, भावदर्शन आणि स्वभावचित्रण या सर्वच दृष्टींनी महदंबेचे धवळे सहजतेने फुलले आहे. यात कुठेही अतिउत्साह, आक्रमकता नाही. उपमा, उत्प्रेक्षांच्या फुलांचे ताटवे नाही. लखलखाट, चकचकाट नाही. प्रखर, डोळे दीपवणारे वर्णन नाही. पण या सर्वांवर मात करणारा साधेपणा, सौम्यपणा आहे. भगभगीत उजेड फेकणाऱ्या वीजेच्या दिव्यापेक्षा निरांजनाची शूचिता आपल्याला मोहवते, तद्वतच हे महदंबेचे 'धवळे' आपल्याला सुखावते. 'प्रसंगचित्रण आणि व्यक्तिचित्रण ही कथाकाव्याची दोन प्रमुख अंगे. धवळ्यांच्या ठिकाणी या दोन्ही अंगांच्या बाबतीत अकृत्रिम साधेपणा हा प्रमुख गुण आहे.'[१३]

महदंबेच्या जीवनात सारेकाही अनुकूल असताना त्या परिस्थितीत समाधान न मानता रूढ सामाजिक चौकटीबाहेर पडून स्वतःची वाट शोधणारी महदंबा ही



विशेष स्थान निर्माण झाले.

'धवळे' म्हणजे विवाहाप्रसंगी म्हणावयाची गाणी. श्रीगोविंदप्रभूंच्या सहवासात एक दिवस भिक्षेस जात असताना रस्त्यात तिला बाशिंग घेऊन जाणारी एक तेलीण दिसली. महदंबेने गोविंदप्रभूंसाठी एक बाशिंग मागितले. महदंबेने ते बाशिंग गोविंदप्रभूंच्या श्रीमुगुटी बांधले, काकण बांधले, हळद लावली. श्रीप्रभूंच्या सांगण्यावरून लग्नाची सर्व तयारी सुरू झाली. फक्त नवरी मुलगी ठरवावयाचे राहिले. तेथे ईश्वरनायक होते ते म्हणाले,

''गोसाव्यांना विवाहाची इच्छा होत असल्यास मी आपली कन्या त्यांना देईन.''

त्यांनी प्रभूंना आपली मुलगी स्वीकारण्याची विनंती केली. तेव्हा श्रीप्रभू विवाहासाठी नटले, सजले. लग्न झाले नाही; पण अवघ्या लोकांच्या जेवणावळी झाल्या. मग महदाइसेने धवळे गायीले.

गोसावी म्हणाले, 'काहीतरी गाणे म्हण.'

तेव्हा महदंबेने विचारले, 'कोणते गाणे म्हणू?'

यावर गोसावी म्हणाले, 'कृष्ण रुक्मिणीचे गाणे म्हण.'

अशारीतीने महदाइसेने श्रीप्रभूंच्या उत्तेजनाने धवळे रचले आणि गायीले. यात एकूण ८४ (काहींच्या मते ८३) धवळे आहेत. या धवळ्यांतून तिने श्रीकृष्ण रुक्मिणीच्या

लग्नाची म्हणजे रुक्मिणी स्वयंवराची कथा सांगितली आहे. हा धवळ्यांचा पूर्वार्ध आहे. पुढे म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांनी 'आम्ही दोघे शब्द घडवू, तुम्ही ते गा' असे म्हटल्यामुळे त्यांच्या उत्तेजनाने धवळ्यांचा उत्तरार्ध रचला गेला. महदंबेने धवळ्यांचा उत्तरार्ध रचल्यामुळे त्याचे श्रेय म्हाइंभट, लक्ष्मींद्रभट व महदंबा अशा तिघांकडे जाते. उत्तरार्धातील धवळ्यांची संख्या ६४ (काहींच्या मते ६३) असून धवळ्यांच्या पूर्वार्धात रुक्मिणीस्वयंवराचा प्रसंग व उत्तरार्धात त्याचे निवेदन आढळते.

धवळ्यांमध्ये प्रारंभी सर्वेश्वराला वंदन केले आहे. धवळ्यांत अनेक प्रसंग भागवतातीलच आहे; पण महदंबेने त्यांना आपल्या पद्धतीने रंगवून त्यात नावीन्य आणले आहे. कृष्णाचे रुक्मिणीसह द्वारकेस आगमन, नगरप्रवेश इत्यादी प्रसंग स्वाभाविक वाटतात. एकूणच कथानकाला वेग आहे, सहजसुंदरता आहे. 'साधे वर्णन, साधी भाषा व साधे भाषाविकार असूनही एखादे काव्य हृदयंगम कसे होते, याचा धवळे हा उत्कृष्ट आदर्शच म्हटला पाहिजे.'[१०]

'धवळे' या काव्याचा पूर्वार्ध 'प्रासंगिक काव्य' या काव्यप्रकारातच मोडतो. गोविंदप्रभूंच्या विवाहाच्या प्रसंगाने याची निर्मिती झाली असली तरी काव्याचे बारकाईने समालोचन करताना असे दिसते, की श्रीकृष्ण रुक्मिणीचे विवाहगान



करीत असताना महदंबेने अगदी सहजपणे पारंपरिक विवाह भावनांशी स्वतःला गुंतवून न घेता तिच्या मनात श्रीकृष्णाविषयीच्या असलेल्या भावनेला भक्तीच्या एका वेगळ्या व उदात्त स्तरावर नेले आहे. रुक्मिणीच्या रूपाने परब्रम्ह स्वरूप प्राप्त झाल्याचे, त्याचा साक्षात्कार झाल्याचे समाधान या काव्यात तिने स्पष्टरूपात व्यक्त केले आहे.

'महदंबेच्या कथेत वास्तविक शृंगाररसाला कितीतरी वाव होता, पण या संपूर्ण कथेत शृंगाराच्या शिरावर भक्तिरस थयथय नाचताना दिसतो.'[११] महदंबा ही पूर्णतः कृष्णभक्तीत रंगलेली आहे. तिच्या काव्यगायनाचा हेतू श्रीकृष्णाविषयीचा आपला भक्तिभाव अभिव्यक्त करण्याचा आणि ही कथा ऐकणाऱ्याच्या मनात तो रुजवायचा आहे. हे श्रीकृष्णचरित्र ऐकून भक्तांना परमश्रेष्ठ गती प्राप्त व्हावी अशी तिची अपेक्षा आहे. त्यामुळे या काव्यातील रसमयता श्रीकृष्णभक्तीला संवर्धित करण्याच्या दृष्टीने पोषक अशीच झाली आहे.

महदाइसेच्या काव्यातील सर्व पात्रांची व व्यक्तिचित्रांची भाषा यादवकालीन विशुद्ध मराठी बोलीभाषा आहे. त्यामुळे धवळ्यातील स्वयंवर कथेमधून त्या काळातील अस्सल महाराष्ट्रीय जीवनाचे, यादवकालीन बोलीभाषेचे स्पष्ट दर्शन घडते. लग्नातील विविध विधी – जसे रुखवंत, पोशाख, खाद्यपदार्थ, जेवणावळी, वधुवरांची आभूषणे यांमुळे

तिला एक विलक्षण प्रकारचे समाधान वाटू लागले. दुःखाचा विसर पडला आणि अंतःकरणात आनंदाच्या ऊर्मी उसळू लागल्या. जणू ती आता आनंदाचे लेणे ल्यायली होती. ती जीवन्मुक्त झालेली होती.’[१५] या जीवनमुक्ततेमुळेच जगातील सर्व दुःखे पचविण्याचे सामर्थ्य या भावंडांमध्ये निर्माण झाले होते.

या सर्व विपरीत परिस्थितीतून मार्ग काढून आत्मज्ञानाच्या उत्तुंग शिखरावर पोचताना ज्ञानेश्वरांना सर्व भावंडांपेक्षा जे वलय प्राप्त झाले, त्याच्या सावलीत इतर भावंडांची कामगिरी काहीशी धूसर झालेली आहे यात शंका नाही. ‘त्या दिव्य तेजाच्या प्रभेत असणारा, करून अकर्ता, भोगून अभोक्ता असा सद्गुरू निवृत्तिनाथच धूसर झाला आहे. कुठल्याही प्रसंगी आपल्या सद्गुरूचे ऋण न विसरणारे, केल्यासवरल्याचे सर्व श्रेय त्यांच्या चरणी अर्पण करणारे ज्ञानदेव, ‘नभ तुजमाजी खेळे लपाथपी’ म्हणून खेळकरपणे आपल्या श्रीगुरूचा आकाशाएवढा महिमा सांगणारे ज्ञानदेव, आपल्या सद्गुरूला विश्वात्मक देवाची महानता देणारे ज्ञानदेव, निवृत्तिसुत म्हणविणारे ज्ञानदेव, अठराव्या अध्यायात ‘गीतार्थाची मुक्तमुदी । लाविये माझ्या वाग्वृद्धी ।।’ अशी प्रार्थना करणारे वाग्चातुर्यकार ज्ञानदेवाचा ‘निखळ सोने झालास तरी परिसाचे घर्षण कशाला मागतोस?’ असे सांगणारा अलौकिक गुरू अखेरपर्यंत अलौकिकच राहतो. सर्व भावंडांचे



मराठी साहित्यातली एक विलक्षण स्त्री म्हणावी लागेल. ‘प्रथम चक्रधरांच्या सान्निध्यात व नंतर त्यांच्या स्मरणात तिने आपल्या आध्यात्मिक प्रवासाचे एक एक पुढचे टप्पे गाठले व आगळ्या स्त्रीप्रतिमेचा नमुना तिने उभा केला.’ [१४]

❖❖❖

# २. विद्युल्लतेची कडी : संत मुक्ताबाई

(इ.स. १२७९ – १२९७)

मुक्ताबाईंचा जन्म शके १२०१ (इ.स. १२७९) मध्ये झाला. अवघे १८ वर्षांचे आयुष्य त्या जगल्या. अत्यल्प आयुष्यात बालपणातले निरागसपण लवकर मागे टाकून सद्गुरूच्या अनुग्रहाने स्फुल्लिंग प्राप्त झाल्याबरोबर योगमार्गाचा अंतिम चरण झपाट्याने चढून जाणारी मुक्ताई वीजेचा कल्लोळच म्हणावी, अशी आहे. सीता ही धरणीमातेच्या उदरातून जन्मली व तिच्या उदरातच तिची अखेर झाली. तसेच काहीसे मुक्ताबाईंकडे पाहताना वाटते. ती जणू तेज, जणू आग, जणू प्रकाश. पावसाळ्यात लख्खकन चमकून जाणारी वीज आपल्या क्षणभराच्याच अस्तित्वाने सारा आसमंत उजळवून टाकते, तसेच मुक्ताबाईंचे जीवन पारमार्थिक मनाला ज्ञानाच्या प्रकाशाने उजळवून टाकते. अशी ही वीज अल्पकाळातच आकाशात नाहीशी झालेली दिसून येते.

मुक्ताबाईंच्या लौकिक जीवनापासून कोणीही अनभिज्ञ नाही. 'संन्याशाची पोरटी' अशी जन्मल्याबरोबर उपाधी मिळाल्यावर पुढचे जीवन कसे असणार, याची कल्पना कदाचित निवृत्ती, सोपान, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई या चारही भावंडांना आली असणार; म्हणूनच लहान वयातच ही भावंडे जणू पूर्वजन्मीचेच ज्ञान घेऊन आलेली दिसतात.



बालवयातले कोवळेपणही सरायच्या आधी मातापित्यांचा वियोग सहन करावा लागला. केविलवाणे पोरकेपण वाट्याला आले. सारे कुटुंब बहिष्कृत म्हणून जीवन जगत असताना आईबापांचे मोडके छत्रही डोक्यावरून नाहीसे झाल्यावर या भावंडांचे या अफाट जनसागरात अदृश्य देवाशिवाय कोण होते?

आईवडिलांनी देहान्त प्रायश्चित्त घेतल्यावर लहानग्या मुक्ताईने हे दुःख कसे पचविले? निवृत्तिनाथांच्या प्रेमळ करस्पर्शाने तिला ही शक्ती मिळाली. आपल्या मातापित्यांचे दिसेनासे होण्याचे कारण जाणणाऱ्या निवृत्तीने मुक्ताईला हाक मारली आणि तिला म्हणाला, ''चल, मी तुला एक गंमत दाखवतो.''

आईबाबा दिसत नसल्यामुळे सैरभैर झालेली चिमुकली मुक्ताई म्हणाली, ''कसली गंमत? मला आईबाबाच हवेत.''

तरीही निवृत्तीने तिचे बोट पकडून तिला इंद्रयणीच्या तीरावर आणले आणि म्हणाला, ''मी तुला एक गोष्ट सांगतो.''

'मुक्तेने सिद्धेश्वरासन्मुख बसून हात जोडून नमन केले. तेवढ्यातच निवृत्तीने मुक्ताबाईच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवून तिच्यात आपली योगशक्ती संक्रमित केली. थोड्याच वेळात मुक्ताबाईने डोळे उघडून पाहिले.

जो शुद्ध भावाने साधना करतो त्याला देव दूर नाही. सद्गुरुनाथांनी हे ज्ञान आम्हाला दिले, पण आम्ही कोणाला शिकवणार? आपला अधिकार आमच्यापेक्षा मोठा आहे, म्हणून लडिवाळपणे आम्ही तुम्हाला विनंती करीत आहे.

'तुम्ही तरोनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'

ताटीच्या अभंगांतून मुक्ताईच्या जीवनातील लौकिक, पारमार्थिक सीमा अस्पष्ट होत असतानाच चांगदेवांच्या प्रसंगात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील तेज झळाळून उठताना दिसते. ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून चौदाशे वर्षांच्या तपाची पुण्याई असलेला तपोनिधान चांगदेव ज्ञानदेवांच्या भेटीची इच्छा मनात धरून तसे त्यांना कळविण्याविषयी लिहू इच्छितो; पण ज्ञानदेवांचे वय व त्यांचा अधिकार यांचा विचार करून पत्रात आशीर्वाद की नमस्कार लिहावा याचा संभ्रम पडल्यामुळे काहीही न लिहिता पत्र कोरे पाठवतो. हे पाहून ज्ञानदेव, निवृत्ती स्तिमित होतात; पण मुक्ताई मात्र या प्रसंगी परखड प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसते. ती म्हणते, 'चौदाशे वर्ष तप करूनही हा योगी पत्रासारखा कोराच राहिला आहे.' तिच्या या एकाच वाक्याने चांगदेवाचा चौदाशे वर्षांचा तप मोडीत निघालेला दिसतो.

प्रत्यक्ष भेटीच्या प्रसंगात ज्ञानदेवांच्या अलौकिक योगसामर्थ्याने चकित झालेला चांगदेव निवृत्ती, ज्ञानदेवांना



सोने करून त्यांना जगदुद्धाराची प्रेरणा देणारा श्रीगुरू निवृत्ती शेवटी एक परिसच राहणं पसंत करतो.'[१६]

जो सर्वश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचा गुरू आहे तोच असा अंधारात, मग मुक्ताबाई, जिने कधी आपले अस्तित्वही स्वतःसाठी मानले नाही, जिचे जीवित फक्त परमार्थप्राप्तीसाठीच उपयोगात आले, जिच्या लौकिक जीवनाला कधी तिने स्वतःही प्रदर्शित केले नाही, तिचा प्रकाश ज्ञानदेवांसमोर दिसू शकला नाही यात नवल ते काय?

पण अशा या तेजाच्या वावटळीतही एका सणकाडीने आपले अस्तित्व टिकवून ठेवावे असे मोठेपण मुक्ताबाईमध्ये आहे. वारकरी संतांना ती सणकाडीप्रमाणे भासली. 'लहानशी मुक्ताबाई जैशी सणकाडी ।
केले देशोधडी महान संत ।।'
असे त्यांना म्हणावेसे वाटले.

मुक्ताबाईने आपल्या ज्ञानाने उच्च पातळी गाठली होती. तिचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. भक्तीतून परमार्थ साधणे हेच ध्येय वारकरी संप्रदायाचे होते. त्याला तीही अपवाद नाही. म्हणूनच मुक्ताबाई स्वजीवनात रमत नाही. 'आपल्या काव्यसृष्टीतून तिने व्यक्तिगत जीवन हद्दपार केले. तसेच बाह्यजीवनालाही मज्जाव केला. व्यक्तिगत जीवनाचा निसटताही उल्लेख तिच्या अभंगसृष्टीत नसतो. जीवनातील घटनांचे अन्वयार्थ

लावण्याच्या भरीस ती पडत नाही. तसेच द्वंद्वात्मक जीवनातील सत्ये शोधण्याचाही प्रयत्न करीत नाही.' [१७]

ज्ञानदेवादी भावंडांच्या मौंजीबंधनाच्या समस्येवर उपाय म्हणून ज्ञानदेवांनी शुद्धिपत्र मिळवण्यासाठी पैठणला जाण्याची तयारी केली, तेव्हा दहा-अकरा वर्षांच्या निवृत्तीने युक्तिवाद केला, की तिकडे जाण्याची काय आवश्यकता? खरेतर आपल्याला मौंजीबंधनाचीच आवश्यकता नाही.

'वर्णयातिकुळ आम्हासी । बोलावयासी ठाव नाही ।।
नसे भेदाभेदी अढळ । निजरूपी दिसतसे ।।
अशा बोधानंदी सहज । सहजी मिळवतसे ।।'

अशी स्वरूपस्थितीची अवघ्या दहा वर्षांच्या वयात निवृत्तिनाथांना होती. ज्ञानाच्या याच मुशीतून मुक्ताईसह सर्व भावंडे निघाली. याचा अर्थ परिस्थितीचे चटके बसून ही मंडळी त्याप्रमाणे घडली असे नव्हे, तर जणू पूर्वसंचित म्हणूनच त्यांच्यातील अलौकिक गुणांचे समर्थन करावे लागेल.

या भावंडांचा आपापसातील व्यवहार यौगिक पातळीवरच असल्यामुळे त्यांचा लौकिक स्नेहबंध दिसतोच असे नाही. याला अपवाद फक्त ताटीच्या अभंगांचा.

ज्ञानदेवांचे अलौकिक अपार्थिव व्यक्तिमत्त्व लौकिक मानापमानाच्या जंजाळात अडकून व्यथित झाले असता लहानगी मुक्ताई समजुतीच्या सुरात त्यांचं सांत्वन करायची. कधी आई होऊन त्यांना माया द्यायची. मुक्ताईच्या



पारमार्थिक प्रवासाचा हा पहिला टप्पा–

'योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।।
विश्व रागे झाले वन्ही । संतसुखे व्हावे पाणी ।।
शब्द शास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।'

असा आपल्या ज्ञानदादाला तिने उपदेश केला आहे. 'अरे ज्ञानदादा, ज्याने संत व्हावे त्याने जगाचे बोलणे सोसलेच पाहिजे. जो अभिमानाने व्याप्त असेल त्याच्या अंगी थोरपण कसे येईल? तू कोणावर रागावतो आहेस? हे विश्वच ब्रम्ह आहे. ब्रम्हभावनेनेच सारे जग नटले आहे. सुखसागरातच ज्याचा निवास आहे त्याला उच्च नीच काय?' संतांचे गुणवर्णन करताना मुक्ताई म्हणते, 'क्षमा आणि दया ज्याच्या अंगी आहे तोच खरा संत. ज्याच्या मनात लोभ, अहंकार नाही तोच खरा विरक्त. जगातील माया हेच दुःख देणारे कारण आहे. तिचा सर्वांनी त्याग केला तिला नष्ट केली तर सारे विश्वच ब्रम्हमय होईल. म्हणून म्हणते,

'चिंता, क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'

असे विविध इशारे आपल्या मधुर बोलण्यातून आपल्या लाडक्या भावाला मुक्ताई देताना दिसते. भावाच्या हितासोबतच त्याला सावध करण्यासाठी ती सहजपणे व्यावहारिक उदाहरण देते.

'जीभ दाताने चावली । कोणी बत्तीशी पाडली ।।
थोडे दुखावले मन । पुढे उदंड साहणे ।।'

जन्मतःच सिद्ध अवस्थेत होती. ही सर्व सिद्धी प्राप्त असूनही लोकसंग्रह करण्यासाठी तिने त्याचा उपयोग केल्याचे दिसत नाही. नेहमी स्वरूप स्थितीत राहणारी आणि आपल्या मुक्ततेचं सदैव चिंतन करणारी मुक्ताई अखेर वादळ सुटलेल्या, वीज कडाडलेल्या अवकाशात विरून गेली.

नातरी वारयाचेनी अंगे झगटली ।
दीपाची दिठी निमटली ।।
का लखलखोनि हारपली ।
वाजु गगनी ।।'[२०]

❖❖❖



शरण येतो आणि आपल्या उद्धारासाठी ज्ञानदेवांना वाट विचारतो, तेव्हा ज्ञानदेव मुक्ताईकडे बोट दाखवतात. एवढ्या वयोवृद्ध ज्ञानतपस्वीची एक परकरी पोर गुरुमाऊली होते. 'ज्ञानदेवांच्या प्रसंगातून बहिणीचं वात्सल्य प्रगट करीत ज्ञानदेवांच्या हातून अनावधानाने सुटलेलं मोठेपण त्याला मिळवून देते, त्याप्रमाणे याही प्रसंगात या योग्याची माऊली म्हणून ती तिच्या खऱ्या उद्धाराचा मार्ग मोकळा करते.'[१८]

चांगदेवाची गुरुमाऊली होताना मुक्ताई खरीखुरी आध्यात्मिक आई होत हे माऊलीपण हळुवारपणे जपताना दिसते.

'निर्गुणाचे डहाळी पाळणा लाविला ।
येथे सुत पहुडला मुक्ताईचा ।।
निज निज बाळा न करी पै आळी ।
अनुहात टाळी वाजविते ।।
निद्रा ना जागृती निजसी बा काही ।
परियेसी चांगा बोले मुक्ताई ।।'

एकदा पंढरपुरात विठ्ठल मंदिरात पांडुरंगाचे महान लाडके भक्त नामदेव यांची भेट झाली. तिन्ही भावंडांनी त्यांना परस्पर्शपूर्वक नमस्कार केला, परंतु पंढरीच्या वहिवाटीप्रमाणे नामदेवांनी नमस्कार केला नाही. तेव्हा मुक्ताबाई कडाडून म्हणाल्या,

'अखंड जयाला देवाचा शेजार ।

का रे अहंकार गेला नाही ।।
तुझे रूप तुवा नाही ओळखिले ।
अहंतेने धरले कासयासी ।।'

भक्तीच्या अनेक पायऱ्यांपैकी सुरुवातीच्या पायरीवर असलेले नामदेव परिपक्व भक्त होण्यासाठी मुक्ताबाईंनीच पुढाकार घेतला. सद्‌गुरूशिवाय पर्याय नाही असेही सांगितले.

'अतिथी आदर केला मुक्ताबाई ।
लाकडाने डाई फोडली माझी ।।'

अशी नामदेवाने विठ्ठलाकडे तक्रार केली तेव्हा विठ्ठलाने मुक्ताईच्या म्हणण्याला दुजोरा दिला. तेव्हा तिच्याच सांगण्यावरून नामदेवाने औंढ्या नागनाथला जाऊन विसोबा खेचराचे पाय धरले.

उण्यापुऱ्या सतरा वर्षांच्या प्रवासात या तीन प्रसंगांनी मुक्ताईला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले आहे. जीवनात कायम उपेक्षा वाट्याला आलेली आणि ऐहिक सुखाचा तर लवलेशही नाही, म्हणूनच मुक्ताबाईंचे काव्य म्हणजे धगधगीत वास्तवाला सामोरे जाण्याचे बळ देणारा मंत्र वाटते. नैराश्य, दुःख अशा अंधकारमय शब्दांनी झाकोळून न जाता आशेच्या, उल्हासाच्या प्रकाशाने जीवनाची दिशा शोधण्याला मदत करते.

मुक्ताबाईच्या काव्यात तत्कालीन समाजजीवनाचे



पडसाद मात्र फारसे उमटताना दिसत नाहीत. 'वास्तविक तिचा अनुभव किती जगावेगळा व समृद्ध. तिच्याभोवती केवढे समाजप्रबोधन चालले. त्यात तिचा वाटा; पण तिच्या काव्यात त्याचा मागमूसही नाही.'[११]

मुक्ताईने केवळ ६०–६५ अभंग लिहिले. तिच्या काव्यात सर्वत्र समता सांगितलेली आहे.

'शांती, क्षमा चित्ती हरिभजना ।
दया धरा चित्ती सर्वांभूती करुणा ।।'

किंवा

'मुक्तपणे ब्रीद बांधूनिया द्विज ।
नेणती ते बीज केशव हरी ।।'

एवढ्या उद्‌गारांवरून तिने कर्मठपणाला विरोध केला असे फारतर म्हणता येईल, तेही काहीसे ओढूनताणूनच.

मुक्ताबाईमध्ये काय किंवा इतर भावंडांमध्ये काय, वडिलांच्या वैराग्याचा वारसा आला असावा. त्यामुळे त्यांची ऐहिक सुखाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून गेली आणि जाणिवेचं वय अंकुरत आल्यापासून त्यांनी आपली दिशा निश्चित केली. त्यातही मुक्ताईचे जीवन वैराग्याने जास्तच भारलेले दिसते. सद्‌गुरूच्या अनुग्रहाने योगमार्गाच्या सर्व पायऱ्या पार करून जाण्यात हे वैराग्य तिला साह्यभूत ठरलेलं आहे आणि तेच तिच्या काव्यातही विखुरलेलं आहे.

'मुक्ताई कधी साधक अवस्थेत नव्हतीच, ती

नको पाहू अंत जननीयें ।।'

('अभंग-कुसुमांजली', अभंग क्र. १०१)

ईश्वरी अनुग्रहासाठी खडतर उपासना करूनही परमार्थप्राप्तीचे फळ मिळत नाही, हे पाहून सोंसूबाईंचे मन निराशेने भरून गेलेले दिसते. इच्छित गोष्टीची प्राप्ती मानवाला होऊनही हा नियतीचा कठोर शाप सोंसूबाईंना भोवताना दिसतो. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनदेखील देवदर्शनाची अनुभूती आपल्याला होत नाही, या जाणिवेने मुरारीने आपल्याला मोकविलेले आहे, अशी समजूत करून परमेश्वराला पाचारण करताना त्या म्हणतात,

'कैसी माझी तुझ न ये कळवळी ।<br>
कोप वनमाळी धरिला कां ।।<br>
जाणुनी आशय अंतरीचा, हरी ।<br>
मज कां मुरारी मोकलीले ।।<br>
पाहाया चरण लागली उत्कंठा ।<br>
अगा देवश्रेष्ठा दीनानाथा ।।<br>
सोंसू म्हणे, शीघ्र दाखवीं चरण ।<br>
नाहींतरी निधन पावों सत्य ।।'

('अभंग-कुसुमांजली', अभंग क्र. ३२३)

संत सोंसूबाई यांच्या या अभंगातील प्रासादिकता लक्ष वेधून घेणारी आहे. अतिशय श्रवणमधुर ही रचना 'काव्य म्हणजे भाषेतील संगीत' ह्या उक्तीची आठवण



# ३. गोमंतक स्त्री संत : सोंसूबाई

गोव्यातील सावर्डे गावातील 'कुलकर्णी' नावाच्या गौड सारस्वत कौशिक गोत्री ब्राम्हण कुळात संत सोंसूबाईंचा जन्म झाला. 'सावर्डेकरांचा वाडा' या मोठ्या वास्तूत कुलकर्णी परिवार राहत असे. संत सोंसूबाईंचे लग्न लहानपणीच झाले. गोव्यातील 'कुंकळ्ळी' या गावातील यशवंतराव केंकरे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. माहेरचे सोंसूबाई नाव बदलवून सासरी रुक्मिणी ठेवण्यात आले. दुर्दैवाने लग्नानंतर लवकरच यशवंतराव केंकरे यांचा मृत्यू झाला. रुक्मिणीबाई विधवा होऊन सावर्डे येथे माहेरी परत आल्या व शेवटपर्यंत तेथेच राहिल्या. तत्कालीन प्रथेप्रमाणे त्यांचे केशवपन करण्यात आले. जीवनात आता काहीही सुख नाही हे जाणून त्यांनी देवपूजा, भजनपूजन, वाचन, मनन व ध्यानधारणा यांमध्ये आपले मन रमविण्यास सुरुवात केली. हळूहळू त्यांना ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांच्या काव्यवाचनाची गोडी लागली. रोज संध्याकाळी गावातील धार्मिक वृत्तीच्या स्त्रियांसमोर त्या पोथी वाचायला बसत. संतत्व त्यांच्या मनीमानसी मुरले होते. हळूहळू 'संत सोंसूबाई' या नावाने त्यांची कीर्ती पसरू लागली.

संत सोंसूबाई यांनी 'अभंग मनाचे' या नावाने अभंगरचना केली. स्वतःच्या मनाला निमित्त करून लिहिलेल्या

या ११७ अभंगांवर समर्थ रामदासांचा प्रभाव दिसून येतो.

संत सोंसूबाई यांनी संपूर्ण जीवनात उपेक्षेचेच दुःख सोसले आहे. '*आपण शांतपणे दुःख सोसूया* अशी विलक्षण समज सोंसूबाईच्या नावातच आहे.'[२१] त्यांच्या दुःखाची जातकुळी वेगळी आहे. लहानपणीच वाट्याला आलेले वैधव्य रूढीनुसार करण्यात आलेले केशवपन, सासर सोडून माहेरी केलेले वास्तव्य अशी काही कारणे त्यांना आयुष्यात दुःखी कष्टी करतात. त्यामुळे देवापुढे आपले गाऱ्हाणे मांडताना सोंसुबाई दिसतात.

'गांजले पोळले येऊनी संसारी ।
तुजवीण हरी कोणा सांगु ।।
चहुकडुनिया दुःखे मी वेढले ।
दिवस कंठीले लाजिरवाणे ।।
हीनदीन तुज आले मी शरण ।
करी कृपा नारायणा ।।
सोंसुबाई म्हणे देवा जगजेठी ।
पायी मारील मिठी ऐसे करी ।।'[२२]

'जगात तुझ्याशिवाय माझे कोण आहे ? तेव्हा तूच माझी मदत कर. जगाच्या दृष्टीने मी चांडाळीण, तेव्हा तूच माझा प्रतिपाळ कर' असा देवाचा धावा करताना त्या दिसतात. बालविधवा म्हणून जगाने त्यांना हिणवले, अपमानित केले, पण श्रीशंकराने ज्याप्रमाणे हलाहल प्राशन करून



जगाला अमृताचे दान दिले, त्याप्रमाणे सोंसूबाईंनी अनुदारता, लोकनिंदा यांचे हलाहल शांतपणे पचवून समाजात स्वतःच्या स्वत्वसंपन्न व्यक्तित्वाने आणि प्रसन्नवृत्तीने आनंदाचेच दान केले.

'एकांती बैसोनी आळवी श्रीधर ।
कृपा रमावर करील तो ।।
('अभंग-कुसुमांजली', अभंग ४६)

हे त्यांचे आश्वासन आणि

'बैसोनी निवान्त शुद्ध करी चित्त ।
तया सुखा अंतपार नाही ।।'

हे तुकोबाचे वचन या दोहोंची जातकुळी एकच आहे, हे अभ्यासकांच्या सहज लक्षात येते. संत सोंसूबाईंना साधकावस्था प्राप्त करण्यासाठी खडतर स्वरूपाची उपासना करावी लागली. त्यावेळी ईश्वराप्रती निकराची भाषा बोलताना त्या म्हणतात,

'करुणा कल्लोळे विठाई माऊले ।
बहुदिन झाले हुडकीतां ।।
विश्वासूनी तुज आले हो शरण ।
जनन मरण चुकवाया ।।
भेटीसाठी जीव झाला कासावीस ।
केवीं तूं परेश आतुडेल ।।
सोंसू म्हणे, पाय दाखवी त्वरित ।

असला तरी तो दुष्कर आहे. त्याला बुद्धीची जोड लागते. ती बुद्धी प्राचीन ग्रंथांतील भक्तीचे मार्ग जाणण्यासाठी व संतांचा समुपदेश श्रवण करून तो चित्तात ठसविण्यासाठी उपयोगी ठरते.'[२४] आळवारांचा भक्तिमार्ग हा सार्वजनिक आहे. तो जातपात किंवा वर्णाश्रम यांच्या मर्यादा मानीत नाही. जो ईश्वराला पूर्णपणे शरण जातो, तो कोणत्याही जातीचा वा धर्माचा असो, परमेश्वर त्याचा उद्धार करतो अशी आळवार पंथीयांची धारणा आहे.

आळवार संत हरिभक्तीमध्ये रममाण झालेले दिसतात. एकीकडे भगवंताविषयी उत्कट आसक्ती तर दुसरीकडे अध्यात्माची चिरंतन तत्त्वे परोक्ष पद्धतीनेच सांगतात. सर्वच आळवार संतांनी श्रीकृष्णाच्या किंवा रंगनाथाच्या बाळलीला वर्णन करून कृष्णाविषयीचा भक्तिभाव प्रकट केला आहे. ईश्वर किंवा विष्णू हा स्वामी आहे व आपण त्याचे दास म्हणून जन्माला आलो आहोत, ही भावना आळवार भक्तांमध्ये दृढपणे दिसून येते.

अशा ह्या आळवार संतांमध्ये महत्वाचे स्थान असलेली एक स्त्रीसंत म्हणजे अंडाळ नावाची भक्त होय. तिचे पालक विष्णूचित्त उर्फ पेरियाळ्वार हे होते. विष्णुचित्त हे सहाव्या शतकात श्रीविल्लपुत्तूर येथे एका ब्राम्हण कुळात जन्मले. विष्णुचित्तांना एकदा एका तुळशीवनात एक अनाथ मुलगी सापडली. तिला पाहून त्यांची करुणावृत्ती उचंबळून



करून देते.

आपल्या जीवनात असणाऱ्या यातना आणि वेदना जणू परमेश्वराच्या कृपाप्रसादासाठीच आहेत, असा सूर त्यांच्या आत्मनिवेदनातून दिसतो. परमात्म्याचा साक्षात्कार न झाल्यामुळे त्यांची आत्मिक अगतिकता साधकाच्या परमार्थ प्रवासातील जणू घोर रात्र आहे; परंतु मनाचे पारमार्थिक आरोग्य अशा विपरीत अनुभवावाचून प्राप्त होत नाही. हा खडतर अनुभव म्हणजे आत्मज्ञानाच्या पहाटेपूर्वीचा काळोख होय.

शेवटी ती वेळ येते, जेव्हा परमार्थ जीवनात सिद्धावस्थेची चैतन्यमयी पहाट उजळते. दीर्घकाळापासून प्रतीक्षेत असलेल्या सोंसूबाईंना देवदर्शन घडते. कदाचित त्यांचा शोक पाहून द्रवलेला श्रीविठ्ठलच त्यांच्यासमोर येतो. विठ्ठलाच्या सावळ्या मूर्तीचे दर्शन झाल्याने सोंसूबाईंची देहबुद्धी पालटलेली दिसते. जन्ममरणाचे दुःख क्षितिजापलीकडे विरून गेल्यासारखे वाटते. 'तो हा आनंदाचा कंद । प्राप्त झाला हे मुकुंद ।।' असे त्यांना म्हणावेसे वाटते.

संत सोंसूबाई यांच्या 'अभंगकुसुमांजली'त आलेले अध्यात्मविचार उच्च प्रतीचे आहेत. मूळचा निर्गुणनिराकार व निरंजन असा परमात्मा आपल्या लाडक्या भक्तांच्या भेटीसाठी सगुणसाकार होऊन अवतरतो. संपूर्ण जगाच्या परमेश्वराचे हे रूप संत सोंसूबाईंना स्वतःवरची

परमेश्वरी कृपा वाटते. आपल्या अभंगांत सोंसूबाई श्रवण, कीर्तन, स्मरण, चरणसेवन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन अशी भागवत पुराणात सांगितलेली नवविधा भक्ती आपल्या शब्दांत वर्णन करतात.

धर्माला मान्य असलेली निर्दोष सदाचाराची सूत्रे आपल्या अभंगांतून त्या सोदाहरण समजावून सांगतात.

'संसृतीचा पिंगा किती रे घालसी ।
कां रे नाठविसी देवराया ।।'
('अभंग-कुसुमांजली', अभंग क्र. ९२)

हे त्यांच्या समग्र उपदेशाचे सार आहे. 'सोंसूबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी प्रपंचाची भक्ती केली नाही, तर भक्तीचाच प्रपंच केला.'[२३]

❖❖❖



# ४. आळवार वैष्णवी : संत अंडाळ

अंडाळ ही आळवार संप्रदायातील स्त्रीसंत होती. अंडाळचे व्यक्तिविशेष जाणून घेण्याआधी आळवार संप्रदायाविषयी माहिती पाहणे उचित ठरेल.

दक्षिणेकडील तामिळनाडूमध्ये विष्णूभक्तीची किंवा कृष्णभक्तीची एक लाट आली होती. शैव आणि वैष्णव असे दोन संप्रदाय उत्पन्न झाले होते. शैव संत भक्तांना 'नायन्मार' तर वैष्णव संतांना 'आळवार' असे म्हटले जाते. तामिळनाडूमध्ये आळवार ह्या विष्णूभक्तांनी भक्तीला माधुर्य दिले. या संतांनी भक्ती साहित्य स्वतःच्या प्रतिभेने आणि प्रेमभावनेने समृद्ध केले. इतकेच नव्हे तर एका विशिष्ट तत्त्वज्ञानास जन्म दिला. पल्लव राजांच्या कारकिर्दीत ह्या घडामोडी घडत होत्या. केवळ पल्लवांच्याच नव्हे तर पांड्य आणि चोळ राजांच्या काळातही आळवार संतांनी आपल्या मधुराभक्तीची छाप समाजावर पाडली होती. परमेश्वरापुढे संपूर्ण शरणागती म्हणजेच प्रपत्ती हा त्यांच्या भक्तिभावनेचा कणा होता. याच तत्त्वाचा प्रचार करत त्यांनी सर्वत्र संचार केला.

आळवार हे बव्हंशी गूढगुंजनवादी संत होते. त्यांनी भक्तीला लोकप्रियता मिळवून देण्यासाठी तिला नवीन दिशा दाखवली. 'आळवारांचा भक्तिमार्ग दिसायला सोपा

# ५. जनाबाई

(सुमारे इ.स. १२६३ — १३५०)

संत जनाबाई यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील गंगाखेड गावातील दमा आणि करुंड ह्या दाम्पत्याच्या पोटी झाला. पांडुरंगाच्या नवसाने त्यांना ही अपत्यप्राप्ती झाली होती. जनाबाईंच्या चरित्राविषयी विशेष माहिती मिळत नसली, तरी महिपतीबोवा ताराबादकर ह्यांच्या 'नामदेव चरित्रा'तून जनाबाईंविषयीचे काही संदर्भ मिळतात. जनाबाईंच्या जन्मानंतर पाच-सहा वर्षांनी करुंडचे निधन झाले. जनाबाईचा पिता दमा ह्याच्या स्वप्नात दृष्टांत झाला. त्यात सांगितल्याप्रमाणे त्याने आपल्या लेकीला दामाशेट्टींच्या स्वाधीन केली. दामाशेट्टींच्या भरल्या घरातली एक होऊन आपली मुलगी राहील, असा विचार त्यांनी केला. दामाशेट्टींच्या घरातील सर्व सदस्य विठ्ठलभक्तीतच तद्रूप झाले होते. साहजिकच ह्या गोष्टींचा प्रभाव लहानपणापासून जनाबाईंवर पडला. जनाबाईंच्या विवाहासंबंधी कुठेही माहिती उपलब्ध नसली तरी सर्व प्रापंचिक नात्यांची ओळख जनाबाईंना नामदेवांच्या कुटुंबातच झाली.

जनाबाईंचे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. भक्तीने ओतप्रोत भरलेले त्यांचे हे अभंग म्हणजे हृदयातील मधुर भावनेने गुंफलेली भावगीतेच आहेत. अतिशय



आली. तिला ते घरी घेऊन आले. तिचे नाव 'अंडाळ' उर्फ 'गोदा' ठेवण्यात आले. तिचे कुळ, गोत्र कोणासही ठाऊक नव्हते. तरीपण विष्णुचित्तांच्या शुद्ध भक्तीचा तिच्यावर पूर्ण प्रभाव पडला.

विष्णुचित्त श्रीरंगमच्या रंगनाथास नित्यदिनी सुवासिक फुलांचा हार वाहत असे. कालांतराने त्यांनी हे काम अंडाळवर सोपवले. ती मोठ्या तन्मयतेने हे काम करीत असे. तिचे मन हळूहळू रंगनाथाकडे आकर्षिले गेले. रंगनाथासाठी बनविलेला हार ती आधी स्वतः घालून पाहू लागली. अंडाळची प्रेम व्यक्त करण्याची वेगळी पण सुवासिक पद्धत विष्णुचित्तांना ठाऊक नव्हती. एकदा त्यांना हारात केस दिसला म्हणून त्यांनी तो हार टाकून दिला. स्वतः गुंफलेला हार देवाला वाहिला; पण रंगनाथ तो हार स्वीकारच करेना. रंगनाथाने विष्णुचित्तांच्या स्वप्नात येऊन सांगितले, 'तुझी कन्या मला प्रिय असून तिने गळ्यात घातलेला हारच मला अधिक प्रिय आहे.' ही वार्ता सगळीकडे पसरली. 'इतर भक्त तेव्हापासून तिला 'शूडिक्कोडुत नाच्चियार' (स्वतःचे निर्माल्य देवाला वाहणारी) ह्या नावाने ओळखू लागले.'[२५]

अंडाळचे विवाहयोग्य वय झाल्यावर विष्णुचित्तांनी तिच्या लग्नाचा विषय काढला असता 'मी रंगनाथालाच पती म्हणून वरले आहे' असे तिने स्पष्टपणे

सांगितले. विष्णुचित्तांनी अंडाळची विनंती मान्य करून तिचे रंगनाथाशी लग्न लावून देण्याचे कबूल केले. वल्लभदेवराजाकडे आर्थिक मदतीची यायना करावी व अंडाळचे लग्न लावून द्यावे, असा विष्णुचित्ताने विचार केला; तत्पूर्वीच रंगनाथाने राजाला दृष्टांत देऊन लग्नाची तयारी करण्याचा आदेश दिला व मोठ्या थाटामाटाने अंडाळ परमेश्वरतेजात विलीन झाली. आपल्या विशुद्ध अनन्य भक्तीच्या बळावर ती सायुज्य मुक्ती पावली.

आळवार संतांमधील संत अंडाळ ही एकच स्त्री आहे, जी इतर पुरुष संतांप्रमाणेच प्रसिद्ध पावली. वैष्णव भक्तांच्या मते अंडाळने दोन ग्रंथांची निर्मिती केली. एक म्हणजे तीस पद्यांचा 'तिरूप्पावै' व दुसरा म्हणजे एकशे त्रेचाळीस पद्यांचा 'नाच्चियार् तिरूमोळि'. अंडाळच्या सर्व पदांत भक्तिभावना प्रामुख्याने दिसते. मधुराभक्तीने नटलेली ही पदे मनाला गुंगवून टाकतात. राधा, मीरा, अंडाळ यांची भक्ती एकाच जातकुळीतील आहे. गोपींची श्रीकृष्णाविषयीची अनन्यासक्ती आणि विरहामुळे होणारी मानसिक व्याकुळता हे भक्तीचे उच्च आदर्श आहेत. ही अशी भावना आहे, जी मानवी संवादाच्या पलीकडची आहे. तरीही काही संतांनी व कवींनी त्या प्रेमाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यातलीच एक म्हणजे संत अंडाळ.

संत अंडाळ किंवा सर्व आळवारांची रचना



ह्यांचा विचार केला असता, एक गोष्ट लक्षात येते, या सर्व भक्तांनी सामाजिक संदर्भांचा ऊहापोह कुठेच केलेला दिसत नाही. बहुतेक संत समाजातील खालच्या थरातून आलेले होते. तरीही जातिगत किंवा वर्गगत संवेदना त्यांच्या काव्यातून उत्पन्न झालेल्या दिसत नाही. कदाचित कृष्णभक्तीच्या भावनिक उद्वेगापुढे त्यांचे जन्मासंबंधीचे शोक, उमाळे फिके पडले असते. संत अंडाळही याला अपवाद नाही. तिचे जीवन केवळ श्रीकृष्णमय झाले होते. स्वतःच्या जातिकुळापेक्षा तिला श्रीकृष्णावरची आस्था दर्शविण्याचा अधिक मोह होता.

'आराध्य कृष्णाला आवडतील अशा गोष्टींचा संकल्प, त्याला प्रतिकुल अशा गोष्टींचे वर्जन, दृढ विश्वास, रुसवा, देवावर सर्वभावे आत्मसमर्पण आणि दीनता हे भाव अंडाळच्या सर्व काव्यात ठळकपणे दिसतात.'[२६] जन्माने अज्ञात पण स्वतःच्या भक्तीनेच ख्यातनाम झालेली ही स्त्रीसंत अंडाळ आळवार संतांमध्येच नव्हे तर सर्व भारतीय संत मालिकेत आपल्या आगळ्या तेजाने उठून दिसते. दक्षिणेतील मीरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंडाळने 'तिरूप्पावै'च्या द्वारे आपले नाव भारतीय भक्ती साहित्यातही उमटवले.

❖❖❖

वास्तविक पाहता जनाबाई अशिक्षित; परंतु 'बाई मी लिहिणे शिकले सद्गुरुरायापाशी ।' असे त्या सांगतात. भक्ताने ईश्वरप्राप्तीसाठी काकुळतीला येणे आपण समजू शकतो; पण येथे जनाबाईंनी विठ्ठलालाच काकुळतीला आणले आहे. 'सोहम शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ।।' असे त्या म्हणतात.

'विठोबा आणि पांडुरंग आणि पंढरपूर ह्यांविषयी सर्व संतांनी अभंग लिहिले; पण जनाबाईंच्या अभंगांचे काव्यरूप अत्यंत वेगळे आहे. त्यात वत्सलतेचा व मातृत्वाचा म्हणजेच स्त्रीत्वाचा स्पर्श आहे. त्यामुळेच एकप्रकारचा लडिवाळ लोभसपणा त्यात दिसून येतो. 'विठू माझा लेकुरवाळा । सख्या पंढरीचा राया ।। पाय जोडुनी विटेवरी । ये ग ये ग विठाबाई ।।' किंवा 'धरिला पंढरीचा चोर' यांसारखे अभंग त्याचे द्योतक आहेत.'[३०]

वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला एक महान देणगी दिली, ती म्हणजे माणसामाणसांतील उच्चनीचतेच्या भावनेचे उच्चाटन. समाजातील सर्व थरातल्या लोकांना स्त्रीपुरुष, सामान्य असामान्य या सर्वांना परमेश्वरप्राप्तीचा अधिकार आहे, असा विचार त्यांनी समाजाला दिला. या देणगीचा फायदा जनाबाईंना भरपूर प्रमाणात मिळाला. त्यांचे आयुष्य काबाडकष्टांत गेले. सुखाचे कोणतेही वारे त्यांना लाभले नाही. तरी आपल्या परमभक्तीने परमेश्वराची अत्यंत



तळमळीने विठ्ठलाला साद घालून, आर्तपणे त्याच्या दर्शनासाठी आसुसलेल्या जनाबाई आपल्या अभंगांतून आपल्या मनातील तरंग ऐकवणाऱ्यापर्यंत पोचवितात.

'जनाबाईंच्या अभंगात सहजसुलभ गेयता, शब्दयोजनेतील ताल व तोल, मांडणीमधील रेखीवपणा हे बाह्य गुणतर आहेतच; परंतु त्याबरोबर अनुभूतीतील अभिजात भावोत्कटता तसेच काव्यशैलीतील रसाळपणा ह्या गुणसमुच्चयाने जनाबाईंचे अभंग अत्यंत लोकप्रिय झाले आहेत.'[२७] जनाबाईंचे काव्य महाराष्ट्रीय स्त्रीला आपलेसे वाटते; कारण त्यात तत्कालीन स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक स्वरूप प्रकट झाले आहे. सामाजिक बंधनात अडकलेल्या सहनशील आणि शालीन स्त्रीचे हृदय त्यांच्या अभंगात दर्शित होते. जनाबाईंनी आपल्या अभंगातून भक्तिमहात्म्य सांगितले आहे. तिच्या मते भक्तीच्या माध्यमातून परमार्थाची प्राप्ती आपल्याला होऊ शकते. ईश्वराच्या अस्तित्वाला आपल्या जीवनातच सामावून घेणाऱ्या जनाबाई एक विलक्षण स्त्री आहेत.

'जनी दृष्टी पाहे । जिकडेतिकडे हरी आहे ।।'

दळणकांडण आदी घरगुती कामे करतानासुद्धा विठ्ठल आपल्यासोबत आहे, असे त्यांना वाटते. विठ्ठलमय झालेल्या जनाबाई स्वतः व ईश्वरातील सर्व द्वैत नाहीसे करताना म्हणतात,

'देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।।

देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते ।।'

तसेच

'झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।।'

('नामदेवगाथा', अभंग क्र. २१९)

ह्यांसारखे उल्लेख त्यांच्या ईश्वराप्रतीच्या एकरूपतेची ओळख करून देतात. असे घडणे चमत्कार वाटत असले तरी जनाबाईंच्या भावविश्वाचा तो एक भाग होता.

तत्कालीन सांप्रदायिक परंपरेनुसार उपदेशपर अभंगही जनाबाईंनी लिहिले आहेत. परधन, कामिनी यांची वासना मनाला नसावी, अधमतृष्णा मनाला लागू नये, निरपेक्ष वासना मिळावी, देवाची सेवा घडावी असे जनाबाईंचे मागणे आहे. वैष्णवाची व्याख्या करताना त्या म्हणतात, 'कोणत्याही कुळातला, जातीतला असला तरी शांतीची भूषणे मिरविणारा हा खरा वैष्णव होय.' अशांना त्या वंदन करतात. संत हे देवाचे डोळे असतात, असे त्यांचे म्हणणे आहे. संतांच्याच डोळ्यांनी देव आपल्याकडे पाहतात. त्यांच्याच कानांनी आपले चिंतन ऐकतात. म्हणून संत हेच देवाचे वंदन मानून जनाबाई त्यांना जिवेभावे ओवाळतात.

'सत्त्वगुणांशिवाय प्रतिष्ठा मिळवू पाहणाऱ्या 'लटिकेच नेत्र लावून ध्यान करणाऱ्या' दांभिकांवर जनाबाईंनी टीका केली असली, तरी तुकोबांच्या पद्धतीने परखड टीका



करणे ही जनाबाईंची प्रकृती नाही. 'झालेपणाचे गुण, दिसतांती सगुण' एवढेच बोलून जनाबाई थांबतात. क्वचित 'वैष्णव तो एक इतर ती सोंगे । ठसे देऊनी अंगे चितारिती ।।' ह्यांसारख्या अभंगांचा अपवाद दिसून येतो.'[२८]

जनाबाईंनी कृष्णजन्म, बालक्रीडा यांचे वर्णन करणारे अभंग लिहिले आहेत; पण त्यांची संख्या फार थोडी आहे. ज्ञानदेवांच्या स्तुतीपर अभंगात त्या म्हणतात,

'ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।।
मरोनिया जावे । बा तुझ्या पोटी यावे ।।'

जनाबाईंनी सेना न्हावी व नामदेव ह्यांचे चरित्रपर अभंग लिहिले आहेत. ह्याशिवाय 'हरिश्चंद्राख्यान' लिहिले असून तारामती, रोहिदास आणि हरिश्चंद्र ह्यांच्या कसोटीपर प्रसंगांतून भक्ताचे आदर्श उभे केले आहेत. 'थालीपाक', 'तीर्थावळी', 'पाळणा', 'दशावतार वर्णन' ह्या त्यांच्या आणखी काही रचना.

जनाबाईंची अभंगसृष्टी भक्तीच्या वाटेवरची असली तरी आध्यात्मिक संकल्पनांशी असलेला त्यांचा परिचय त्यांच्यातल्या चौफेर जाणिवांचे प्रतीक म्हणता येईल. अविद्या, माया, ब्रम्ह, आत्मा, परमात्मा इत्यादींची जाण त्यांना होती. 'वारकरी संप्रदायात बंड करून वारकऱ्यांशी स्त्रियांची नाळ जोडण्याचे कार्य संत जनाबाईंनी केले. आपल्या अभंगांतून 'स्त्रीचे घर हेच विश्व' ह्या संकल्पनेला तडा दिला.'[२९]

३. माझ्या मनाप्रमाणे संसार करीन.

ह्या अटींचे उल्लंघन होता कामा नये. ह्यावर फक्त तीन अपराध क्षम्य आहेत. त्यानंतर मी विवाहसंबंधात बांधील नाही.

अक्कमहादेवींच्या प्राप्तीच्या आनंदात दंग झालेला कौशिक राजाने या तीनही अटी मान्य केल्या. अशातऱ्हेने ती विरागिणी सोन्याच्या पिंजऱ्यात बंदिस्त झाली. दागदागिने, उंची वस्त्रे ह्याची कुठलीही आवड नसताना हे भोग त्यांना भोगावे लागले. कालांतराने त्यांच्या ह्या द्विधा जीवनाची अनायसे समाप्ती झाली. अटीत सांगितल्याप्रमाणे तीन अपराध कौशिक राजाच्या हातून घडले. शिवभक्ताचा अपमान हा प्रथम अपराध, देवपूजेच्या पवित्र काळी तिची अभिलाषा हा दुसरा अपराध तर श्रीगुरुचरणी ही नतमस्तक होता श्रीगुरूंची व तिची निर्भर्त्सना हा तिसरा अपराध कौशिक राजाच्या हातून घडला आणि अक्कमहादेवींची पतिबंधनातून मुक्तता झाली.

मूळच्याच मुक्त असलेल्या अक्कमहादेवींचे संसाराचे उरलेसुरले पाशही तोडले गेले. त्या मल्लिकार्जुनाच्या आश्रयाला आल्या. त्यांनतर कोणाचेही बंधन त्यांच्यावर नसल्यामुळे मनाप्रमाणे भक्ती, भजन, पूजन, ईश्वरचिंतन हेच त्यांचे जीवन झाले.

अक्कमहादेवी संसारत्याग करून कल्याणक्षेत्री



आवडती स्त्री म्हणून त्या सर्वांच्या स्मरणात राहिल्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून व अभंगरूपाने विविध विषय प्रसृत करण्यातून साकार होणारे बहुश्रुतत्व आणि माधुर्य यांमुळे सर्व संत कवयित्रींमध्ये त्यांचे काव्य मनाला विशेष मोहून घेते. 'कविता म्हणून, काव्यमूल्य म्हणून, भावोत्कटता म्हणून किंवा सुखदुःखानुभवातील परिवर्तने लक्षात घेतली, कवितेतील त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विकास लक्षात घेतला, तर जनाबाईंइतकी श्रेष्ठ कवयित्री दुसरी कोणी नाही.' [३१]

'संत जनाबाईंचे आणखी एक विशेष म्हणजे कर्मयोगाचे पालन करीत उत्कट भक्तीचा आविष्कार त्यांच्या अभंगरचनांतून होतो. इतकेच नव्हे तर त्यांनी योगमार्गाचाही अनुभव घेतल्याचे त्यांच्या अभंगांवरून दिसते.'[३२] जनाबाईंची प्रत्येक क्रिया पांडुरंगमय होऊन गेलेली दिसते. दळण, कांडण करताना, झाडलोट करताना त्यांना सर्वत्र पांडुरंगच दिसतो. अशी नामदेवांचा संसाराचा गाडा ओढताना परमार्थाचा लाभ करून घेणाऱ्या जनाबाई आदर्श म्हणून उभ्या राहतात.

❖❖❖

# ६. शिवशरणी संत : अक्कमहादेवी
## (बारावे शतक)

वीरशैव संप्रदायातील महान असे व्यक्तिमत्त्व म्हणजे परमपूज्य योगिनी संत अक्कमहादेवी. मीराबाईंच्या चरित्राशी यांचे चरित्र साधर्म्य दाखविते. मीरेला जसा लहानपणापासून श्रीकृष्णाचा नाद, तसा यांना मल्लिकार्जुनाचा नाद. मल्लिकार्जुनालाच त्यांनी मनातून आपला पती म्हणून वरले व संपूर्ण आयुष्य त्याच्यावरच प्रेम करण्यात घालविले. अशी ही कर्नाटक प्रांतातील मीरा म्हणून ओळखली गेलेली अक्कमहादेवी आपल्या अंतःकरणात भक्तीची मुळे इतकी खोलवर रुजवून बसली होती, की ती उखडून काढायची म्हटले तर प्रत्यक्ष ईश्वरालाही शक्य झाले नसते. 'अक्कमहादेवींचे जीवन हा अमर प्रेमाचा दिव्य संदेश आहे. कन्नड काव्यवनातली ती कोकीळा आहे. तिच्या वचनांत सर्वत्र अध्यात्माचाच स्वर लागला आहे. तिला परशिवाशी सामरस्य प्राप्त झाले आहे.'[३३]

अक्कमहादेवीच्या भक्तीचा आविष्कार समर्पित भावाचा होता. अर्चन, पूजन होतेच; पण त्याला बहिरंगाच्या उपाधीचा स्पर्शही नव्हता. अंतरीच्या शुद्ध भावाने पूजा बांधून त्यात त्या रममाण झालेल्या होत्या. शुद्ध भक्तीतून ज्ञान उदयाला येते, तसेच अंतःकरण, वृत्ती एकाकार होताच



ध्यान, ध्यानातून समाधी, समाधीतून सहजावस्था अशा योगाच्या पायऱ्या त्या भराभर चढत गेल्या. पण संतांना कठोर परीक्षा दिल्याशिवाय त्यांचे संतपण उजळून जगासमोर येत नाही, या न्यायाप्रमाणे अक्कमहादेवींच्याही जीवनात त्यांना परीक्षेला सामोरे जावे लागले.

अक्कमहादेवींच्या सात्त्विक रूपावर मोहीत झालेला उडताडी येथील राजा कौशिक ह्याने त्यांना लग्नाची मागणी घातली. ईश्वराला पती मानलेले व त्याच्याच प्रेमात रमलेले अक्कमहादेवीचे मन या व्यावहारिक विवाहाला तयार होईना. तेव्हा त्यांच्या अभिलाषेने अंध झालेल्या राजा कौशिक ह्याने कोणत्याही प्रकारे त्यांना आपली पत्नी करण्यासाठी धडपड सुरू केली. आपल्या राजसत्तेचा दुरुपयोग करीत त्याने अक्कमहादेवींच्या मातापित्यांना बंदिवान केले व मृत्युदंडाचा हुकूम दिला. हतबल मातापिता जीवनाच्या आशेने अक्कमहादेवींकडे पाहू लागले; पण अंतरीचे वैराग्य त्यांना प्रपंचात पाऊल टाकू देत नव्हते. शेवटी परिस्थितीला शरण जाऊन त्यांनी कौशिक राजाशी विवाहाचा निर्णय घेतला. त्यांच्यासाठी हे विवाहबंधन म्हणजे जळती चिताच होती. पण आपल्या शिवभक्त मातापित्यांसाठी त्या प्राणाहुतीला तयार झाल्या. त्याआधी त्यांनी कौशिक राजाला तीन अटी घातल्या.

१. मी माझ्या मनाप्रमाणे शिवभक्ती करीन.
२. मनासारखा गुरुभक्तीत काळ घालवीन.

ऐश्वर्य ह्यांची काहीही कमी नव्हती; परंतु 'त्यांना पित्याजवळ असलेल्या राजवैभवाचा मोह नव्हता. त्यांना आस होती गिरिधराच्या मिलनाची. म्हणूनच मीराबाईंच्या काव्यात कृष्णाप्रती आसक्ती, अनुरक्ती आणि प्रणय यांच्या विविध छटा आढळतात. त्या मनस्वी परिणिता तर आहेच; पण या मनस्विनीमध्ये जन्मजन्मांतरापासून कृष्णासाठी तपश्चर्या करणारी एक अपरिणितादेखील आहे. त्यांच्या काव्यामध्ये येणारे 'जनम जनम की दासी', 'जनम जनम की कुवाँरी' हे चरण प्रणयाच्या एकाच छटेतून व्यक्त होतात.'[३५]

मीराबाईंचा विवाह मेवाडचा राणा संग यांचा ज्येष्ठ पुत्र भोजराजबरोबर झाला; परंतु काही वर्षांतच त्यांना वैधव्य प्राप्त झाले. मीराबाईंनी कृष्णालाच आपले जीवित मानले होते. पती परमेश्वरप्रमाणे परमेश्वर हाच त्यांचा पती होता. त्यामुळे भोज राजाच्या मृत्यूनंतरही त्या विधवा स्त्रीचे आचरण अवलंबत नव्हत्या. आपला जास्तीतजास्त वेळ त्या राणा संग याने त्यांच्यासाठी बांधलेल्या मंदिरात घालवीत असत. ह्या मंदिरात नेहमी वैष्णव भक्तांचे आवागमन होत असे. त्यांच्यासोबत चर्चा करण्यात, श्रीकृष्णाची भक्ती करण्यात त्यांचा वेळ विशेष आनंदात जात असे. राजस्थानी कुलपरंपरेप्रमाणे त्या पडदाही घेत नसत. त्यांचे असे आचरण सासू व दिरांना पसंत नव्हते. राणा संग ह्यांच्यानंतर त्यांचा दीर रतनसिंह अधिकारावर आला. त्याने



गेल्या. तेथे त्यांनी मधुरभक्ती व उज्ज्वल चारित्र्य या गुणांनी अनेक शिवशरणांना मार्ग दाखविला. आपले वैराग्य व निर्भय शिवशरणता यांच्या बळावर वीरशैव भक्तांच्या मालिकेत त्यांनी महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. 'त्यांची वचने संख्येने अत्यल्प असली तरी ती तत्त्वार्थाला भिडणारी आहेत. 'योगांग त्रिविधी' या नावाचा अक्कमहादेवींचा एक छोटासा ग्रंथ असून त्यात अध्यात्माचे निरूपण आहे.'[३४] जीवनाच्या अखेरीस आपले अंतिम उद्दिष्ट साधण्यासाठी त्या कल्याणहून श्रीशैलपर्वतावर गेल्या व तेथेच शिवैक्य पावल्या.

ज्ञानाने परिपूर्ण अशा ह्या अक्कमहादेवी आत्मस्वरूपात स्थिर झालेल्या दिसतात. त्यांच्या मते त्यांचा जन्म झाल्याबरोबर हे दृश्य शाश्वत विश्व त्यांच्यापुरते जागे झाले. मातृत्व, पितृत्व, स्वामित्व, वात्सल्य ह्या मानवी संबंधांची त्याच निर्माती आहेत. मायेची उत्पत्ती मल्लिकार्जुनाने त्याच्या खेळासाठी म्हणून केली म्हणूनच सामान्य जीवांवर कामक्रोधादी सत्ता गाजवतात. ती देवाला स्पष्टपणे सांगते की, हे सगळे विकार तुझेच आहेत. त्यामुळे ही माया नष्ट करणे तुझ्याच हातात आहे.

काही ठिकाणी अक्कमहादेवी ह्या जनाबाईंसारख्या बंडखोर वाटतात. ज्या भक्तिभावनेत त्या आकंठ बुडालेल्या आहेत, त्या भक्तीची मिजास त्यांना आहे. म्हणून परमेश्वराला

त्या ठणकावून सांगतात की, 'माझी पूजा तुझ्यापर्यंत पोचते की नाही ठाऊक नाही; पण तुझी स्तुती अर्चन केल्याशिवाय मला चैन पडत नाही. तुला माझी स्तवने, स्तोत्रे ऐकायची असेल तर ऐक, नाहीतर नको ऐकूस; पण मी भजन, पूजन, नाम, नृत्य हे सारे करतच राहणार. एका अर्थी स्वतःच्या समाधानासाठीच मी हे करते आहे, तुझ्यासाठी नाही', असे त्यांचे म्हणणे आहे.

अक्कमहादेवींच्या ह्या विचारांचे साम्य जनाबाईंच्या 'धन्य माझी भक्ती । धन्य माझा भाव । हृदयी पंढरी राव । राहतसे ।।' ह्या भूमिकेशी जुळते. आपल्या भक्तीचा असा अभिमान आणि आत्मविश्वास परमेश्वरालाही नमविल्याशिवाय राहत नसावा.

अक्कमहादेवींचा हा भक्तिविलास सर्वच भक्तांना प्रेरणा देणारा आहे. भाविकांच्या हृदयाचा ठाव घेत त्यांच्या मनातलेच उलगडून ते शब्दरूपाने समर्थपणे त्या प्रकट करतात. अशा ह्या अक्कमहादेवी मीराबाई, जनाबाई यांच्याचा पंक्तीतील एक थोर संत स्त्री होत्या, यात शंका नाही.

❖❖❖



# ७. मधुराभक्तीचा उत्कट आविष्कार संत मीराबाई

## (जन्म अंदाजे इ.स. १४९८)

मीराबाई ह्या मेडताचे राजे रावदुदा ह्यांचे चतुर्थ पुत्र रावरतनसिंह यांच्या एकुलत्या एक कन्या. त्यांचा जन्म साधारणतः इ.स. १४९८ च्या आसपासचा. बालपणी आईचे छत्र हरविल्यामुळे त्या आजोबा रावदुदा यांच्याकडे लहानाच्या मोठ्या झाल्या. रावदुदा चतुर्भुज भगवंताचे परमभक्त असे वैष्णव होते. त्यांच्या सहवासात राहिल्यामुळे लहानणापासूनच मीराबाईंनाही भक्तिमार्गाचा छंद लागला. त्या गायन कलेतही पारंगत होत्या. त्यांचे लौकिक शिक्षण घरीच झाले.

एक दिवस त्यांच्याकडे आलेल्या एका वैष्णव भक्ताने मीराबाईंना एक सुंदरशी कृष्णमूर्ती भेट म्हणून दिली. मीराबाई त्या कृष्णमूर्तीला पाहून अतिशय आनंदित झाल्या. हळूहळू त्या कृष्णाचा त्यांना इतका लळा लागला की त्याला एका क्षणासाठी त्या वेगळे करीत नसत. इतकेच नव्हे तर आपल्या लग्नसोहळ्यातील फेरेही त्यांनी त्या कृष्णमूर्तीसह घातले.

मुळातच राजस्थान भक्तीचे तपोवन. राजस्थानची राजकन्या असलेल्या मीराबाईंना सुखोपभोग,

कवींच्या मनोहारी कवितेने भक्तिप्रकाशात प्रकाशमान झालेल्या तर दुसरीकडे मुस्लीम राज्यकर्त्यांच्या राज्यविस्तारात गुरफटलेल्या अशा मिश्रयुगात अवतरूनही संत मीराबाई राजस्थानात शुक्राच्या चांदणीप्रमाणे आपले अस्तित्व उमटवून गेलेल्या दिसतात.

❖❖❖



आपल्या अधिकाराचा उपयोग करून मीराबाईंचे सर्व व्याप थांबविण्यास सुरुवात केली. ईश्वरभक्तीत तल्लीन असलेल्या मीराबाई त्याला पाहवेना. त्याने त्यांना नजरकैदेत टाकले. अन्य प्रकारेही तो त्यांना त्रास देऊ लागला. आपल्या काही पदांतून त्यांना झालेल्या त्रासातून ईश्वरानेच आपल्याला कसे वाचवले, हे त्या सांगतात.

१. विष का प्याला राणाजी भेजा पिवत मीराँ हासी रे ।
२. साप पेटारा राणा भेजा मीराँ हात दियो जाय ।
न्हाय धोंय जब देखण लागी सालीगराम गई पाय ।।
३. जहरका प्याला राणा भेजा अमृत दिन्ह बनाया ।
४. सास लडे मेरी ननद खिजावै राणा रहया रिसाई पहरो ।
भी राख्यो चौकी भी बैठा दियो ताला दियो जडाय ।।

अशा प्रत्येक संकटातून कृष्णाने आपल्याला वाचवले, अशी मीराबाईंची गाढ श्रद्धा होती. अशा विपरीत परिस्थितीमुळे मीराबाईंची कृष्णाप्रतीची श्रद्धा आणखीनच दृढ झाली; तथापि वरचेवर होणाऱ्या प्राणघातक कारवायांमुळे त्यांच्या सगुणोपासनेत अडथळे येत होते. त्याला कंटाळून त्यांनी मेवाड सोडले व मेडत्यास आपल्या माहेरी परत आल्या.

तेथे भजन, संकीर्तन व कृष्णभक्तांचे आदरातिथ्य त्यांच्या मनाप्रमाणे होऊ लागले; पण विघ्नसंतोषी लोकांना हेही पाहावले गेले नाही. त्यांचे काका विरमदेव

यांनी विधवा स्त्रीचे असे आचरण खपवून घेतले नाही; म्हणून मेडता सोडून मीराबाई वृंदावनास आल्या. वृंदावनात काही काळ ईश्वरभक्तीत व्यतीत केल्यावर त्या द्वारकेस आल्या. कृष्णप्रेमात आकंठ बुडालेल्या त्या कृष्णासमोर मग्न होऊन नाचत असत. हळूहळू त्यांची कीर्ती दूरवर पोचू लागली. त्यांच्या पदांना लोकांकडून प्रतिसाद मिळू लागला. गावोगावीचे लोक तसेच अनेक वैष्णव साधू त्यांच्या दर्शनास येत. 'मेवाडमधील सत्ता बदलल्यावर राणा उदयसिंहने मीराबाईंना परत बोलविण्यासाठी काहीजणांना द्वारकेस पाठवले; पण मीराबाईंच्या प्रारब्धात परत येण्याचे नव्हते. मीराबाईंनी त्यांचा आग्रह पाहून आपले जीवन द्वारकाधीशाच्या मूर्तीत समर्पित केले.'[३६]

मीराबाईंनी हिंदी, राजस्थानी, गुजराथी व व्रजभाषेत पदे लिहिली. मीराबाईंच्या ललिता नावाच्या दासीने ही पदे लिहून घेतली. 'गीतगोविंद की टीका', 'नरसीजी रो माहरा पदे', 'सोरठ रागातील पदसंग्रह', 'राग मल्हार', 'राग गोविंद', 'मीरानी गर्बी रुक्मिणी मंगल' इत्यादी काही पदे त्यांनी लिहिली आहेत.

'मीराबाईंनी पदांच्या रचनेसाठी तत्कालीन लोकभाषेचाच वापर केला. तरीही त्यातूनच प्रसंगानुरूप अलंकार आढळतात. विशेषतः उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अनुप्रास ह्यांचा वापर ठिकठिकाणी आढळतो. त्यांना



गायनकलेचे तसेच नृत्यकलेचे उत्तम ज्ञान होते. त्यांच्या पदांमध्ये मालकंस, कलिंगडा, काछी, सोरठ, जंगली, भैरवी, कामोद, तारुबिहाग, सारंग, निलांग, खमाज, मल्हार, जौनपुरी, यमन, भीमपलास, जयजयवंती, श्यामकल्याण असे कितीतरी राग आढळतात.'[३७]

संत मीराबाई म्हटल्यावर कोणी समाजसुधारक, महात्मा, समाजपरिवर्तन करणारी अशी स्त्री डोळ्यासमोर येत नाही किंवा तिने जगाकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोनही दिला नाही; परंतु गिरिधर नागराशी एकरूप होणे, त्याच्यातच शेवटी विलीन होणे, त्यामुळेच भक्तीची एक नवीन परिभाषा तिच्या रूपाने आपल्यासमोर उभी राहते. कृष्णावर असलेली गोपींची भक्ती व मीराबाईंची कृष्णावरील भक्ती यांत बरेच साम्य आहे. त्यामुळे तिला 'गोपींचा अवतार' म्हणूनही संबोधले जाते. मीराबाईंच्या कृष्णभक्तीत पतिपत्नीभावाची मधुरता, प्रेममयता आहे; पण शृंगारिक भावांना तिच्या भक्तीत स्थान नाही. मधुराभक्तिपर त्यांच्या रचना आहेत.

मीराबाईंनी आपल्या पदांत श्रीकृष्णविरहाचे जे वर्णन केले आहे, त्याचे पूर्णत्व होताना दिसत नाही. त्यांची विरहसाधना अंतिम क्षणापर्यंत तशीच राहिलेली दिसते. मात्र सशरीर भगवंताच्या मूर्तीत विलीन होऊन त्याचे समापन होते.

एकीकडे संत कबीर, तुलसीदास, सुरदास या

ये' अशी मनोमन विनवणी करीत त्या अश्रू ढाळीत राहिल्या. शेवटी देवाला त्यांची दया आली. पंढरीत विटेवर उभा असलेला देवाधिदेव सखूबाईंची हाक ऐकून कराडला धावला. रात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर सखूबाईंचेच रूप असलेली एक स्त्री 'सखू, सखू' अशी हाक मारीत बांधलेल्या सखूबाईंसमोर उभी राहिली. 'तुला पंढरीला नेण्यास मी आली आहे' असे म्हणून तिने सखूबाईंना बंधमुक्त करून क्षणार्धात यात्रेकरूंच्या गर्दीत पोचवले व स्वतः सखूबाईंच्या जागी उभी राहिली.

पंढरपुरात पोचल्यावर श्रीविठ्ठलाच्या दर्शनाला गेलेल्या सखूबाईंनी 'पांडुरंगाची शिव ओलांडून मी परत जाणार नाही' अशी प्रतिज्ञा केली आणि पंढरीच्या पायाशी प्राण सोडले. हा प्रकार कराडच्या एका यात्रेकरूने पाहिला. सखूबाईंना ओळखून त्यांनी सखूबाईंच्या देहाला अग्निसंस्कार केला.

इकडे सखूबाईंचे रूप धारण केलेले श्रीहरी सखूबाईंची कामे करीत होते. पंढरपुरात श्रीहरीच्या वियोगाने रुक्मिणीमाता चिंतातुर झाल्या. सर्व परिस्थिती जाणल्यावर त्यांनी सखूबाईंना अमृतदृष्टीने जिवंत केले. रुक्मिणीमातेच्या आज्ञेने सखूबाई कराडला परत आल्या. नदीवर सखूबाईंच्या रूपात असलेल्या श्रीहरींना भेटल्या.

घरी परत आल्यावर एका वेगळ्याच गोंधळाला



# ८. सोशिकतेच्या मूर्ती : संत सखूबाई
## (१५ – १६ वे शतक)

अतिशय थोर विठ्ठलभक्त आईवडिलांच्या पोटी संत सखूबाईंचा जन्म झाला. श्री छत्रपती शहाजी महाराजांच्या पदरी ते होते. शिखर शिंगणापूरच्या शंभूमहादेवाची पूजा त्यांच्याकडे होती. सर्वसंग परित्याग करून कृष्णाकाठी वास्तव्य करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केल्यावर छत्रपतींनी त्यांना कराडला श्रीविठ्ठल मंदिर बांधून दिले. सखूबाईंवरसुद्धा आईवडिलांचे तसेच आजोबांचे विठ्ठलभक्तीचे संस्कार दृढ झाले होते. सखूबाई उपवर झाल्यावर त्यांचा विवाह करण्यात आला. सासरी मात्र त्यांच्या विठ्ठलभक्तीला फारसा थारा नव्हता. घरात सासूसासरे व पती असे कुटुंब होते. पती निष्क्रिय होता. सासरेबुवांची घरावर सत्ता नव्हती. सासूच सर्व घरात प्रमुख असा कारभार होता. त्यामुळे सासरची सर्व कर्तव्ये पार पाडून मिळेल त्या वेळात सखूबाई विठ्ठल चिंतन, विठ्ठल अनुसंधान जमेल तेवढे करीत असत.

सासरचे कर्तव्य व विठ्ठलभक्ती ह्या दोन्ही गोष्टी सखू व्यवस्थित पार पाडीत असली, तरी स्वभावाने अतिशय कजाग, खाष्ट सासूबाईला सुनेचा चांगुलपणा पाहावला जात नसे. सखूच्या मागे सकाळपासून रात्रीपर्यंत कामेच

कामे असायची. नदीवरून घागरीने रांजणभर पाणी भरणे, झाडलोट, घर सारवणे, भांडी घासणे, नदीवर जाऊन कपडे धुणे, स्वयंपाक, निवडण, टिपण असा कामांना अंत नव्हता. प्रामाणिकपणे आपली कामे पार पाडणाऱ्या सखूला त्याविषयी तक्रारही नव्हती; पण सुनेचा शांतपणा पाहून तिची सासू मुद्दाम तिला फटकळपणे बोलणे, तिच्या कामात चुका शोधणे, तिच्याविरुद्ध मुलाचे कान भरणे असे प्रकार करीत असे. यांतूनही मन नाही भरले, तर सुनेने भरलेला रांजण उबडून तो पुन्हा भरावयास लावीत असे. असे सर्व हाल सोसून सखूबाईंना आपली कामे करताना फक्त एकाच गोष्टीची सोबत होती, ती म्हणजे 'रामकृष्णहरी' हा अखंड जप होय. सखूच्या आपल्याशीच या पुटपुटण्यामुळे तिचा राग अनावर होत असे; पण छळाचे कितीही प्रकार शोधले तरी सखूचा तो अखंड जप थांबवणे तिच्या हातात नव्हते.

विठ्ठलभक्तीत निमग्न झालेल्या सर्व भक्तांप्रमाणे सखूचीही पंढरपूरला जाण्याची मनस्वी इच्छा होती; पण तसा योग तिच्या नशिबात नव्हता. 'नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे होय. सर्वस्वी देवाचे होऊन राहावे, म्हणजे आपण जे करतो, ते अर्पणच होते. सखूची विठ्ठलाप्रतीची भक्ती ही अर्पण भक्ती होती.'[३८]

देवाच्या मनात आले तर काय होऊ शकत



नाही? देवाच्या मनात सखूबाईंची इच्छा पूर्ण करण्याचे आले असावे. म्हणून एकदा पंढरीला निघालेल्या वारकऱ्यांचा सखूच्या गावात तळ पडला. नदीच्या काठी वारकरी दिंडीसह पोचलेले असताना तेथे भजन आणि विठूनामाच्या गजराने वातावरण दुमदुमून गेले. नेहमीप्रमाणे पाणी भरण्यासाठी आलेल्या सखूबाईंना दिंडीतील नामघोष ऐकू आला. आजपर्यंत ज्यासाठी त्या तळमळत होत्या, तीच गोष्ट त्यांच्यासमोर होती. त्या टाळमृदंगाच्या नादाने पंढरीच्या जयघोषाने त्यांच्या मनाचा ताबा घेतला. सर्व मोह, माया, दुःख यांचा त्याग करून त्या वारकऱ्यांसह पंढरीला जायला निघाल्या. त्यांच्यासोबत पाणी भरण्यास आलेल्या इतर सासुरवाशिणींना त्यांनी 'मी वारकऱ्यांसोबत पंढरीला जाते' असा निरोप दिला.

त्या सासुरवाशिणींमधल्या एका चुगलखोर स्त्रीने सखूबाईंच्या सासूला सांगितले की तुमची सून वारकऱ्याचा हात धरून पंढरपूरला निघून गेली आहे. हे ऐकून आधीच खाष्ट असलेल्या सासूचा क्रोध अनावर झाला. तिने आपल्या मुलास सखूबाईंना फरफटत घेऊन येण्याची आज्ञा केली. सखूबाईंना घरी आणल्यावरही सासूचा राग शमला नाही. त्या दोघांनी सखूबाईंना खांबाला करकचून बांधून ठेवले. बांधलेल्या अवस्थेत सखूबाई केवळ ईश्वराची करुणा भाकत राहिल्या. 'बांधून पडल्यामुळे तुझ्या चरणाला अंतरले. धावत

सोयराबाई व चोखोबा यांचा दिनक्रम अतिशय सरळ होता. सकाळी उठून झाडलोट करावी, स्नानादी विधी आटोपून शुभ्रवस्त्रे धारण करावीत व विठ्ठलाचे ध्यान करावे असा त्यांचा वेळ जाई. अतिशय संस्कारित व पारमार्थिक असे त्यांचे जीवन होते.

असे सर्व वरवर समाधान दिसत असले तरीही सोयराबाई मनातून दुःखी होत्या. अपत्याशिवाय त्या स्वतःला अपूर्ण मानीत होत्या. पांडुरंगाची तळमळीने विनवणी करून त्या अपत्यासाठी प्रार्थना करीत.

अखेर पांडुरंगाला त्यांची दया आली. ब्राम्हणाचे रूप घेऊन तो सोयराबाईंच्या घरी गेला. त्यांची विचारपूस करून त्यांच्या तोंडून त्यांचे दुःख ऐकून घेतले. त्यांचे सांत्वन करून नंतर आपल्याला भूक लागली आहे, असे म्हणून भोजन करण्याची इच्छा व्यक्त केली. यावर विचारात पडलेल्या सोयराबाई म्हणाल्या, ''आम्ही अस्पृश्य. आमच्या हाताने भोजन दिल्यास ब्राम्हणास बाटविले म्हणून लोक आम्हांस मारतील.''

यावरही तो ब्राम्हण ऐकेना. एकीकडे ब्राम्हणाला बाटविण्याची भीती तर दुसरीकडे उपाशी अतिथी. 'अतिथी देवो भव' या भारतीयांच्या उक्तीला साजेसेच त्यांनी वर्तन केले आणि ब्राम्हणाला दहीभात वाढून पाणीही प्यावयास दिले.



त्यांना तोंड द्यावे लागले. पंढरपुरात भेटलेला तो यात्रेकरू – ज्याने सखूबाईंच्या देहावर अग्निसंस्कार केले होते – तो सखूबाईंच्या कुटुंबीयांना त्यांच्या मृत्यूची बातमी सांगत होता. सखूबाईंना खोदून खोदून याचे कारण विचारले असता, सखूबाईंनी सर्व कहाणी कथन केली. सखूबाईंच्या रूपाने साक्षात प्रभू आपल्या घरात राहिले, घरातील सर्व कामे केली, बोलणी खाल्ली हे आठवून सासरची मंडळी पश्चात्तापाने दग्ध होऊन स्वतःला दोष देऊ लागली. सखूबाईंची महानता त्यांच्या लक्षात आली व तिचा छळ करायचे त्यांनी सोडून दिले.

पुढे आपला भक्तिमार्ग चोखाळून त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत ईश्वराची आराधना सोडली नाही. अनंतात विलीन झाल्यावर त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या आजोबांच्या विठ्ठलमंदिरासमोर त्यांचे समाधी–स्थान करण्यात आले. कराडच्या भूमीला संत सखूबाईंच्या रूपाने एक वेगळेच पुण्यत्व प्राप्त करून दिले आहे. 'वारकरी संप्रदायात होऊन गेलेल्या संत सखू यांच्या अस्तित्वाविषयी अनेक वादविवाद असले तरी विठ्ठलभक्तीची अतिउच्च अवस्था म्हणजे स्वरूपावस्था ही त्यांनी प्राप्त करून घेतल्याचे मान्य केले जाते.'[३९]

भक्तिमार्गाला लागून आत्मोद्धारासाठी तळमळत असलेल्या सखूबाई सर्व प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत

सासरच्यांचा छळ सहन करीत, प्रसंगी मृत्यूचे अग्निदिव्य पार करून ईश्वरप्राप्तीचे आपले ईप्सित साध्य करतात, ही गोष्ट सर्वसामान्य संसारी पण मुमुक्षू गृहिणींसाठी प्रेरणादायक आहे.

❖❖❖



# ९. संत सोयराबाई

(तेरावे — चौदावे शतक)

संत चोखामेळा हे अतिशय गरीब आणि तत्कालीन अस्पृश्य समाजात जन्माला आले. सोयराबाई ह्या त्यांच्या पत्नी. समाजात पिढ्यानूपिढ्या चालत आलेल्या स्पृश्यास्पृश्य द्वंद्वात भरडले गेलेले हे जीव. उच्चवर्णीयांची तुच्छतादर्शक दृष्टी सहन करीत आपले जीवन जगायचे असे त्यांचे प्राक्तन; पण संत चोखामेळा यांना संत नामदेवांचा सहवास लाभला आणि आत्मोद्धाराचा मार्ग सापडून त्यांची आध्यात्मिक उन्नती झाली. विठ्ठलाचा नाममहिमा गाण्याचा सोपा मार्ग त्यांना लाभला.

सोयराबाई या अतिशय पारमार्थिक प्रवृत्तीच्या अशा पतिव्रता स्त्री होत्या. मंगळवेढा हे त्यांचे गाव. चोखोबांनी अध्यात्माच्या प्रवासात त्यांनाही बरोबर घेतल्यामुळे दोघांनी मिळून या प्रवासात बरीच प्रगती केली. संतांच्या नामावलीत आपलेही नाव दाखल केले.

संत तुकारामांनी त्यांच्याविषयी ‘चोखामेळा संत जीवासी आवडे । विसर न पडे त्याचा मज ।।’ असे गौरवोद्गार काढले आहेत तर संत एकनाथ महाराज त्यांच्याविषयी म्हणतात, ‘चरणतळीची वीट निर्मळ । तो हा जाण चोखामेळा ।।’

आपण हीन कुळात जन्मलो त्यामुळे लोकांच्या तुच्छ नजरा सोसाव्या लागल्या. सामान्यांचे समाधानी जगणे आमच्या वाट्याला आले नाही. या आपल्या दुर्दशेचे कारण विचारत त्यातून बाहेर काढण्याची विनंती त्या विठ्ठलाला करतात.

'लोटलेसे महानदी । नाही शुद्धी देहाची ।।
बुडले काढावे बाहेरी । म्हणे चोख्याची महारी ।।'

संसार हा मोहात टाकणारा, मृगजळाप्रमाणे भ्रामक आहे; म्हणून संसार करताकरता परमार्थप्राप्तीचा प्रयत्न केल्यास ह्या मोहमयी संसारातून सुटका होऊ शकते. असा उपदेश त्या करतात. विठ्ठल आणि आपण असे द्वंद्व नाहीसे झाल्यावरची आपली विदेही अवस्था त्या अतिशय तन्मयतेने रंगवितात.

सहज शब्दांत ईश्वराशी अद्वैत सांगणाऱ्या, पतिव्रतेच्या भूमिकेला योग्य न्याय देत ईश्वरचरणी समर्पित होणाऱ्या, आपल्या शब्दसृष्टीने भक्तीच्या नानाविध रचनांना जन्म देणाऱ्या, 'चोखियाची महारी' बनून संतपदाला पोचलेल्या सोयराबाईंचे नाव संतपरंपरेत आदराने घेतले जाते. 'या दीपकळ्यांनी भागवत धर्ममंदिराचा गाभारा सुशोभित व प्रसन्न केला आहे यात शंका नाही.'[४०]

❖❖❖



उपाशी असलेला तो ब्राम्हण ताटातील अन्न अधाशीपणे खाऊ लागला. हे पाहून सोयराबाईंचे मन भरून आले. भोजन करून तृप्त झालेल्या ब्राम्हणाने त्यांचे आभार मानले. सोयराबाईंनी ब्राम्हणाच्या ताटातील उष्टे अन्न प्रसाद म्हणून ग्रहण केले व ब्राम्हणाने त्यांना अपत्यप्राप्तीचा आशीर्वाद दिला. सोयराबाईंच्या मनातील सर्वात मोठे दुःख दूर होण्याचे चिन्ह दिसू लागले.

संध्याकाळी कामावरून परत आलेल्या चोखोबांना सोयराबाईंनी सर्व हकिकत सांगितली. चोखोबा घाबरले आणि रागावलेही. एका ब्राम्हणाला आपण बाटविले याची शिक्षा आपल्याला होणार, लोक आपल्याला मारणार असे म्हणून ते सोयराबाईंना दोष देऊ लागले. त्याही मनातून घाबरल्या; पण आपली काहीही चूक नाही याची जाणीव त्यांना होती. चोखोबांच्या व्यर्थ रागावण्याला त्यांनी सडेतोड उत्तर दिले.

'देहासी विटाळ म्हणती सकळ ।
आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध ।।
देहीचा विटाळ देहीच जन्मला ।
सोवळा तो झाला कवण धर्म? ।।
विटाळावाचोनि उत्पत्तीचे स्थान ।
कोण देह निर्माण नाही जगी ।।'

सोयराबाईंच्या या समर्पक उत्तराने चोखोबांनाही

धीर आला. यथाकाल सोयराबाईंना दिवस गेले. ब्राम्हणाचा आशीर्वाद फळाला आला. त्यांची आत्यंतिक इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गी लागली. सोयराबाईंचे दिवस भरत आले. अतिशय गरीब परिस्थितीत जगत असलेल्या चोखोबांकडे बाळंतपणाची काहीच व्यवस्था नव्हती. त्यासाठी ते आपली बहीण निर्मळा हिच्याकडे गेले व काही कारणाने तेथे अडकले. इकडे सोयराबाईंना प्रसुतीवेदना सुरू झाल्या. त्या चोखोबांची तीव्रतेने वाट पाहत होत्या. त्या वेळचे वर्णन संत नामदेवांनी केले आहे.

'झाली तेव्हा श्रमी प्रसूत वेळा आली ।
विठाई धाविन्नली तेच वेळा ।।
चोखोबाची बहीण झाला सारंगधर ।
वहिनी उघडा द्वार हाका मारी ।।'

संकटात सापडलेल्या सोयराबाईंच्या मदतीला प्रत्यक्ष विठ्ठल निर्मळेचे रूप घेऊन आला. सोयराबाईंना मुलगा झाला. त्याचे नाव कर्ममेळा ठेवले. इकडे चोखोबा निर्मळेच्या गावातच अडकले होते. तर तिकडे बाळंतपणाचे सर्व सोपस्कार पार पाडून निर्मळारूपी विठ्ठल परत जाण्यास निघाला. जाताना दादावर (चोखोबांवर) रागावू नको असा सल्लाही त्या निर्मळेने दिला. काही वेळाने चोखोबा परत आले. पत्नीच्या काळजीत असताना घरी मात्र पत्नी आणि मुलगा आनंदात असल्याचे पाहून त्यांना आश्चर्य वाटले.



आपण निर्मळेकडे असताना तिने आपल्या पत्नीचे बाळंतपण केले हे ऐकताच त्यांना जाणवले की प्रत्यक्ष पांडुरंग आपल्या मदतीसाठी येऊन गेला. विठ्ठलाने आपल्यासाठी एवढे कष्ट घेतले हे पाहून चोखोबा आणि सोयराबाईंचेही डोळे भरून आले.

'सद्गदित झाले दोघांचे अंतर ।
प्रेम अश्रुनीर वाहे डोळा ।।
भक्तांसी संकट पडोनेदी देव ।
घेतसे धाव त्यांच्या काजा ।।'

प्रत्यक्ष विठ्ठलाची कृपा झाल्याने चोखामेळा, सोयराबाई, कर्ममेळा हे सर्वच कुटुंब पांडुरंगाच्या सेवेत समर्पित झाले. आपले आयुष्य त्यांनी विठ्ठलाच्या चरणी वाहिले. अचानक अपघातात चोखोबांचा मृत्यू झाला. मंगळवेढ्यात गावकूस बांधण्याचे काम करीत असता ते कोसळून पडले. त्याखाली काम करणारे अनेक कामगार चिरडून मरण पावले. विठ्ठलभक्त चोखोबांच्या अस्थी नामदेवाने पंढरपुरास आणून महाद्वाराजवळ पुरल्या. त्यावर चोखोबांची समाधी बांधली.

सोयराबाईंनी एकूण ६२ अभंग लिहिले. सकलसंतगाथेत त्यांचा समावेश आहे. विविध भावभावनांचे दर्शन असलेल्या या अभंगांत प्रामुख्याने स्वतःच्या जन्माविषयीची व्यथा त्यांनी व्यक्त केली आहे.

# ११. योगसाधनांच्या प्रणेत्या :
# संत तरिगोंडा वेंकम्बा

## (अठरावे शतक)

तेलगू संत कवयित्री वेंकम्बा यांचा जन्म आंध्रप्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात वायपाडू तालुक्यात तरिगोंडा गावी अठराव्या शतकात झाला. वडिलांचे नाव कृष्णमात्युडू तर आईचे नाव मंगम्बा. आईवडील दोघेही तिरुमल वेंकटचलाचे भक्त होते. प्रपंचात राहून योग्यप्रकारे ते परमार्थाला प्राधान्य देत होते. अशा आध्यात्मिक वातावरणात वेंकम्बा वावरत असल्यामुळे त्यांच्यावरही भक्तीचे संस्कार होऊ लागले. परमार्थाकडे बालपणापासूनच त्यांचा ओढा होता. त्यामुळे त्यांच्यातील आध्यात्मिक गुणांचा भराभर विकास होऊ लागला. भक्तीसोबतच ईश्वराचे गुण गात देवाबद्दलच्या सूक्तांची त्यांनी निर्मिती केली. हळूहळू त्यात प्रवीण झाल्यामुळे त्यांची कीर्ती आजूबाजूला पसरली. त्यांची भक्ती व भक्तीची अभिव्यक्ती पाहून लोकांनी त्यांना 'संत कवयित्री' ही उपाधी दिली. तेलगू संतसाहित्यात संत कवयित्री तरिगोंडा वेंकम्बा यांचा उल्लेख आजही अत्यंत आदराने केला जातो.

अठराव्या शतकात राज्याराज्यातील संतांमध्ये कर्मयोगाला महत्त्व देण्याची पद्धत दिसून येते; परंतु वेंकम्बांनी



# १०. चोखोबांच्या शिष्या :
# संत निर्मळा

## (चौदावे शतक)

संत निर्मळा यांचा विचार करताना प्रथम त्यांचे बंधू चोखामेळा व वहिनी सोयरा यांच्याशी असलेले संबंध लक्षात घेणे गरजेचे आहे. चोखामेळा हे बंधूच नाही, तर गुरुही होते. 'संत निर्मळाबाईंचे चरित्र अभ्यसताना संत चोखामेळा, संत सोयराबाई, कर्ममेळा आणि बंका यांमध्येच ते गुंतलेले आहे. किंबहुना संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत तुकाराम यांनीही चोखामेळा आणि त्यांच्या कुटुंबीयांचे चरित्र लिहिलेले आढळते. यावरून या कुटुंबाची आध्यात्मिक उंची लक्षात घेण्यासारखी आहे.'[४१]

चोखोबांच्या चरित्रातील विठ्ठलाच्या कृपेची कथा 'संत सोयराबाई' या भागात वर्णिली आहे. त्यावरून चोखोबांच्या कुटुंबातील विठ्ठलभक्तीतले सामर्थ्य लक्षात येते.

'सकळसंतगाथे'मध्ये संत निर्मळाबाईंचे एकूण चोवीस अभंग उपलब्ध आहेत. चोखोबांच्या कुटुंबीयांचे लौकिक आणि पारलौकिक विचारांचे प्रतिध्वनी एकमेकांच्या अभंगांत उमटले आहेत. विठ्ठलनाम घेण्याशिवाय आपल्याजवळ अन्य साधन नसल्यामुळे तेवढ्याच बळावर

दर्शन देण्याचा आपला छंद पुरवावा, असे निर्मळा देवाला विनवितात.

निर्मळाबाईंच्या सर्व अभंगांतून प्रामुख्याने विद्रोह, अवहेलना, व्याकुळता व्यक्त झाली आहे. भावकाव्याचा अभाव असलेल्या त्यांच्या काव्यात तत्कालीन विषम समाजव्यवस्थेचे बळी ठरल्यामुळे येणारी उदासीनता, वैफल्य, नैराश्य या भावनांचा पूर आणि त्यामुळे येणारा तक्रारीचा सूर यांचे प्राबल्य दिसून येते.

संत निर्मळाबाईंना संतसज्जनांच्या सहवासाने पंढरपूरच्या विठ्ठलाचे वेड लागले होते. विठ्ठलाच्या भक्तीपुढे त्यांना संसाराची आणि शरीराची नश्वरता कळून आली. त्या शाश्वत अशा आत्मज्ञानाच्या प्राप्तीकरिता वाटचाल करू लागल्या.

त्यांच्या अभंगात ईश्वरभेटीची तळमळ तर आहेच; पण अस्पृश्य अशा उपेक्षितांचे सामाजिक दुखणे जगासमोर मांडण्याचे धाडस करणारी अशी त्यांची काव्यरचना आहे. समाजाकडून मिळणाऱ्या उपेक्षेमुळे आपण संतांच्या पूजनाला मुकलो, असे त्यांच्या मनात दुःखही आहे.

आपले गुरू असलेले बंधू संत चोखोबा यांच्याविषयी त्या अभंगांतून आत्यंतिक प्रेम व आदर व्यक्त करतात. 'निर्मळा म्हणे चोखिया सुजाण । पंढरीचा राणा जिवी धरी ।।' असे त्या उद्गार काढतात. पंढरीच्या दर्शनाने



आणि नामस्मरणाने आपल्या जीवाचे सार्थक होईल, असा त्यांचा विश्वास आहे. 'मज नामाची आवडी । संसार केला देशोधडी ।। सापडले वर्म सोपे । विठ्ठल नाममंत्र जपे ।।'

पुण्यप्राप्तीसाठी मरमर करणाऱ्या, त्यासाठी नाना विधी, शास्त्रे यांचा आधार घेणाऱ्यांना उद्देशून निर्मळाबाई म्हणतात की, विठ्ठलनामाच्या रूपाने त्यांना भक्तीची वाट गवसली आहे. हा मार्ग इतका सुलभ, सोयीस्कर आहे, की या मार्गापुढे सारी शास्त्रेही कमी पडतात. अनंत जन्मी जगून मिळवलेले पुण्य यापुढे एका जन्मातील नामस्मरणाचे पुण्य भारी पडते. संत निर्मळाबाईंचे विचार त्यांच्या ज्ञानी व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे. आपल्या या अवस्थेला अप्रत्यक्षपणे आपला भाऊ कारण आहे, हे त्या जाणून आहेत.

संत निर्मळा यांच्या अभंगांतून स्वतःविषयीचे कारुण्य आहे. समाजाची त्यांनी केलेली निर्भर्त्सना आहे. त्यामुळे काहीसे कठोर असे त्यांचे अभंग वाटतात; पण सर्व दुःखातून पार नेणारा तो पंढरीराया, त्याचीच भक्ती केल्यास जन्मोजन्मीची पुण्याई फळाला येईल, असा त्यांचा आत्मविश्वास, यांमुळे त्यांच्या अभंगांना एक वेगळेच परिमाण लाभलेले दिसते.

❖❖❖

# १२. परम विठ्ठलभक्त : संत कान्होपात्रा

(ज्ञानेवर समकालीन अथवा जन्म इ.स. १४६८)

संत कान्होपात्रा या मंगळवेढ्याच्या श्यामा नामक वेश्येच्या पोटी जन्माला आल्या. वेश्येच्या पोटी जन्म झाल्यामुळे आपल्या पावलावर पाऊल टाकून मुलीनेही आयुष्य आरामात जगावे, असे त्यांच्या आईला वाटत होते. त्यात कान्होपात्रा रूपाने अतिशय सुंदर होती. त्यांच्या रूपाची कीर्ती सर्वदूर पसरलेली होती. कान्होपात्रा मात्र जणू चिखलात उगवलेले कमळ होते. शरीर आणि संगीत यांचा विक्रय करणारे आयुष्य त्यांना मान्य नव्हते. त्यांचे कोवळे मन भक्तिमार्गाकडे आकृष्ट झालेले होते. वंशपरंपरागत व्यवसायापासून दूर जाण्याची इच्छा कशी पूर्ण व्हावी, हे त्यांना कळत नव्हते.

अशातच एक दिवस काही वारकरी मंगळवेढ्यातून टाळमृदंगाचा घोष करीत पंढरपूरला चालले होते. कान्होपात्रा यांनी 'तुम्ही कोठे चालले आहात?' असे विचारले. त्यांनी 'पांडुरंगाकडे' असे उत्तर देऊन पांडुरंगाबद्दलची माहिती त्यांना सांगितली. हे सर्व ऐकून कान्होपात्रांच्या मनात पांडुरंगदर्शनाबद्दल उत्सुकता निर्माण



आपल्या साहित्यात दिनक्रमात किंवा जीवनातील असंख्य कठीण गोष्टींना सामोरे जाण्यासाठी भक्तिरस किंवा उपासना यांचे महत्त्व सांगितले. आज सर्वत्र प्रचलित असलेला योगमार्ग याचा पाया संत तरिगोंडा वेंकम्बा यांच्या 'राजयोग सारम्' या ग्रंथात घातलेला दिसतो. शारीरिक व मानसिक अवस्था बळकट करावयाची असेल तर योगविद्या, योगसाधना या गोष्टींतून ही बळकटी मिळू शकते. मनस्वास्थ्य, एकाग्रता यांसाठीही योगमार्गाचा अवलंब केल्या जातो.

त्यांच्या 'भागवत' ग्रंथात सामाजिक व आत्मिक प्रगतीला उपकारक होतील, अशी जीवनमूल्ये सांगितली आहेत. कर्मनिष्ठा, भूतदया, परोपकार, प्रेम, शांती, दया, क्षमा, करुणा अशा अनेक मानवतावादी मूल्यांची त्यात जोपासना केली आहे.

आपल्या 'वेंकटाचल मलय' या ग्रंथात वेंकम्बा म्हणतात की, आंध्रगिर्वाण महदरचनांचा तृप्त आस्वाद घेतलेल्यांना माझ्या रचनांचा आस्वाद म्हणजे पंचपक्वान्नांच्या येथेच्छ भोजनानंतर लोणच्याची लज्जत चाखावी, असे वाटेल. त्यांच्या अशा बोलण्यातून त्यांचा विनय, स्वतःविषयीचा आत्मविश्वास दिसून येतो. ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वर 'अवधारिजोजी' असे म्हणत श्रोत्यांशी संवाद साधतात, त्यामागे श्रोत्यांचा मान राखणे हे उद्दिष्ट तर आहेच; पण जे आता सांगणार आहे, ते अतिशय महत्वाचे आहे. तेव्हा

लक्ष दिल्यास चांगले होईल, अशी ही एक भावना आहे. वेंकम्बांच्याही प्रत्येक रचनेच्या सुरुवातीस त्यांच्या भाषेत 'कृपया ऐकावे' असे अत्यंत विनयाने श्रोत्यांना संबोधलेले दिसते.

'वेंकटाचलमहात्म्य' या ग्रंथात अनेक कथा आहेत. यातील प्रधान कथा 'श्रीनिवासकल्याणम्' ही आहे. वराहपुराणातील सहा आश्वासाचा हा ग्रंथ म्हणजे वेंकम्बांनी आपल्या भक्तीने सुशोभित केलेले एक अपूर्व शिल्प आहे.

संत तरिगोंडा वेंकम्बा यांच्या सर्व रचना भक्तिरसाने परिपूर्ण, वेदान्ताच्या आशयाने गुंफलेल्या आहेत. त्यांची प्रतिमा नुसतीच कवयित्री नाही तर 'परमभागवती रूपाणी' या कीर्तीने प्रसिद्ध आहे. त्यांच्याबद्दलच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. त्या जितक्या साहित्यिक थोर विदुषी होत्या, तितक्याच पराकोटीच्या विनयशील होत्या.'[४२] संत तरिगोंडा वेंकम्बा यांची विनयशीलता संत बहिणाबाईंशी साम्य दर्शविते. बहिणाबाईंच्या रचनेतील मांडणी, अनुभवविश्वता संत तरिगोंडा वेंकम्बा यांच्याही काव्यात आढळते.

विश्वसाहित्यात नोंद असलेल्या या कवयित्रीची महत्ता साहित्यात आहे की तिच्या महायोगिनी असण्यात आहे, हा प्रश्न पडल्यावर दोन्हीही बाबतीत त्या महान आहेत, हेच उत्तर मिळते. तिरुमल वेंकटचलाची आराधना,



तेच आपले दैवत हे ब्रीद त्यांनी आजन्म पाळले. आजही त्यांच्या भक्तिरचनांनी तेलगू साहित्यात मानाचे स्थान मिळविले आहे.

❖❖❖

माझा आहे भोळा बाप । घेतो ताप हरोनी ।।'

ज्ञानदेवांच्या भागवतधर्माने समाजातील तळागाळातील थरातही जागृती घडवून आणली. स्त्रियांना आध्यात्मिक अधिकार प्राप्त झाले. या आध्यात्मिक उन्नयनाचा परमोच्च बिंदू कान्होपात्रेच्या रूपात दिसतो. जास्तीत जास्त संत कवयित्रींना कुणा ना कुणा संतगुरूंचा आधार लाभला आहे. संत मुक्ताबाईंना त्यांच्या भावंडांचे मार्गदर्शन होते, तर वेणाबाईंना रामदासांचे. जनाबाईंवर नामदेवांचा प्रभाव होता, तसा कान्होपात्रांना कुणाचाच आधार नव्हता. त्या विकसित झाल्या, आपल्या अंतःप्रेरणेने. म्हणूनच मुक्ताबाई, वेणाबाई किंवा संत कवयित्रींएवढा त्यांचा आध्यात्मिक अधिकार फार मोठा नव्हता. आत्मसाक्षात्काराची नाममुद्रा उमटवतील असे त्यांचे अभंग जवळजवळ नाहीतच. त्यांचे अभंग फक्त भक्तीनेच रंगलेले दिसतात. बेदरच्या बादशहाने त्यांची अभिलाषा धरली असता त्यांनी विठ्ठलाला मारलेली आर्त हाक एक अमर भावकाव्य ठरलेले आहे.

'नको देवराया अंत आता पाहू ।
प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।।'

'कवित्वाचा तसा कोणताही संस्कार तिच्यावर नाही. परंतु विठ्ठलप्रेमाने घमघमलेली ती जणू चंदनवेल आहे. आंतरिक उमाळ्याने तिने गायलेले अभंग आजही भावकवितेच्या रूपाने घराघरांत पोचलेले आहेत.' [४४]



झाली; पण आपल्या व्यवसायाची जाणीव असल्यामुळे पांडुरंग दर्शनास संकोचू लागल्या. तेव्हा भाविकांनी त्यांना 'पांडुरंग भक्तीचा भुकेला आहे. दुसरे काही त्याला प्रिय नाही. जातपात, वंश, कुळ असा कुठलाही भेद तो मानीत नाही' असे सांगितले. हे ऐकून समाधानाने त्यांनी वारकऱ्यांसोबत पंढरपूर गाठले.

पंढरपुरात विठ्ठलाचे सावळे ध्यान पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांच्या साऱ्या भावना विठ्ठलमूर्तीभोवती केंद्रित झाल्या. पांडुरंगाची मनोभावे आराधना हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय बनले.

नियतीला मात्र वेगळेच मंजूर होते. त्यांच्या रूपानेच त्यांचा घात केला. त्यांच्या लावण्याची ख्याती ऐकून बेदरच्या बादशहाच्या मनात त्यांच्याविषयी अभिलाषा निर्माण झाली. त्यांना प्राप्त करण्याच्या हेतूने स्वखुषीने नाहीतर सक्तीने पकडून आणण्याचे फर्मान शिपायांना बादशहाने सोडले. कान्होपात्रांना हे कळल्यावर आपली काही धडगत नाही, हे त्यांनी जाणले. शिपाई त्यांना नेण्यास आले असता कशीबशी त्यांच्याकडून एकवेळ पांडुरंग दर्शनाची परवानगी मागितली. शिपायांनी तशी परवानगी देताच त्या अनन्यभावाने पांडुरंगाला शरण गेल्या. त्यांनी आर्तपणे पांडुरंगाचा धावा करण्यास सुरुवात केली. हृदयातून निघालेले त्यांचे दुःख पांडुरंगाच्याही अंतःकरणाला छेद पाडून गेले. त्यांची विनवणी

ऐकून पांडुरंगाने त्यांना आपल्या 'स्व'रूपात मिसळवून टाकले. तो पवित्र आत्मा पांडुरंगात विलीन झाला. चेतनाहीन शरीर उरले. देवळातील बडवे मंडळींनी त्यांचा मृतदेह देवळाच्या दक्षिण दरवाजाजवळ पुरला. त्या ठिकाणी कालांतराने तरटीचा वृक्ष उगवला. आपल्या देहाची समिधाच जणू त्यांनी पांडुरंगाला अर्पण केली.

संत कान्होपात्रा यांच्या व्यक्तिमत्त्वात अपार निष्ठा आणि उदंड श्रद्धा हे गुण प्रकर्षाने दिसतात. संत कान्होपात्रांच्या नावे 'सकलसंतगाथे'त २३ अभंग आहेत. श्री. ज.र. आजगावकर यांनी 'महाराष्ट्र संतकवयित्री' या ग्रंथात ४ अभंग दिले आहेत. त्यांचे अभंग मुख्यतः विठ्ठलभक्तीला वाहिलेले दिसतात. गणिकेची कन्या असूनही 'कुणाही परुषाला आपला देह विकण्याऐवजी साक्षात पांडुरंगालाच त्यांनी आपले तन, मन वाहून टाकले. म्हणूनच विठ्ठलाचा धावा करताना त्या म्हणतात,

'पतित तू पावना । म्हणविसी नारयणा ।।
जरी सांभाळी वचन । ब्रीद वागविसी जाण ।।
याती शुद्ध नाही भाव । दुष्ट आचरण स्वभाव ।।
मुखी नाम नाही । कान्होपात्रा शरण पायी ।।'[४३]

पंढरपुरात गरुडपारावर बसून कान्होपात्रा नित्य देवाचे भजन करीत असत. स्वतःच्या जन्माविषयी खंत बाळगणाऱ्या स्वतःला दीन, पतित समजणाऱ्या कान्होपात्रांना



देवाने आपले म्हटले, याचे खूप अप्रूप वाटते. त्यामुळे जगातील सर्व नाती विठ्ठलापुढे त्यांना दुय्यम वाटतात. परमेश्वरभेटीचा अनुभव आल्यानंतर ज्याप्रमाणे बाकीची संतमंडळी त्यांचा मार्ग इतर जनांना सांगतात आणि त्यांची वाट मोकळी करतात, त्याप्रमाणे कान्होपात्राही आपल्याला मिळालेला अवर्णनीय आनंद इतरेजनांनाही मिळावा म्हणून सांगतात की, या इहलोकी परमार्थप्राप्तीसाठी दुसरी कोणतीही साधने करू नका. फक्त पंढरीला या आणि माझ्या विठूरायाचे दर्शन घ्या. चारी वेद, सहा शास्त्रे या भगवंताचे गुणगान करताना दमले, हरिहर ब्रम्हादिकसुद्धा ज्याच्यासाठी तप करीत राहिले, शास्त्र, पुराणेही भांबावून जाऊन गप्प राहिले, तो हा पंढरीनाथ माझा धनी आहे. त्याचे नामस्मरण करताना तुमच्याही जन्माचे भले होईल.

पिंगला, अजामीळ किंवा वाल्या कोळी असे सारे पतित नामस्मरणाच्या नावेत बसूनच भवसागर पार करून गेले, हे उदाहरण देऊन कान्होपात्रा म्हणतात की, जीवनात अज्ञानामुळे कितीही पापे केली, तरी एका नामस्मरणाच्या आचरणाने ही पापे धुतली जातात. म्हणूनच कान्होपात्रा म्हणतात, तुम्ही कोणीही असले तरी तुमचे व्याप, ताप नष्ट करणाऱ्या त्या विठ्ठलाला हाक मारा. तो नक्की धावून येईल आणि तुम्हाला पवित्र करेल.

'घ्यारे घ्यारे मुखी नाम । अंतरी धरोनिया प्रेम ।।

जीवनात अध्यात्माचे अंकुर रुजवून गेले. वेणाबाईंना समर्थांचे दर्शन पुन्हा कधी होईल, असा ध्यास लागला. त्या तनाने घरात राहत होत्या; पण मनाने केव्हाच समर्थांकडे पोचल्या होत्या. घरच्यांच्या लक्षात ही अवस्था आली. समर्थांची गोसावी, जोगडा अशी निर्भर्त्सना करून त्यांनी वेणाबाईंना माहेरी पोचती केली. वेणाबाईंच्या मात्र ते पथ्यावरच पडले. कोल्हापुरात समर्थांची कीर्तने सुरू होती. तेथेच समर्थांच्या पायावर डोके ठेवून अनुग्रह द्यावा, अशी विनंती त्यांनी केली. 'सामान्यतः पाहिले तर या वयात कोणत्याही मुलीच्या मनात असले विचार येणे जवळजवळ अशक्यच; परंतु बहिणाबाई, वेणाबाई वगैरे स्त्रिया या सामान्य नियमांस अपवादभूत होत.'[४७]

समर्थांचा अनुग्रह तर मिळाला; पण घरच्यांची नाराजी सहन करावी लागली. वेणाबाईंवर नाही नाही ते आरोप करून त्यांना या मार्गापासून परावृत्त करण्याचा घरच्यांचा प्रयत्न सुरू झाला. वेणाबाई आपल्या निश्चयापासून जराही ढळल्या नाहीत. शेवटी घरच्यांनी त्यांच्यावर विषप्रयोग केला. जहाल विषामुळे तडफडणाऱ्या वेणाबाईंना एका खोलीत बंद केले गेले. तेथे समर्थ प्रकट झाले. त्यांनी आपल्या स्पर्शाने वेणाबाईंच्या वेदना दूर केल्या. बाहेर येऊन घरच्यांना स्पष्टपणे सांगितले, 'तुम्ही हिला मारण्याचा प्रयत्न केला. तुमच्या दृष्टीने आता हिचा मृत्यू झाला आहे. हिचा नवा



उत्कट विठ्ठलभक्तीच्या बळावर कान्होपात्रेने शरीर आणि मन या दोन्ही पातळीवरचा संघर्ष विलक्षण धैर्याने प्रकट केला आहे. निष्ठा आणि निर्मळता या दोन्हींचा समावेश तिच्या अभंगात दिसतो. कारुण्य मात्र पदोपदी जाणवते. 'इतर संतांप्रमाणे कान्होपात्रेच्या अभंगवाणीतून परमेश्वराच्या साक्षात्काराच्या खुणा दिसत नसल्या तरी अंतःकरणातील उत्कट भक्तीने तिने परमेश्वराला आपल्या हृदयसंपुष्टात कायमचे कोंडून ठेवले होते आणि त्यात ती समाधानी होती, याचा प्रत्यय येतो.'[४५] यावरूनच कान्होपात्रेच्या पारमार्थिक सुखाची कल्पना येते.

'उपेक्षित असे आयुष्य वाट्याला येऊनही त्याला दूर सारून, भक्तीने त्याच्यावर विजय मिळवून प्रत्यक्ष परमेश्वराशी एकरूप होण्याचे भाग्य तिला प्राप्त झाले. सात्त्विक, उज्ज्वल व व्रतनिष्ठ असे तिचे व्यक्तिमत्त्व आहे. तेजस्वी असे जीवन समर्पण करून विठ्ठलाच्या दरबारात स्थान प्राप्त करणारी आणि आजही येणाऱ्या सर्व वारकऱ्यांना आपल्या अस्तित्वाने प्रेरणा देणारी कान्होपात्रा म्हणूनच जगावेगळी भक्त ठरते.'[४६]

❖❖❖

# १३. विरागिनी मठाधिपती : संत वेणाबाई

(इ.स. १६२७ — १६७८)

संत वेणाबाईंचा जन्म कोल्हापूर येथील गोपाजीपंत व राधिकाबाई या सात्त्विक दाम्पत्याच्या पोटी इ. स. १६२८ साली झाला. अतिशय लाडात त्यांचे बालपण गेले. खेळाची आवड, मधुर आवाज, सौंदर्य, निरागस भाव, लांबसडक केस, तल्लख बुद्धी आणि भक्तीची आवड यांमुळे त्यांना मिरजेच्या धनाढ्य देशपांड्यांकडून लग्नाची मागणी आली. लहान वयातच वेणाबाई सासरी नांदावयास गेल्या; पण अवघ्या चार-पाच महिन्यांतच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. विवाह म्हणजे काय, पती म्हणजे काय हे काहीही कळण्याआधीच त्यांना केशवपनाच्या दुःखाला सामोरे जावे लागले. आपल्या केसांचा आणि पतीच्या मुक्ततेचा काय संबंध? आपले लाल लुगडे, व्रतस्थ जीवन, उपासतापास, वैराग्य यांचा पतीच्या मृत्यूशी काय संबंध? असे सारेच प्रश्न त्यांच्यासमोर घोंगावत होते; पण समाजापुढे बोलण्याची हिंमत नव्हती. सर्वसामान्य जीवन आता आपल्या वाट्याला येणार नाही, याची कल्पना त्यांना आली. या दुःखाला तोंड देण्याच्या तयारीने त्यांनी परमार्थाकडे वाटचाल करण्यास सुरुवात केली.

वेणाबाईंच्या कुलोपाध्यायाने त्यांना 'एकनाथी



भागवत' वाचण्यास सांगितले होते. वेणाबाई त्या ग्रंथाचे पारायण मोठ्या भक्तिभावाने करीत असत. 'गुरु भेटे आपैसा' या वचनानुसार रामदासस्वामींची त्यांच्याशी अचानक भेट झाली. रामदासस्वामी वेणाबाईंकडे भिक्षा मागावयास आले असता त्यांनी दुधाची मागणी केली; पण दूध मारुतीच्या नैवेद्यासाठी ठेवले आहे, असे सांगून सासूबाईंनी दूध देण्यास नकार दिला. समर्थांना रिक्तहस्ताने पाठविल्यामुळे वेणाबाईंचे मन कितीतरी दिवस हळहळत होते. सुदैवाने समर्थ पुन्हा त्यांच्या घरी भिक्षेसाठी आले. 'जय जय रघुवीर समर्थ' अशी हाक वेणाबाईंना ऐकू आली, तेव्हा त्या तुळशीपाशी भागवत ग्रंथ वाचत बसल्या होत्या. समर्थांनी ते पाहिले आणि 'यातील तुला काही समजते का?' असे विचारले. वेणाबाईंनी उत्तर दिले, 'यातील आचरणासंबंधी मी अज्ञानी आहे, तरीही काही प्रश्न मला वारंवार पडतात, त्याची उत्तरे तुम्ही द्याल का?' स्वामींनी होकार दिल्यावर 'जीव म्हणजे काय? शिव म्हणजे काय? आत्मा, परमात्मा, अनात्मा म्हणजे काय? सृष्टीचा निर्माता कोण? संहारक कोण?' असे एका पाठोपाठ एक पंचवीस प्रश्न त्यांनी समर्थांना विचारून टाकले. प्रश्नांचा भडिमार ऐकून समर्थांसारख्या जाणकाराने त्यांची तीक्ष्ण बुद्धी, करारी, कणखर स्वभाव क्षणार्धात जाणला. अत्यंत समर्थपणे त्यांच्या सर्वच शंकांचे निरसन करून समर्थ निघून गेले; पण वेणाबाईंच्या विरक्त एकाकी

# १४. वीरशैव संत कवयित्री भावंडीबाई

(सुमारे इ.स. १८८८ —)

श्री. व्यावजीराव पाटील व सौ. मैनाबाई यांच्या पोटी इ.स. १८८८ मध्ये भावंडीबाई यांचा जन्म झाला. मातापिता कट्टर शिवभक्त असल्यामुळे वीरशैव संप्रदायाप्रमाणे जन्मतःच मुलीला लिंगधारण संस्कार करून बाराव्या दिवशी नामकरण करण्यात आले. गोविंद गंगाधन उर्फ अण्णाराय आणि माधवराव उर्फ बापू हे त्यांचे दोन्ही कनिष्ठ बंधू. घरातील वातावरण शिवभक्तिमय असे होते. त्यामुळे बालपणी लिंगार्चनाबरोबर 'भगवद्‌गीता', 'ज्ञानेश्वरी', 'भागवत' ग्रंथांचे वाचन घडले.

बायव्याबाई उर्फ भावंडीबाई यांचा विवाह अकराव्या वर्षी किणी येथील वसंतराव  पाटील यांच्याशी झाला. दुर्दैवाने लग्नानंतर अवघ्या पाचच वर्षांत त्यांना वैधव्य प्राप्त झाले. सासरी निराधार झालेल्या भावंडीबाईंना माहेरच्या लोकांनी आधार दिला. विद्याभ्यासाची सोय केली. भविष्यात भावंडीबाईंना जगण्याचा कोणतातरी मार्ग मिळावा या उद्देशाने भावंडीबाईंच्या पित्याने त्यांना गुरुदासांकडून अनुग्रह देवविला. भावंडीबाई तेव्हा तारुण्यावस्थेत होत्या. त्यांचे वय लक्षात घेऊन गुरूंनी त्यांना एक विलक्षण अट घातली की, तीन वर्ष परपुरुषाचे मुखावलोकन करू नये.



जन्म 'वेणा रामदासी' म्हणून झाला आहे. आता आमचा संप्रदाय हेच तिचे घर. राम हेच दैवत. तुमचा तिच्यावरील अधिकार आता संपला आहे.' घरच्यांना आपली चूक उमगली. वेणाबाईंना मात्र ही इष्टापत्ती वाटली. अवघ्या वीस वर्षांच्या वेणाबाई घर सोडून समर्थांच्या सान्निध्यात राहू लागल्या.

मठातील नेमून दिलेले कार्य पार पाडल्यावर वेणाबाई आपला वेळ सद्‌गुरूसेवेत, ग्रंथवाचन आणि काव्यरचनेत घालवू लागल्या. काहीशी वेणाबाईंसारखीच जीवनगाथा असलेल्या आक्कास्वामी यांच्याशी वेणाबाईंची मैत्री जमली. हाताने काम, मुखाने नाम आणि समर्थांचा गुणगौरव, लीलाकथन यांत वेणाबाईंचा जीव रमून गेला. त्यांना कल्याणस्वामी, उद्‌धवस्वामी, गिरिधरस्वामी, दिनकरस्वामींसारख्या परिवारातील साधक बंधूंचेही मार्गदर्शन लाभले. हळूहळू मठाचा कारभार, उपासनेची तयारी, प्रत्यक्ष उपासना अशी वेणाबाईंची प्रगती होऊ लागली. वेणाबाईंनी एखाद्या मठाचे महंतपद स्वीकारावे, अशी समर्थांची इच्छा होती. समर्थचरण सोडून कोठेही जाण्याचा आपल्या निश्चयाने त्यांनी या प्रस्तावाला नकार दिला.

वेणाबाईंची गुरुपरंपरा रामदास - वेणाबाई - बाइयाबाई - गिरिधर अशी सांगितली जाते. वेणाबाईंची ग्रंथरचना मर्यादित स्वरूपाची असली, तरी काव्याचे अनेक

विशेष त्यामध्ये सापडतात. त्यांनी 'सीतास्वयंवर' व 'रामायण' हे ग्रंथ लिहिले. 'पंचीकरण' हे निबंधवजा गद्यलेखन केले. 'रामगुह्यसंवाद' व 'कौल' अशी दोन छोटी आख्याने व काही पदे लिहिली. रूपके, अनन्यत्व, स्वभावोक्ती, श्लेष यांसारख्या अलंकारांनी त्यांनी आपली रचना नटवली आहे. लेखनात शुद्धअशुद्धाची तमा बाळगलेली दिसत नाही. बरेचसे लेखन प्रश्नोत्तर पद्धतीचे आहे.

रामदासी संप्रदायात 'सीतास्वयंवरा'ला विशेष मान आहे. 'रामायण' हा ग्रंथ वेणाबाईंनी सुंदरकांडापर्यंतच लिहिलेला दिसतो. उर्वरित कथाभाग फक्त आठ श्लोकांत सांगून त्यांनी ग्रंथ संपविला आहे. गिरिधरकृत 'समर्थप्रतापा'तील 'समर्थ देवें वेणाबाईसी वरदानें दिधली । सीतास्वयंवरे रामायणें वदविलीं ।' (स.प्र. ११.४४) या ओवीवरून 'वेणाबाईंनी एखादे रामायण रचलेले असावे व 'संकेत' रामायणाची पहिली सहा कांडे वेणाबाईकृत आणि शेवटचे गिरिधरकृत असावे, अशी कल्पना शं.श्री. देव यांची होतीच. अलीकडे या कल्पनेस थोडा आकार आला असून धुळे येथील समर्थवाग्देवतामंदिरातील बाडांक ७४५ हे 'वेणाबाईकृत रामायण' म्हणून प्रसिद्धही झाले आहे. या रामायणातील प्रत्येक शताच्या शेवटी वेणाबाईंचा नामनिर्देश असून त्याची पहिली पाचच कांडे या कवयित्रीने रचलेली दिसतात. कारण वेणाबाईंच्या या सुमारे दीड हजार श्लोकांच्या



रामायणात युद्ध आणि उत्तर ही दोन कांडे अजिबात नाहीत.'[४८] तरीही या रामायणाला रामदासी संप्रदायात मान दिला जातो.

'सीतास्वयंवर' व 'रामायण' हे ग्रंथ लिहिताना 'वाल्मिकींनी जे सांगितले तेच आपण लिहीत आहोत', असे वेणाबाई स्पष्ट करतात. ग्रंथातील वर्णनामागे भक्तीची भावना त्यांनी ठेवलेली आहे. त्यांचे अभंग वाचताना त्यांचे काव्यकर्तृत्व व त्यांचा पारमार्थिक अधिकार समजून येतो.

वेणाबाईंची परमार्थप्रवासातली प्रगती समर्थ पाहत होते. त्यांची ग्रंथरचना, त्यांचे कीर्तन प्रबोधन, श्रीगुरुपदी आरूढ झाल्यावरही त्यांचा होत असलेला विचारविस्तार यांमुळे समर्थांनी त्यांना मठाधिपती होण्याची आज्ञा केली. वेणाबाईंनी श्रीगुरुआज्ञा प्रमाण मानून मठाधिकाऱ्याची सूत्रे समर्थपणे सांभाळली.

वेणास्वामींच्या दृष्टीने त्यांचे पारमार्थिक कार्य पूर्णत्वास गेले होते. आता त्यांना कुडीचाही संग नकोसा वाटू लागला. शेवटी एक दिवस कीर्तन झाल्यावर त्या श्रीसमर्थचरणी वंदनासाठी वाकल्या. त्यांच्या चरणी त्यांनी आपला देह समर्पित केला. आजही श्रीक्षेत्र सज्जनगड येथे परमपूज्य वेणास्वामी यांची समाधी विराजमान आहे.

❖❖❖

उमटलेले दिसत नाहीत. त्यांची कविता एका ठरावीक साचातूनच जात राहते. असे का घडले असावे? याचे मूळ त्यांच्या चरित्राकडे पाहिल्यास लक्षात येईल.

वीरशैव समाजातील धार्मिक कुटुंबात झालेला जन्म, तारुण्यातच आलेले वैधव्य, त्यामुळे कुटुंबाकडून व समाजाकडून लादली गेलेली बंधने, परपुरुषासमोर जाण्याची मनाई, त्यामुळे जास्तीतजास्त समाजापासून दूर जाण्याचा प्रयत्न या सगळ्याच गोष्टींमुळे तत्कालीन परिस्थितीची झळ त्यांना बसलीच नाही. म्हणूनच भावंडीबाईंच्या अभंगात स्त्रियांशी निगडित व एकूणच चौकटीतल्या विषयांचा जास्त आढळ होतो.

घरातील कर्मठ वातावरण, समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोण आणि गुर्वाज्ञेने वर्ज्य केलेले पुरुषदर्शन यांचा परिणाम भावंडीबाईंच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला होता. त्यांची मानसिकता स्त्रियांविषयी कर्मठपणाची दिसून येते. पतिव्रता स्त्रियांना आपल्या पतिव्रता धर्माचे पालन करावयास सांगणारे अभंग, हे त्यांच्या अभंगवाणीचे वैशिष्ट्य आहे. वीरशैव कुलीन स्त्रियांनी सतिधर्म पाळण्याविषयी त्या आग्रही आहेत. पतिव्रता स्त्रीने परपुरुषाशी संभाषण करू नये, त्याचे मुखावलोकन करू नये असे सांगणाऱ्या भावंडीबाई परपरुषांत पिता, बंधू, काका, मामा, पुत्र यांचाही समावेश करतात.



भावंडीबाई मनाने संपूर्णतः परमार्थमार्गात इतक्या मग्न झाल्या होत्या की त्यांनी तीन वर्षेच काय, पुढील पूर्ण आयुष्यच आपले मुख कोणास दाखविले नाही व कोणत्याही परपुरुषाचे मुख अवलोकन केले नाही.

गुरुदासकृत काही अभंगवाणीद्वारे भावंडीबाईंनी आपल्या साधनेस सुरुवात केली. गुरुदासांनी त्यांना 'शिवगीते' व 'गुरुभक्तिसार' हे ग्रंथ प्रसाद म्हणून दिले. त्यांचे पठण, मनन, चिंतन यांत त्या आपले मन रमवू लागल्या.

अनुग्रहप्राप्तीनंतरच्या काळात दर शिवरात्रीला गुरुगृही जाण्याचा भावंडीबाईंचा नेम होता; परंतु एके वर्षी त्यांच्या नेमात खंड पाडणारा प्रसंग घडला. त्यांच्या वडीलबंधूंकडून साकोळच्या उत्सवात जाण्यास बंदी करण्यात आली. यात भावंडीबाईंना दुःख देणारी गोष्ट ही होती की, बंदी इतर कुठल्याही कारणाने न करता त्यांच्या स्त्री असण्यावरून संशयग्रस्त होऊन त्यांच्यावर अविश्वास दाखविला होता. खऱ्या गोष्टीची शहानिशा न करता भावंडीबाईंवर आरोप लावण्यात आल्यामुळे त्यांना आपल्या स्त्री असण्याची खंत वाटली.

असे अनेक विपरीत प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडले. या सर्वांतून पार होऊन शेवटी त्यांनी आत्मोन्नती गाठली. आपल्या सामान्य लौकिक जीवनाला असामान्यत्व बहाल केले.

'भावंडीबाईंचे सद्गुरू 'गुरुदास' हे शके १८०१ ते १८६८ (इ.स. १८७९ ते १९४६) या काळात साखोळ भागातील मठाचे पदाधिकारी होते. विरक्त परंपरेतील हा मठ चित्रदुर्ग मठ शाखेशी संबंधित होता.'[४९] भावंडीबाईंनी आपल्या एका अभंगात गुरुपरंपरा दिली आहे. ती अशी - शिवस्कंद कुमार - मृगेंद्र - करीबासव - संगणबसव - संगा (गुरुदास) - भावंडीबाई.

भावंडीबाईंची गुरुकल्पना दोन पातळ्यांवर व्यक्त होताना दिसते. लौकिक गुरूत त्या शिवाचे दर्शन घेतात; परंतु त्यांच्या दृष्टीने सदगुरू विशिष्ट व्यक्ती नाही तर ते स्थलकालातीत असलेले गुरुतत्त्व आहे. त्यामुळेच त्या 'गुरु ब्रह्म लिंग ब्रह्म । दोन्ही मंत्राक्षरी ओम ।। असा विश्वास व्यक्त करतात.

लौकिक गुरूसोबतच भावंडीबाईंचे व्यापक गुरुतत्वाबद्दलचे विचारही जाणून घेण्यासारखे आहेत. त्यांच्या मते शिवरूप हे अंतिम सत्य आहे; परंतु अज्ञानी जीवाला विषयांच्या फासामुळे त्याचे नेमके स्वरूप ज्ञात होत नाही. ते प्रकट करण्याचे काम सद्गुरू करतात.

भावंडीबाईंच्या अभंगरचनेचा काळ हा महाराष्ट्राच्या दृष्टीने नवजागरणाचा असला तरीही सर्वसामान्यांच्या धर्मसंकल्पना अजून जुन्याच होत्या. त्यामुळे या काळात विधवा झालेल्या स्त्रियांना मुख्यतः परमार्थाचाच



आधार घ्यावा लागत असे. त्यामुळेच अशा कुलीन स्त्रियांना फसविणारे, वासनापूर्तीसाठी त्यांना त्यांच्या धर्मापासून वंचित करणारे जंगम, जोगी, फकीर यांचा भावंडीबाई अतिशय तिरस्कार करतात. त्यांना 'पापिष्ट' असे संबोधून त्या सर्व स्त्रियांना त्यांच्यापासून सावध राहण्याचा सल्ला देतात.

भावंडीबाईंनी सुमारे सातशे अभंगरचना केल्या. आज त्यापैकी चारशे साठ अभंग उपलब्ध असून 'सद्गुरूची आरती', 'श्री दशकेंद्र महाराजांची प्रार्थना व स्तुती' या तीन अन्य रचना आहेत. भावंडीबाई या स्वतः संपादिका व प्रकाशिकाही असल्याने त्यांनी अडतीस प्रकारांत आपल्या अभंगांची विभागणी केली आहे. मंगलगुरू संप्रदाय, घराण्याची परंपरा, शिवरात्री, प्रार्थनापर, गुरूभेटी, दीक्षा समारंभ, मनोबोध, स्त्रियांना उपदेश, पतीसेवेचे माहात्म्य, विषयत्याग, वीरशैव आचारपद्धतीची माहिती, वैयक्तिक संदर्भ इत्यादी विषय त्यांत आलेले आहेत.

भावंडीबाई ज्या कालखंडात जन्माला आल्या त्या काळात समाजाच्या सर्व थरांत सुधारणांचे वारे वाहू लागलेले होते. आगरकर, टिळक, पं. नेहरू, म. गांधी, सुभाषचंद्र बोस, पंडिता रमाबाई, भगीनी निवेदिता, वि.दा. सावरकर इत्यादींच्या नेतृत्वाने समाजात खळबळीचे वातावरण निर्माण झालेले होते. तत्कालीन समाज असा अस्वस्थ, गंभीर; पण भावंडीबाईंच्या काव्यात त्याचे कसलेही पडसाद

नाहीत.

परमेश्वरापर्यंत पोचण्याचा मार्ग संतांच्या वाटेने जातो याची जाण भागूबाईंना आहे. म्हणूनच संतांचे संत असे ज्ञानेश्वर यांच्या चरणी त्या लीन होतात. वारकरी संप्रदायाच्या 'माऊली' असलेल्या ज्ञानदेवांचे गुणवर्णन करताना त्या म्हणतात,

'कृपेच्या सागरा । मायबाप ज्ञानेश्वरा ।।
देहभाव सोडून । माझे धरा ध्यान ।।
जेणे पाषाण हारिले । मुखे पशु वेद बोले ।।
भिंत चालविली । ऐसी कृपाळू माउली ।।
ऐसा कृपाळू भक्ताचा । मायबाप हा आमुचा ।।
विश्रांतीचा ठाव । भागु म्हणे ज्ञानदेव ।।'

'माऊली तुम्ही कृपेचा सागर आहात. तुम्ही दगडविटांची भिंत चालविलीत. मुक्या प्राण्याच्या मुखातून वेद वदविले. मग मजविषयी आपणांस चिंता का नाही? मलाही आपल्या पायाशी विश्रांती घेऊ द्यावी.' अशा गोड शब्दांत आळवणी केल्यावर दगडाच्याही देवाला पाझर फुटल्याशिवाय राहणार नाही.

भागूबाईंच्या उत्कट भक्तीमुळे त्यांच्या वाणीत एकप्रकारचा अधिकार आलेला दिसतो. आंतरिक भक्ती त्यांना हे सामर्थ्य मिळवून देते. भागूबाईंचे असे शब्द, असे विचार असल्यामुळे त्यांचे अभंग रसिकांच्या हृदयात घर



भावंडीबाईंनी नामस्मरणाचा निका मार्ग, जो मन्मथनाथांनी वीरशैवांना दिला होता, त्याचे तंतोतंत पालन केले. 'ॐ नमः शिवाय' या षडाक्षरी मंत्रावर त्यांचा विलक्षण विश्वास असल्याने 'मंत्राक्षरी गुरू मंत्राक्षरी लिंग । मंत्राक्षरी जग दृष्टीपुढे । मंत्राक्षरी सर्व ब्रम्हाण्ड रचना । मंत्राक्षरी नाना जग सर्व ।' असे त्या आपल्या अभंगात नमूद करतात.

भावंडीबाईंनी आपल्या अभंगरचनांनी आपल्या भावकवितेला एक नवा आयाम मिळवून दिला. 'रचनेची सहजस्फूर्तता, भावनांची उत्कटता, शल्ययोजनेतील लयबद्धता, भाववृत्तीची एककेंद्रितता आणि या सर्व विशेषांची अर्थपूर्ण संघटना करणारे संवेदनशून्य स्त्रीमन यांमुळे त्यांच्या अभंगरूपी कवितेतून समृद्ध भावकाव्याचे दर्शन घडते.

गुरूमाय यावे यावे । पाय मज दाखवावे ।।
मातेवीण तान्हे बाळ । करिताहे तळमळ ।।
तळमळ ह्याची शांत करा । वेगी गुरूनाथ ।।
मंत्रबोधाने जी तृप्ती । कोण करी त्रिजगती ।।
भावंडी ये काकुळती । भेट द्यावी दीनाप्रती ।।'[५०]

❖❖❖

# १५. निर्भय विठ्ठलभक्त : संत भागूबाई

संत भागूबाई या अस्पृश्य कुळात जन्मल्या. त्यांच्या स्थळकाळाविषयी काहीही माहिती उपलब्ध नसली तरी त्यांचे ईश्वरावरील प्रेम, श्रद्धा आणि निस्वार्थ भक्ती यांमुळे संतसाहित्यात त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केलेले आहे.

भागूबाईंची अभंगसंख्या मर्यादित असल्यामुळे इतर संतकवयित्रींच्या तुलनेत उपेक्षित राहिलेल्या दिसतात. त्यांचे अभंग थोडे असले तरी त्यात व्यक्त झालेल्या भावना इतक्या पराकोटीच्या आहेत की त्या श्रोत्यांच्या हृदयापर्यंत जाऊन पोचतात. त्यांच्या अभंगातला मुख्या बाणा म्हणजे, तुम्ही परमेश्वराला अंतर्मनातून साद घातली तर तो असेल तेथून धावत येतो. 'माझा भक्त मला इतक्या जिव्हाळ्याने बोलावितो आहे, मला त्याच्या मदतीसाठी जायलाच हवे' अशी कर्तव्याची भावना कुठेतरी परमेश्वराच्याही मनात असते. याच भावनेचे उदात्तीकरण भागूबाई आपल्या अभंगांत करतात.

'आलो तुझ्या दर्शनासी । भेट द्यावी बा आम्हासी ।।१।।
सर्व संत हो राउळी । मी रे एकटी तळमळी ।।धृ।।
करुणा ऐक विठाई । मज बाळा भेटी देई ।।२।।



देव आले हो बाहेरी । मज नेले खांद्यावरी ।।३।।
भागु म्हणे भेट झाली । माझी चिंता ही हरली ।।४।।'

आपल्या नितांत श्रद्धाभक्तीने परमेश्वरालाही असे त्यांच्या मदतीला यावे लागते. प्रत्यक्ष परमेश्वर बाहेर येऊन भक्ताला खांद्यावर घेऊन मंदिरात जातो. ही कल्पनाच अतिशय रम्य आणि सुंदर आहे. या साध्या सरळ शब्दांनी थेट हृदयातच प्रवेश करावा, असे सामर्थ्य या शब्दांमध्ये आहे.

भागूबाईंना हा विश्वास आहे की, एकदा परमेश्वरावर भरवसा ठेवला म्हणजे आपल्याला काळजी करावयाचे काहीच कारण उरत नाही. कारण तुमची काळजी प्रत्यक्ष परमेश्वरालाच करावी लागते. एवढा महान विठ्ठलच आपल्यामागे उभा आहे म्हटल्यावर भक्ताच्या मनातले सर्व भय दूर होणारच. भागूबाईंची परमेश्वरावरची ही श्रद्धा पाहून त्यांनी भक्तीचे सारे मापदंड पार केले असतील अशी खात्री वाटते.

'संत कवयित्रींनी आपल्या अभंगवाणीद्वारे जनसामान्यांच्या मनात भक्तीचा पाया दृढ केला. वाङ्मयीन दृष्टी दिली. अध्यात्माच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे प्रबोधन केले. उत्कट भक्ती हा संतकवयित्रींच्या वाङ्मयाचा मोठा गुणविशेष आहे. किंबहुना त्यांनी भावी काळाकरिता ठेवलेला तो एक अनमोल ठेवा आहे.'[५१] याला भागूबाईसुद्धा अपवाद

सा च्याराला अंत न लागे ।
कुंठित जाल्या वाचा ।।१।।
जाणिव टाकुनि नेणिव ग्रासुनि ।
येथेंचि लाग तयाचा ।।२।।
भास निराभास होऊनियां एक ।
हाचि भास जयाचा ।।३।।
गुरु हा विश्वंभर दास बयावर ।
घाली पदर कृपेचा ।।४।।'

असे म्हणून बाइयाबाई जाणिवेकडून नेणिवेकडे होणारा प्रवास, त्यात लागणारे विविध टप्पे व शेवटी गुरू विश्वंभराची कृपा असे वर्णन यात करतात. या पद्यात 'गुरू हा विश्वंभर' असे शब्द आहेत. यावरून बाइयाबाईंचे गुरू हे विश्वंभर नावाचे कोणी आहेत की त्यांनी समर्थांनाच विश्वंभर म्हटले आहे, याचे स्पष्टीकरण होत नाही; पण गिरिधरांच्या मतानुसार बाइयाबाईंचे गुरू रामदास नसून वेणाबाईंचा त्यांना अनुग्रह होता. बाइयाबाईंच्या साहित्यात मात्र त्यांचा उल्लेख कुठेच येत नाही. म्हणजेच बाइयाबाईंच्या इतर बऱ्याच गोष्टींप्रमाणे त्यांचे गुरू कोण, याविषयीचे अज्ञान कायम राहते.

'बाइयाबाईची कविता रामदासी थाटाची नसून तिची धाटणी अगदी स्वतंत्र आहे. तिच्या इतर पद्यांपेक्षा तिची पदेच फार बहारीची आहेत; व तिच्या मराठी पदांइतकीच



करतात. ज्या काळी शिक्षणाचा अभाव, स्त्रियांचे मर्यादित विश्व, ज्ञानार्जनाला असलेली बंदी अशा काळात फक्त हृदयातून येणारा मुक्त हुंकार शब्दबद्ध करणे भागूबाईंना कसे जमले हेही एक आश्चर्यच आहे.

एवढी बौद्धिक क्षमता अंगी असताना भागूबाई दुर्लक्षित राहिल्या याचा खेद वाटतो. त्यांचे अवीट गोडीचे अभंग आजच्या नव्या पिढीलाही मार्गदर्शक ठरतील असे आहेत. मोजकेच पण उत्कृष्ट लिखाण भागूबाईंच्या नावावर आहे. त्यांच्या जीवनचरित्राविषयी माहिती उपलब्ध नसली तरीही त्यांच्यावर काही सामाजिक अन्याय झाला असावा, अशा जाणिवा त्यांच्या अभंगातून जागोजागी प्रत्यायास येतात.

संतांच्या आणि संतकवयित्रींच्या साहित्यातून कितीतरी महान तत्त्वांची शिकवण अवघ्या मानवजातीला मिळाली. भागूबाईंसारख्या दर्जेदार संतकवयित्रींनी आपल्या अध्यात्मजाणिवांतून पुरुषांनाही मागे टाकले आणि स्त्री ही अध्यात्माच्या मार्गातील अडथळा नसून सहयात्री आहे हे सप्रमाण दाखवून दिले.

❖❖❖

# १६. संत बाइयाबाई उर्फ बयाबाई रामदासी

(सतरावे शतक)

संत बाइयाबाई उर्फ बयाबाई या समर्थ संप्रदायाच्या. त्यांच्याबद्दल फारशी माहिती रामदासी वाङ्मयात सापडत नाही. बाइयाबाई ह्या वेणाबाईंच्या शिष्या. बाइयाबाईंचे शिष्य 'समर्थप्रताप' कर्ते गिरिधर हे होते. त्यांच्या 'समर्थप्रताप'च्या ११ व्या समासात बाइयाबाईंबद्दल थोडीफार माहिती मिळते.

'मरिचि क्षेत्रीं वेणाबाई संस्थान बाइयाबाई ।<br>
तीन वर्षे तन्मयता समाधि देही ।<br>
देहीं देहभान आहे की नाही ।<br>
तीर्थ पयपान केले षण्मासे।।'<br>
('समर्थप्रताप' ११ वा समास)

अशा काही ओव्यांवरून असे दिसते की, मिरज येथील वेणाबाईंच्या मठाचे अधिकार बाइयाबाईंकडे असावेत. त्याचप्रमाणे त्यांनी तीन वर्षे समाधी अवस्थेत घालविली असून तेवढ्या अवधीत तीर्थ आणि दूध यांवर त्या जिवंत राहिल्या. कुमारिका असतानाच श्रीरामांची त्यांच्यावर कृपा झाली होती. त्या दहीभाताचे नैवेद्य दाखवीत



असता श्रीराम ताटात जेवू लागले. 'ताटात कोण जेवतंय?' असे त्यांनी विचारताच राम अदृश्य झाले. लग्न झाल्यावरही त्यांची रामोपासना चालूच होती. पुढे सासरी काही वाद होऊन त्या माहेरी परत आल्या.

एकदा रानात उदासवाण्या फिरत असताना बाइयाबाई वाट चुकल्या व काट्याकुट्यात जाऊन अडकल्या. तेव्हा श्रीराम तेथे प्रगट झाले. त्यांनी बाइयाबाईंना हात धरून बाहेर काढले. सगुणरूपाने दर्शन दिले. पीतांबर धारण केलेले, ज्यांच्या हाती धनुष्य असून डोक्यावर मुकुट, कानात कुंडले आणि गळ्यात सुगंधी पुष्पहार आहेत असे दोन पुरुष त्यांनी पाहिले. त्या दिव्य पुरुषांना अंतःकरणात साठवून बाइयाबाईंनी नमस्कार करताच त्यांना आशीर्वाद देऊन ते दिव्य पुरुष गुप्त झाले. अशाप्रकारे प्रत्यक्ष परमेश्वराचे दर्शन बाइयाबाईंना दोन वेळा झाले.

बाइयाबाईंच्या चरित्राची एवढीच माहिती 'समर्थप्रतापातून' मिळते. ती सगळी चमत्कारांनी भरलेली असली, तरीही आग असल्याशिवाय जसा धूर निघत नाही, तसेच मूळ बाइयाबाईंमध्ये काही अलौकिक गुण असल्याखेरीज या चमत्कारकथा प्रचलित होणार नाहीत.

बाइयाबाई आपल्या अभंगातून गुरूने आपल्यावर कसा मायेचा पदर धरला आहे हे सांगतात.

'हा गुरुराजचि । सिंधु आनंदाचा ।।धृ.।।

जन्मजात अंतर्भूत होती. हे आपले, ते दुसऱ्यांचे अशा वृत्तीला त्यांच्या जीवनात थाराच नव्हता. सर्वांच्या अंतःकरणात आत्मा वास करतो आहे, या तत्वावर त्यांची प्रामाणिक श्रद्धा होती. भूतमात्रांच्या बाबतीत त्या अतिशय दयाळू होत्या. नित्य गंगास्नान, भागवताचे श्रवण, हरिकीर्तन, साधूसंत आणि वैष्णव यांना यथाशक्ती भोजन देणे आणि अखंड परमेश्वराचे नामस्मरण हा त्यांचा नित्यक्रम होता. 'पुराणात श्रीकृष्णाचे आख्यान सुरू झाले किंवा अन्य कोणताही भक्तिप्रेमाचा प्रसंग सुरू झाला की तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागत. ही तिची प्रेमवृत्ती पाहून साधूसंतांनी तिचे नाव 'प्रेमाबाई' असे ठेवले.'[५३]

प्रेमाबाईंना पुराणश्रवणाचा अत्यंत नाद होता. काही झाले तरी त्या पुराण चुकवीत नसत. एके दिवशी प्रेमाबाई पुराणश्रवणास जाणार तोच काही साधूसंत त्यांच्या घरी आले. प्रवासातून आल्यामुळे ते चांगलेच भुकेले होते. प्रेमाबाईंच्या घरी अतिथी आल्यावर त्यांना भोजन देणे, हा त्यांचा नेमच होता; पण तिकडे त्यांची कीर्तनाला जाण्याची वेळही होत आली होती. त्यांनी विचार केला, आपण कीर्तनास गेलो, तर या साधूंचा अपमान होईल. ते उपाशीही राहतील. हे गृहस्थाधर्माच्या विरोधी कृत्य करणे त्यांना शक्य झाले नाही. कीर्तनास न जाता त्या साधूंच्या भोजनाच्या तयारीला लागल्या. इकडे हात पाकसिद्धीत गुंतलेले, पण



तिची उर्दू पदेही सुंदर आहेत. या पद्यांवरून तिचा पारमार्थिक अधिकारही प्रतीत येतो.'[५२]

बाइयाबाईंचे अजूनही वाङ्मय असण्याचा संभव आहे, कारण त्यांनी आपल्या ८५ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात इतकी थोडी कविता लिहिलेली असणे संभव नाही.

रामदासांवर बयाबाईंची अपार गुरुभक्ती होती, इतकी की पतिव्रतेची पतीवरही नसेल. त्यामुळे दुष्ट लोकांकडून त्यांच्याबद्दल वावड्या उठविल्या जात असत. बाइयाबाई गुरुभक्तीने पूर्णतः भारलेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यातील स्त्रीपुरुष लिंगभेद नाहीसा झाला होता. गुरुमाऊलीला आई, नवरा, बाप, परमेश्वर, कान्हा अशा सगळ्या रूपांत पाहून त्या प्रेम करीत असत. समर्थ रामदास आपल्या शिष्य-शिष्यिणींमध्ये अशाप्रकारचे चैतन्यापलीकडचे प्रेम निर्माण करीत असत, यावरून त्यांच्यामध्ये काही असामान्य गुण असले पाहिजे, अशी खात्री वाटते.

बाइयाबाईंनी पदे, पद्य यांसोबतच आर्याही केल्या आहेत. यावरून त्या काळात आर्या रचण्याची चाल होती, हे स्पष्ट होते. बाइयाबाईंची मराठी भाषा समर्थकालीन भाषेपेक्षा फारच अर्वाचीन दिसते. त्याचप्रमाणे त्यांचे उर्दू भाषेचे ज्ञान पाहून उत्तर हिंदुस्थानात त्यांचे वास्तव्य काही काळ तरी असावे, अशी शंका येते.

बाइयाबाईंच्या शिष्यपरिवारात गिरिधर हे मुख्य

होत. त्यांनी आपल्या तीन बंधूंसह त्रिंबक, यशवंत व बलभीम यांच्यासह बाइयाबाईंचा अनुग्रह घेतला होता. बाइयाबाईंबद्दल इतकीच माहिती उपलब्ध असली, तरी त्यांचे संतकवयित्री म्हणून असलेले महत्त्व अमान्य करता येणार नाही. त्यांची उपलब्ध पदेच त्याची साक्ष देतात.

❖❖❖



# १७. परम उत्कट भक्त : संत प्रेमाबाई

(सतरावे शतक)

संत प्रेमाबाई गोदावरी नदीच्या काठी एका छोट्याशा गावात राहत होत्या. त्यांच्या काळाबद्दलची माहिती उपलब्ध नाही. संत चरित्रकार महिपती यांनी 'भक्तलीलामृत' या ग्रंथात बेचाळीसाव्या अध्यायात या साध्वी कवयित्रीचे चरित्रवर्णन केले आहे, त्यावरून आणि त्यांच्या कवितेतील भाषेवरून त्यांचा काळ इ.स. १६५० नंतरचा असावा, असे वाटते. संत प्रेमाबाईंची फार थोडी रचना उपलब्ध आहे. त्यांचे नावही इतिहासात फारसे प्रसिद्ध नाही; पण त्यांच्या उपलब्ध पदांतील सर्वच पदे अतिशय प्रासादिक आणि काव्यरसाने परिपूर्ण आहेत. त्यामुळे संत कवयित्रीत त्यांची गणना करावयास हरकत नाही.

प्रेमाबाईंचे पती निवर्तलेले होते. प्रेमाबाईंची वृत्ती अतिशय सात्त्विक आणि भक्तिपरायण होती. त्यांना ज्ञान, वैराग्य, ध्यानधारणा, योग अशा भक्तीच्या विविध अवस्थांचे ज्ञान नव्हते; पण परमेश्वरचरणी निष्कपट भक्ती होती. आपल्या अढळ व निर्व्याज अशा भक्तीच्या प्रेमाने त्यांनी भगवंताला आपलेसे केले होते. परमार्थातील वरची पायरी म्हणजे आपपरभाव नष्ट होणे. ही त्यांच्या मनात

एका तीस वर्षीय बिजवराशी झालेला आहे. बहिणाबाईंचे हे वय म्हणजे न कळणारे वय होय; परंतु पुढेही या प्रकाराबद्दल त्या कुठलीही तक्रार करताना दिसत नाहीत किंवा त्यांच्या काव्यात नाराजीचा सूरही उमटलेला नाही. त्यांचे चरित्र त्यांच्या अभंगांतूनच प्रकटते. त्यांची नाराजी, खेद, तक्रार त्या त्यातून मांडू शकल्या असत्या; पण उलट त्या म्हणतात,

'द्वितीय समंधी वरुषा तिसाचा ।
नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ।।
बहेणि म्हणे त्यासी कन्यादान केले ।
आंदन दिधले सर्व काही ।।'
('संत बहिणाबाईचा गाथा', अभंग क्र. ६, ओ. ३, ४)

बहिणाबाईंच्या आणि त्यांच्या पतीच्या वयात एवढे मोठे अंतर असूनही त्यासंबंधाने नाखुषी न दाखवता, उलट पतीची त्या स्तुतीच करतात, हे उल्लेखनीय आहे. पुढे बहिणाबाईंच्या आईवडिलांकडून लग्नात घेतलेले ऋण फेडता न आल्याने कलह निर्माण होऊन त्यांनी गावाचा त्याग केला. बहिणाबाईंच्या भ्रतारासही बोलावून घेतले. अशाप्रकारे बहिणाबाईंचे कुटुंब परागंदा होऊन भटकंती करू लागले. येथेही बहिणाबाई मुकाटपणे आपल्या कुटुंबीयांच्या मागोमाग निघालेल्या दिसतात. गावोगाव भटकंती, भिक्षा मागून उदरनिर्वाह असे कष्टमय जीवन त्यांना व्यतीत करावे लागले. अशा विपरीत परिस्थितीतही गावोगाव होणारे देवदर्शन



मन मात्र कीर्तनाकडे ओढ घेत असलेले. अशा द्विधा मनःस्थितीत प्रेमाबाई अडकलेल्या. शेवटी त्यांनी आपल्या दहा वर्षांच्या मुलाला सांगितले की, 'पुराणास जाऊन तू सगळी कथा लक्ष देऊन ऐक व नंतर मला येऊन सांग.' असे सांगितल्यावर त्यांच्या मनाला थोडेसे समाधान लाभले. त्यांनी सर्व संतांना आदरासहित भोजन दिले. त्यांचे आशीर्वाद घेतले.

कीर्तन ऐकून मुलगा परत आला. प्रेमाबाई उत्कंठतेने कथा ऐकण्यासाठी मुलाजवळ बसल्या. सोबत साधूही कथा श्रवण करीत होते. तो मुलगा कीर्तनकारांच्याच भाषेत प्रेमाबाईंना कथा ऐकवू लागला.

'नंद यशोदेचे घरी ।श्रीकृष्ण अवतरला गोकुळी ।
यशोदा स्वये दही घुसळी । तो जवळ वनमाळी पातला ।।
यशोदेचे भाग्य परम । मायातीत परब्रह्म
तो सगुणरूपे पुरुषोत्तम । प्रेमे स्तनपान करीतसे ।।'

ही रसाळ कथा ऐकून प्रेमाबाईंचा कंठ दाटून आला. श्रीकृष्णाच्या बालमूर्तीला उखळाला बांधले असून तो रडत आहे, हे ऐकून त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. त्या मुलाला म्हणाल्या, 'मी घरचा सगळा व्याप तुझ्यावर सोपविते आणि सत्वर गोकुळात जाऊन बाळश्रीकृष्णाला बंधमुक्त करते.' हे शब्द उच्चारून प्रेमाबाईंचा चैतन्यरूप आत्मा त्यांच्या नश्वर देहाचा त्याग करून

चित्स्वरूपास जाऊन मिळाला. निष्प्राण पडलेल्या त्यांच्या कलेवरावर तुळशीपत्रे येऊन पडली. हा चमत्कार त्या साधूसंतांसमोरच घडल्यामुळे तेही अवाक होऊन पाहत राहिले. त्यांना प्रेमाबाईंच्या आध्यात्मिक उन्नतीची प्रचिती आली आणि त्यांनी प्रेमाबाईंचा जयजयकार केला.

प्रेमाबाईंच्या रचनांमध्ये असणारा साधेपणा आणि गोडवा यांमुळे त्यांची पदे सरळ काळजाला जाऊन भिडतात. उत्कट अशी त्यांची रचनाशैली, त्यांच्या तशाच उत्कट परमभक्त अशा व्यक्तित्वाची प्रचिती देतात. निर्व्याज मनामुळे मानवी स्वभावाचे सहज स्वाभाविक दर्शन त्यांच्या रचनांमधून व्यक्त होते. त्या मधुर असल्यामुळे सहज कोणालाही गुणगुणाव्याशा वाटतात, हे त्यांच्या काव्यसौंदर्याचेच प्रतीक आहे. वाचल्याबरोबर या रचनांच्या प्रेमात पडत असल्यामुळे कवयित्रीला दिलेले 'प्रेमाबाई' हे नावही अतिशय सार्थ वाटते.

'अतिशय मोजक्या पण भावपूर्ण रचना, भक्तीचे परमोत्कट रूप, कमालीची गेय शब्दकळा या वैशिष्ट्यांमुळे प्रेमाबाईने संत कवयित्रींच्या मांदियाळीत आपल्या नावाची मोहोर उमटवली आहे आणि भक्तिवाङ्मयाला समृद्ध करण्यात आपला खारीचा वाटा उचलला आहे.'[५४]

❖❖❖



# १८. अद्‌भुत गुरुभक्तीचा आविष्कार संत बहिणाबाई

(इ.स. १६२८ ते १७००)

बहिणाबाईंचे चरित्र म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसाच होय. बहिणाबाईंच्या चरित्रात त्यांच्या साधकावस्थेच्या मार्गात अडचणीच जास्त आलेल्या दिसतात. एक सामान्य मुलगी आपली भक्तीची उत्कट इच्छाही पूर्ण करू शकत नाही. त्याकरिता तिला आप्तांकडून, समाजाकडून फार मोठा विरोध सहन करावा लागतो. मात्र हा विरोध आणि त्रास सहन करीत, विरोधाचा सामना करीत अखेर आपल्या इच्छित स्थळी पोचणाऱ्या बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा विजय झालेला दिसतो.

बहिणाबाईंचा जन्म देवगाव या गावी शके १५५० म्हणजेच इ.स. १६२८ साली झाला. वाजसनेयी शाखेचे यजुर्वेदीय ब्राम्हण असलेल्या माता जानकी व पिता आऊजी कुळकर्णी यांच्या घरी हे कन्यारत्न जन्माला आले. बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर नजर टाकताना लक्षात येते की, त्या आलेल्या परिस्थितीला आपले नशीब मानून ती परिस्थिती निभावून नेणाऱ्या एक स्त्री आहेत. त्यांचा विवाह वयाच्या तिसऱ्या वर्षीच झाला. त्या काळातील चालीरीती पाहता हे बरोबर असेलही; परंतु त्यांचा विवाह

त्यांनी अभंगरूपात साठवून ठेवण्यास सुरुवात केली. हे अभंग म्हणजेच बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्वाने आकार देण्यास कारणीभूत ठरले. म्हणूनच 'रामदासांनंतर समर्थ संप्रदाय जसा निष्प्रभ झाला, तसे काही लगेच तुकारामांच्या पश्चात वारकरी संप्रदायाचे झाले नाही. तुकाराम भागवत ध र्माचे कळस झाले, तर त्यांची शिष्या बहिणाबाई कळसाच्या ध्वजेप्रमाणे फडकली.'[५५] एकूणच 'प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेची गगन झेलीयेले । ' असे म्हणणाऱ्या बहिणाबाईंचे चरित्र आधुनिक स्त्रियांनाही मार्गदर्शक आहे.

बहिणाबाईंच्या विषयवैविध्याला तोड नाही. अध्यात्म ही एक बाजू, त्यात अनेक विषय, समाजप्रबोधन ही दुसरी बाजू, त्यातही अनेक विषय, या दोन्हींतून साकार झालेले त्यांचे लांबलचक तत्त्वज्ञान आणि हे तत्त्वज्ञानाचे डोस श्रोतेरसिकांना पाजत असताना काठिण्याला थाराही नाही. स्त्रियांशी हितगूज असो किंवा ब्राम्हण्यावरील आघात, त्यांची वैविध्यपूर्ण लेखणी तितक्याच सक्षमतेने पुढे येते. गुरुगौरव करायचा असो किंवा चरित्रकथनाच्या ओघात येणारे व्यक्तिचित्रण, त्यात नावीन्य सातत्याने येते, हा संत बहिणाबाईंच्या लेखणीतील वैविध्याचा आविष्कार कौतुकास्पद आहे.

बहिणाबाईंनी मानवी जीवनाच्याच नव्हे तर सृष्टीच्या विविध कक्षांना स्पर्श केला आहे. मानवी जीवनातले



त्यांना जास्त सुखमय वाटत होते. यावरून त्यांच्या मनातला भक्तिभाव लहानपणापासूनच कसा मूळ धरून होता, हे दिसून येते. त्या म्हणतात,

'गंगा देखोनिया सिद्धेश्वर देव ।
तेथोनिया जीव निघो नेणे ।।
आवडीचा हेत पूर्वील संस्कार ।
श्रवणी आदर कीर्तनाचे ।।'

('संत बहिणाबाईचा गाथा', अभंग क्र. ८, ओ. १, २)

त्यांच्या अभंगात कुठेही कष्टांचे चित्रण दिसत नाही; उलट देवदर्शनाचे सुख जागोजागी प्रकट झाले आहे. शंभूमहादेवास पाहून त्यांच्या मनात येते की कोरान्नाचे कण आपण सहज कुठेही मिळवू शकू; पण हे असे देवदर्शन मिळवण्यासाठी पुण्यच पाठीशी असावे लागते. यावेळी बहिणाबाईंचे वय केवळ अकरा वर्षांचे होते. इतक्या बालवयात भक्ती रुजल्यामुळे पुढील आयुष्यात या भक्तीचे डेरेदार वृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येते.

बहिरंभटाकडे वास्तव्य करीत असताना बहिणाबाईंना रोज भागवत-पुराण ऐकायला मिळू लागले. विद्यार्थ्यांना शिकवले जाणारे वेदपाठ, त्यांच्यात चाललेली आत्मविद्येची चर्चा कानावर पडू लागल्यामुळे आधीच्याच परमार्थसन्मुख मनाला भागवत, वेदपाठाचे संस्कार अधिकच आध्यात्मिकतेकडे बहिणाबाईंना ओढताना दिसतात.

बहिणाबाईंचा पती अत्यंत तापट व संशयी स्वभावाचा होता. बहिणाबाईंनी केवळ भगवत्प्रेमासाठी एवढ्या लहान वयात इतका छळ सोसला, हे ऐकून परम भागवत प्रल्हादाची आठवण कोणास होणार नाही? आपल्या ईशप्रेमात अंतराय आणणाऱ्या भ्रताराचा त्याग करण्याची कल्पनाही बहिणाबाईंच्या मनात आली नाही व आली असती, तरी त्या कालात तसे करणे तिला शक्यही नव्हते. शिवाय अकरा वर्षांच्या मुलीच्या मनात असले विचार कुठून येणार? पती हाच परमेश्वर आणि तो करील ते प्रमाण, ही तत्कालीन स्त्रियांची समजूत. त्यामुळे त्यांची भगवद्भक्ती आणखीनच तेजस्वी झाली असावी, असे वाटते.

बहिणाबाईंचा सद्‌गुरुविषयीचा कळवळा अभंगांतून वारंवार व्यक्त झाला आहे. 'मत्स्य जैसा जळावाचुनि चरपुडी । तैसी ते आवडी तुकोबाची ।।' असे सद्‌गुरुविषयी म्हणून एखाद्या गोष्टीचा ध्यास घेण्याची वृत्ती त्या दर्शवितात.

बहिणाबाई आध्यात्मिक वृत्तीने भारलेल्या, वत्सल, प्रेमळ, त्यागी, सहनशील, मर्यादाशील, शांत अशा गुणांनी परिपूर्ण दिसतात. त्यांच्या स्वभावाची खरी ओळख तेव्हाच होते, जेव्हा त्यांचा पती 'परमार्थ किंवा मी' असे पर्याय त्यांच्यासमोर ठेवतो. एकीकडे सद्‌गुरूची लागलेली ओढ, जळाशिवाय तडफडणाऱ्या माशासारखे होत असलेले मन तर दुसरीकडे असा भ्रतार, ज्याने आतापर्यंत तिचा



छळ केला आहे, तिच्या परमार्थमार्गात जो धोंडा बनून उभा आहे, अशी द्विधा मनःस्थिती होते. तेव्हा बहिणाबाई पतीचा तिरस्कार न करता, पतीशिवाय पत्नीच्या आयुष्याला अर्थ नाही, प्राणाशिवाय देहास जशी शोभा नाही, अशी स्वतःच्या आयुष्यातील पतीची जागा अधोरेखित करीत त्या सद्‌गुरूचा ध्यास सोडण्याचा निर्णय घेतात. त्यांची ही कृती कोणत्याही पतिव्रतेसमोर आदर्श ठेवणारी आहे.

बहिणाबाईंची श्रद्धा होती की, आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना हा आपल्या जीवनाचाच एक आविभाज्य भाग आहे. तो कसा चुकेल, याची त्यांना भ्रांत नव्हती. उलट असे प्रसंग वारंवार यावेत म्हणजे आपली भक्ती दृढ होईल असा त्या विचार करीत. बहिणाबाईंची परीक्षा घेऊन कदाचित ईश्वराला दया आली असावी; म्हणून त्यांच्या पतीला शारीरिक दाह निर्माण करून विचार करण्यास भाग पाडले. ब्राम्हणाचे रूप घेऊन त्याला दृष्टांत दिला आणि त्याचे मन वळविण्यात यशस्वी झाले. बहिणाबाईंची तपःसाधना इतकी दृढ होती, की त्यांच्या मदतीसाठी ईश्वरालाही कार्यरत व्हावे लागले.

बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला तो तुकारामांचे दर्शन होऊन त्यांचा वरदहस्त लाभल्यावर. त्यांचे अंतरंग जणू सुखाने डोलू लागले. शिवाय त्यांना झालेली कवित्वाची स्फूर्ती. यामुळे आपले अनुभव

काव्यात परखडता येते आणि ग्राम्य अभिव्यक्तीतही एक प्रकारच्या सजीवतेचे सामर्थ्य दिसून येते. असे हे बहिणाबाईंचे काव्य कितीतरी सौंदर्यात्मक पैलूंनी सजलेले आहे.

❖❖❖



आणि पारमार्थिक जीवनातले कितीतरी अनुभव बहिणाबाईंच्या कवितांचे विषय झाले आहेत. लौकिक अनुभव, अलौकिक अनुभव अशा दोन्ही प्रकारांत बहिणाबाईंची कविता आशयबद्ध झालेली आहे. लौकिक अनुभवात मानवी जीवनातील सत्यानुभूतीचा शोध घेण्याचा प्रयत्न बहिणाबाईंनी केला आहे, तर अलौकिक अनुभवात पारमार्थिक सत्यानुभूतीचा शोध घेतला आहे.

अलंकारसौंदर्याचा विचार करताना त्यात अनुप्रास व यमक हे शब्दालंकार आणि उपमा, दृष्टांत, रूपक, मालारूपक, अपन्हुती, विरोधाभास, प्रश्नालंकार, चैतन्यारोप, अनन्वय, काव्यमय अत्युक्ती, व्यतिरेक, श्लेष, पर्यायोक्त, निदर्शना, व्याजस्तुती, एकावली, अर्थान्तरन्यास, परिकर ह्या बहिणाबाईंच्या काव्यात आढळतात. करुणरस, वत्सलरस, शृंगाररस, अद्‌भुतरस, हास्यरस, भयानकरस, बीभत्सरस, वीररस, रौद्ररस, भक्तिरस आणि शांतरस हे रस बहिणाबाईंच्या काव्यात बहरलेले आहेत. काव्यसौंदर्याचा शोध घेताना बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी, संत बहिणाबाईंच्या अभंगांतील विचारसौंदर्य यांना तोड नाही हेच खरे. बहिणाबाईंच्या काव्याची सौंदर्यात्मक वैशिष्ट्ये म्हणजे केवळ रसालंकारांपुरते मर्यादित राहून चालत नाही. त्यांचे विचार, त्यांचे रचनाकौशल्य, भाषेवरील प्रभुत्व या सगळ्यांमुळेही त्यांच्या काव्याला सौंदर्याचा उच्चाविष्कार साधता आला

आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

त्यांच्या काव्यातून प्रगटणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व विलोभनीय असे आहे. वेदनिष्ठा, विठ्ठलभक्ती, गुरुभक्ती, अद्वैत तत्त्वज्ञान, संतनिष्ठा यांप्रमाणेच पतिनिष्ठा हे पैलू त्यांच्या काव्यात आढळतात. त्यांचे काव्य प्रासादिक व तत्त्वज्ञानसंपन्न आहे. विवेक, चिंतनशीलता, ज्ञाननिष्ठा, व्युत्पन्नता, या गुणांप्रमाणेच बहुश्रुतता हाही गुण त्यांच्या काव्यात आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्रिविध तापांनी पोळल्यामुळे निर्माण झालेले नसून ते जन्मजात आहे. स्वतःला स्त्रीजन्म प्राप्त झाला, म्हणून त्यांनी उद्वेग व्यक्त केला आहे, तरी स्त्रीजीवनाच्या मर्यादा, लक्ष्मणरेषा सांभाळून आत्मज्ञानसंपन्न होण्याचा पुरुषार्थ त्यांनी करून दाखविला आहे. प्रपंचात पतीने छळ केला; पण त्याविरुद्ध 'ब्र'ही उच्चारला नाही. सामाजिक जीवनात दांभिक मंबाजीने छळ केला तरी कोठे पुरुषनिंदा केली नाही. बहिणाबाईंचे काव्य सोज्ज्वळ आणि पवित्र आहे. विचारसरणी प्रगल्भ आहे. परिणामी त्यांची कविता वेगळ्या पातळीवर पोचली आहे.

बहिणाबाईंना गुरुकृपा झाली ती चमत्कारी हकीकत त्यांच्या भाविकतेची साक्ष पटविते. त्यांनी केलेला गुरुगौरव असामान्य आहे. गुरुभक्तीचा इतका सुंदर आविष्कार बहिणाबाईंशिवाय इतर स्त्रीसंतांच्या रचनांत आढळत नाही. वज्रसूची अनुवादातील त्यांचे भाष्य परखड



आणि वैचारिक क्रांतिकारकत्व प्रगट करते. त्यांची चिंतनशीलता प्रगल्भ होती.

प्रत्येक संतांची प्रतिमासृष्टी काहीना काही विशेष धारण करून अवतीर्ण होत असते. बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी बरीच विस्तृत, व्यापक आणि अर्थगर्भ असल्याचे जाणवते. त्यांच्या प्रतिमाविश्वात सूर्यापासून क्षुद्र कीटकांपर्यंत, ब्रम्हापासून देहापर्यंत, निराकारापासून साकारापर्यंत अशा सर्व तऱ्हेच्या प्रतिमांचा संचार आहे. त्यांनी विविध विषयांवरच्या प्रतिमा योजल्या असल्या तरी कधी कधी त्यात पुनरावृत्तीही होते. तरीदेखील बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी निश्चितच अर्थसंपृक्त, वैविध्यपूर्ण आहे.

संस्कृत व मराठी वाङ्मयात रूढ असलेले अनेक काव्यसंकेत बहिणाबाईंच्या अभंगांत आढळतात. त्यांच्या काव्यात अलौकिक प्रतिभाविलास जाणवतो, तो प्रशंसनीय आहे. बहिणाबाईंनी कित्येकदा अनावधानाने तर कित्येकदा जाणूनबुजून ग्राम्य अभिव्यक्ती आपल्या काव्यात केली आहे. कर्मठांचे ढोंग, अभक्त ब्राम्हण, क्षुद्र देवीदेवतांचे पूजन यावर प्रहार करताना त्यांनी शिव्यांचाही वापर केला आहे. समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा विनाश व्हावा, समाजाची रजतमगुणांकडून सत्वगुणाकडे प्रवृत्ती वळावी, ही त्यांची आस आहे. त्यांच्या काव्यातील उदात्त ध्येयापुढे ग्राम्यता विरून जाते. त्यांच्या लोकोद्धाराच्या विलक्षण कळवळ्यातून

मानाने त्यांनी लिहिलेले ओव्या, अभंग प्रगल्भ आहेत. परमार्थ, नाममहिमा, सद्गुरू प्रसाद, उपदेश, उच्चध्यानावस्था अशा विविध विषयांवरचे हे अभंग आहेत. सोंसूबाईंचे मनाला उपदेश करणारे 'मनाचे अभंग' हे श्रवणमधुर, लक्षवेधक व प्रासादिक आहेत. संत अंडाळ, मीराबाई, अक्कमहादेवी यांचे मधुराभक्तीने परिपूर्ण असे अभंग आहेत. योगमार्गाचा पाया तरिगोंडा वेंकम्बा यांनी आपल्या ग्रंथांतून घातला. सोयराबाई, निर्मळा यांचे उपेक्षितांचे दुःख मांडणारे अभंग आहेत. कान्होपात्रा, भावंडीबाई, सखूबाई, प्रेमाबाई यांचे भक्तीने परिपूर्ण असे अभंग आहेत. ह्या सर्व रचना मराठी सारस्वताला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात. वेगवेगळ्या संत स्त्रियांनी रचलेले 'धवळे', 'ताटीचे अभंग', 'अभंग मनाचे', 'तिरुप्पावै', 'नच्चियार तिरुमोळा', 'योगांगत्रिविधी', 'राजयोगसारम', 'वेंकटाचल महात्म्य', 'नरसिंह शतकम', 'सीतास्वयंवर', 'रामायण', 'पंचीकरण' हे ग्रंथ, अभंग, पदे, आर्या एकूणच वाङ्मयसागरातले बहुमोल रत्नं आहेत.

'या सर्वच संत कवयित्रींनी मनोनिग्रहाने संकटांवर मात केली. स्त्रीजन्म मिळाला, म्हणून नमल्या नाहीत, हतबल झाल्या नाहीत. विलक्षण आत्मविश्वासाने पुरुषांच्या बरोबरीने त्या वावरल्या. त्यांच्यासारखीच साधना त्यांनी केली. आपआपल्या पंथात आध्यात्मिक अधिकारांचे



# समारोप

समाजातील दुर्बळ घटक म्हणविल्या गेलेल्या स्त्रियांचे सबलत्व सिद्ध करण्यासाठी संत स्त्रियांचे चरित्र निश्चितच उपयोगी ठरेल. वेगवेगळ्या जातीपंथांतून, आर्थिक, सामाजिक, परिस्थितीतून आलेल्या, वेगवेगळ्या काळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या स्त्रिया उपेक्षितपणाचे समान दुःख मनावर वागविताना दिसतात. त्यांच्या इच्छा, आकांक्षा यांना समाजात, कुटुंबात कुठल्याच काळात मान नाही, हे प्रकर्षाने जाणवते. तरीही आपल्या भावभावनांना वाङ्मयातून व्यक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न म्हणजे अस्तित्व जपण्याचा लढा आहे.

संत भावंडीबाई, संत कान्होपात्रा, संत महदंबा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत तरिगोंडा वेंकम्बा, संत सखू, संत मीराबाई, संत वेणाबाई, संत सोंसूबाई, संत अंडाळ, संत अक्कमहादेवी, संत भागूबाई, संत प्रेमाबाई, संत बाइयाबाई उर्फ बयाबाई या सर्व स्त्रीसंतांच्या चरित्राकडे बारकाईने पाहिल्यास त्यांच्यात बरेचसे साम्य सापडते. पहिली गोष्ट म्हणजे यांतील बहुतांश स्त्रियांच्या जीवनात संसाराला विशेष स्थान नाही. भावंडीबाई, महदंबा, सोंसूबाई, मीराबाई, वेणाबाई, प्रेमाबाई या विधवा होत्या. मुक्ताबाईंनी वैराग्य स्वीकारले होते. अंडाळांनी व अक्कमहादेवींनी अनुक्रमे रंगनाथ व मल्लिकार्जुनाला वरलेले

होते. कान्होपात्रा वेश्येच्या पोटी जन्माला आलेल्या होत्या. बाइयाबाई विवाहानंतर काही वर्षातच माहेरी परत आलेल्या होत्या. तरिगोंडा वेंकम्बा यांची कौटुंबिक माहिती उपलब्ध नाही. जनाबाईंनी नामदेवांच्या संसारात स्वतःला वाहून घेतले असले तरी त्यांचा स्वतःचा असा संसार नव्हता. अशाप्रकारे मुलेबाळे, प्रपंच या सगळ्यांपासून या स्त्रिया दूर होत्या. अपवाद फक्त सोयराबाई आणि निर्मळा यांचा. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती ही की या दोघींचे पूर्ण कुटुंबच अध्यात्माने प्रेरित झालेले. त्यामुळे त्यांच्या भक्तीत संसार अडसर न ठरता उलट त्यांना घरून प्रोत्साहनच मिळाले.

वारकरी, वीरशैव, महानुभाव, आळवार, वैष्णव, समर्थ अशा विविध संप्रदायांतून आलेल्या या संत स्त्रियांचे तत्त्वज्ञान एकाच मुशीतून तयार झालेले आहे. सगळ्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया म्हणजे हृदयापासून केलेली भक्ती होय. त्यांनी कोणी जप, तप, यज्ञ, उपास असे मार्ग अवलंबिले नाहीत, तर आपल्या अपूर्व भक्तीने देवाला आपलेसे केले. महदंबेने गुरूप्रती भक्ती दर्शविली, अंडाळांनी रंगनाथांना पती मानले. मीराबाईंसाठी श्रीकृष्णच सर्वस्व होते. भावंडीबाईंनी शिवरूपाला अंतिम सत्य मानले. अध्यात्माच्या क्षेत्रात ज्ञानमार्ग, योगमार्ग आणि भक्तिमार्ग यांची सांगड घालण्याचे काम मुक्ताईने केले. वेणाबाईंनी समर्थांचा मार्ग अनुसरला. भागूबाईंनी ईश्वराला अंतर्मनातून



साद घातली. प्रेमाबाईंनी निस्सीम प्रेम व साधेपणातून देवाला जिंकले. बाइयाबाईंनी गुरूमध्ये बाप, भाऊ, नवरा अशा सर्वांना पाहिले. जनाबाई, सखूबाई, सोयराबाई, निर्मळाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांना विठ्ठलाशिवाय दुसरे जग नव्हते. अशारीतीने जवळ जवळ सर्व संत स्त्रियांचे तत्वज्ञान भक्तिरसांत न्हाऊन निघालेले आहे.

सर्व संत स्त्रियांचे वाङ्मयीन योगदान पाहिल्यास या कवयित्री फार मोठ्या पंडिता किंवा विदुषी होत्या असे म्हणता येणार नाही; पण त्यांची बहुश्रुतता हीच त्यांना वाङ्मयक्षेत्रात यश मिळवून देते. भक्तिभावाने, चिंतनपरतेमुळे व अंतर्मुख वृत्तीमुळे त्यांच्या उद्गारात आर्तता व उत्कटता प्रगट झाली आहे. 'आधीच स्त्रीहृदय हे कविहृदय असते. सत्कवीला आवश्यक असलेली भावनेची उत्कटता, भावनेतील सहजता व भाषेतील प्रासादपरता हे स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष गुण होत. त्यातून या सर्व कवयित्री परमेश्वराच्या श्रेष्ठ उपासिका होत्या. त्यामुळे त्यांची वाणी मनोरम व प्रेमपूर्ण उतरली आहे.'[५६]

महदंबेने गायलेले 'धवळे' म्हणजे अप्रत्यक्षपणे महदंबेची आत्मकथा आणि प्रत्यक्षपणे 'ईश्वरकथा' म्हणून आकाराला येते. मुक्ताबाईंचा साहित्यिक संसार अत्यल्प आहे; पण त्याचा आवाका अध्यात्माच्या दृष्टीने मोठा आहे. मुक्ताबाईंचे एकूण ४२ अभंग आहेत. वयाच्या

१०. वा.ना. देशपांडे (संपा.), महदंबा : आद्य मराठी कवयित्री, द्वितीयावृत्ती, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९५६, पृ. २१.
११. प्रमोद श्री. डोरले, 'आद्य मराठी कवयित्री : महदंबा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १४.
१२. तत्रैव.
१३. अ.ना. देशपांडे, 'श्रीचक्रधरोक्त परमार्ग आणि त्याची साहित्यसाधना, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, द्वितीयावृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. ४३५.
१४. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, उनि., पृ. ४०.
१५. चंद्रहास जोशी, स्त्रीसंतचरित्रमाला, मुक्ताबाई, प्रथमावृत्ती, गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. १२.
१६. मुक्ता केणेकर, 'विद्युल्लतेची कडी : मुक्ताबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १७.
१७. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, उनि., पृ. ६७.
१८. मुक्ता केणेकर, 'विद्युल्लतेची कडी : मुक्ताबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १८.
१९. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, उनि., पृ. ८१.
२०. मुक्ता केणेकर, 'विद्युल्लतेची कडी : मुक्ताबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १९.
२१. हे. वि. इनामदार, 'गोमंतकीय स्त्री संत : सोंसुबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. २२.
२२. रुक्मिणीबाई केंकरे उर्फ सोंसूबाई, अभंग १०९, अभंग–कुसुमांजली, प्रथमावृत्ती, श्री.ग.ना. कापडी, कुडचडे, गोवा, वर्ष अनुपलब्ध, पृ. १५३.



आणि मानाचे स्थान त्यांनी मिळविले. आपले आत्मिक अनुभव काव्यातून सांगितले. आपल्या अभंगांतून भोवतालच्या समाजाचे कधी दोषदर्शन घडविले, तर कधी मार्गदर्शन केले, उपदेश केला. त्या काळातल्या पुरुष संतांपेक्षा त्या कुठेच उण्या पडल्या नाहीत. या सगळ्या स्त्रियांना त्यांच्या भोवतीच्या पुरुषांनी आत्मोद्धारासाठी मदत केली, मार्ग दाखविला. या स्त्रियांनी 'स्व'ला शोधले. आधुनिक स्त्रीलिखित साहित्यामागे संतकवयित्रींचा हा प्रगल्भ वारसा आहे.'[५७]

या संतकवयित्रींमधील भागवत धर्माची 'फडकती ध्वजा' असे संबोधणाऱ्या बहिणाबाई ज्ञाननिष्ठा, वैराग्यशीलता, चौकसबुद्धी, वारकरी संप्रदाय सन्मुखता आणि काव्यनिर्मिती अशा विविध गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरतात.

बहिणाबाईंनी संसार व परमार्थ या दोन्ही गोष्टींना सारखे महत्त्व दिले. अनुग्रहप्राप्तीसाठीचा अंतर्गत संघर्ष आणि कौटुंबिक, सामाजिक स्तरावरचा बाह्य संघर्ष अशा दुहेरी जाचातून बहिणाबाईंची भक्ती तावूनसुलाखून निघालेली आहे. द्विविध पातळीवर संघर्ष करीत आपल्या असाधारण भक्तीने त्यांनी पाषाणहृदयी नवऱ्याला जिंकून घेतले.

बहिणाबाई ह्या ब्राम्हणकुळात जन्मलेल्या. त्यांनी क्षुद्र गुरू केल्यामुळे त्यांना अनेक त्रासांना तोंड द्यावे लागले. मंबाजीसारख्या ब्राम्हणांनीसुद्धा त्यांचा निषेध केला. गुरुनिवडीच्या स्वातंत्र्यावर अशी गदा येऊनही त्या तुकारामांप्रती

ठाम राहिल्या. त्यांनी लिहिलेले सव्वासातशेच्या आसपास अभंग म्हणजे आनंदप्राप्तीचे निधान आहेत. ज्ञान, भक्ती, समर्पण, सौंदर्य, सरलता अशा अनेक गुणांनी परिपूर्ण असे हे अभंग आहेत. अतिशय अवघड अशा 'वज्रसूचिकोपनिषद' या ग्रंथाचे परिशीलन करून त्यांनी काही अभंगरचना केली आहे. जे योग्य वाटले, ते निर्भयपणे सांगण्याचे आत्मबळ त्यांना त्यांच्या ज्ञाननिष्ठेतून लाभले होते. सामाजिक अन्याय, विषमता यासंदर्भात तीनशे वर्षांपूर्वी एका स्त्रीने मांडलेला विचार म्हणूनही त्याचे मोल फार आहे.

एकंदरीत इतर सर्व संत स्त्रियांना संसारातील प्रेम, मोह, माया यांचे बंधन नव्हते. त्यांनी परमार्थालाच आपले जीवितध्येय मानले होते. समाजाने त्यांच्याकडे पाठ फिरविल्यामुळे त्यांनी अध्यात्माला आपलेसे केले. असे असले तरी परमार्थाकडे वळल्यावर त्यांच्या एकूण कार्यकर्तृत्वात विशेष बदल झाल्यासारखे वाटतात. अगोदर सर्वसामान्य असणाऱ्या या स्त्रिया भक्तीच्या तेजाने असामान्यत्वाला पोचलेल्या दिसतात. या सर्वच स्त्रीसंतांना प्राप्त असलेल्या अलौकिक सामर्थ्याच्या बळावर त्यांनी वाङ्मयाला दिलेली देण अनन्यसाधारण आहे. समाजोन्नतीच्या त्यांच्या प्रयत्नांनी त्या त्या काळात समाजाला एक दिशा दिली, हे विसरून चालणार नाही.

❖❖❖



# संदर्भ

१. देविदास पोटे, 'संपादकीय', मुक्त आनंदघन, संपा. देविदास पोटे, मुंबई, वर्ष पहिले, अंक पहिला, संत कवयित्री विशेषांक, वार्षिक २००४, पृ. ६.

२. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, प्रथमावृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. २०३.

३. लीला गोविलकर, 'स्त्रीसंतसाहित्यातील स्त्रीभावनांचे हुंकार', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ७९.

४. आर्द्रा, 'स्त्रीसंतांची केवळ दखल', (प्र.न. जोशीलिखित 'बहिणा' कादंबरीचे समीक्षण), लोकरंग पुरवणी, दै. लोकसत्ता, नागपूर, दि. १२–१०–२००३, पृ. ३.

५. विद्याधर ताठे, 'सामाजिक योगदान', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ७४.

६. इंदुमती शेवडे, 'संत कवयित्री आणि स्त्री–मुक्ती चळवळ', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १५.

७. प्रमोद श्री. डोरले, 'आद्य मराठी कवयित्री : महदंबा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. १२.

८. प्रमोद गारोडे, 'महाराष्ट्रातील स्त्री संतांचे विचारधन', अक्षरवैदर्भी, संपा. सुभाष सावरकर, अमरावती, वर्ष १९, अंक १२, मार्च २००३, पृ. ११.

९. ल.रा. नसिराबादकर, 'महानुभावांची साहित्यसरिता', प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, सहावी सुधारित आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७, पृ. २५.

५४. निरंजन होळकर, 'परम उत्कट भक्त संत प्रेमाबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ७४.

५५. शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, तृतीय खंड, १६५० ते १८४०, सहावी आवृत्ती, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९८७, पृ. १६०

५६. हे.वि. इनामदार, 'संत कवयित्री साहित्य : राष्ट्रीय संपदा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ४९.

५७. कल्याणी हर्डीकर, 'पूर्वपीठिका : संतसाहित्य', स्त्रीसाहित्याचा मागोवा, खंड १, उनि., पृ. १२.

❖❖❖



२३. हे.वि. इनामदार, 'गोमंतकीय स्त्री संत : सोंसूबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. २३.

२४. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, खंड पहिला, द्वितीयावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९८२, पृ. ५३०.

२५. प्र.ग. लाळे, 'आळवार वैष्णवी संत अंडाळ', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. २७.

२६. पं. महादेवशास्त्री जोशी, 'अंडाळ', भारतीय संस्कृतिकोश, खंड पहिला, उनि., पृ. ५३०.

२७. दा.बा. भिंगारकर, 'संत जनाबाईची कामगिरी', संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी, प्रथमावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. २८०.

२८. हेमंत इनामदार, ल.रा. नसिराबादकर (संपा.), प्रस्तावना : 'चंद्रभागेतीरी', महाद्वाराच्या पायरीशी, प्रथमावृत्ती, हेमंत प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ. २८.

२९. श्रीकृष्ण श्यामसुंदर, 'नामयाची दासी : संत जनाबाई', आत्मोन्नती पुरवणी, दै. देशोन्नती, अकोला, दि. १७–३–२००५, पृ. ३.

३०. आरती कुलकर्णी, 'नामयाची जनी झाली कैवल्याची धनी', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ३१.

३१. यशवंत पाठक, 'श्रेष्ठ कवयित्री', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ३२.

३२. वर्षा देवकर, 'स्त्रीसंतांची पारमार्थिक वाटचाल', ज्ञानेश्वर त्रैमासिक, संपा. प्र.द. पुराणिक, पुणे, वर्ष ३७, अंक १ (फेब्रुवारी

२००५, स्त्रीसंत विशेषांक), पृ. ६८.

३३. पं. महादेवशास्त्री जोशी, 'अक्कमहादेवी', भारतीय संस्कृतिकोश, खंड पहिला, उनि., पृ. ४८.

३४. तत्रैव.

३५. अंजली पांडे, 'कृष्णभक्त मीरा', आत्मोन्नती पुरवणी, दै. देशोन्नती, अकोला, दि. १३–१–२००५, पृ. १.

३६. रजनी पतकी, 'मधुराभक्तीचा उत्कट आविष्कार : मीराबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ३४.

३७. अंजली पांडे, 'कृष्णभक्त मीरा', आत्मोन्नती पुरवणी, दै. देशोन्नती, दि. १३–१–२००५, उनि.

३८. रामभाऊ जोशी, 'सोशिकतेची मूर्ती : संत सखू', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ४२.

३९. वर्षा देवकर, 'स्त्रीसंतांची पारमार्थिक वाटचाल', ज्ञानेश्वर त्रैमासिक, स्त्रीसंत विशेषांक, वर्ष ३७, अंक १, उनि., पृ. ७०.

४०. हे. वि. इनामदार, 'संत कवयित्री साहित्य : राष्ट्रीय संपदा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ४९.

४१. स्मिता जोशी, 'चोखोबांच्या शिष्या : संत निर्मळा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ५३.

४२. अजित आचार्य, 'योगसाधनांची प्रणेती : तरिगोंडा वेंकम्बा', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ४६.

४३. ल.रा. नसिराबादकर, 'नाथपूर्वकालीन साहित्य', प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, उनि., पृ. ९१.



४४. कल्याणी हर्डीकर, 'पूर्वपीठिका : संतसाहित्य', स्त्रीसाहित्याचा मागोवा, खंड १, संपा. डॉ. मंदा खांडगे आणि इतर, प्रथमावृत्ती, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२, पृ. १०.

४५. र.रा. गोसावी, वीणा गोसावी, 'परमेश्वराला दिलेली आर्त हाक', ज्ञानेश्वर त्रैमासिक, वर्ष ३७, अंक १, (स्त्रीसंत विशेषांक), उनि., पृ. ३१.

४६. सुप्रिया अत्रे, 'परम विठ्ठलभक्त : संत कान्होपात्रा, मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ५७.

४७. ज.र. आजगावकर, 'वेणूबाई रामदासी', प्राचीन मराठी संतकवी, खंड २, प्रथमावृत्ती, कोंकण मराठी डायलेक्ट्स रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई, १९७७, पृ. १२४.

४८. शं.गो. तुळपुळे, 'वेणाबाई', 'पुरवणी', (वि.ल. भावेकृत) महाराष्ट्र सारस्वत, खंड २, सहावी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ. ८८२.

४९. सुनीता तांबे, 'वीरशैव संत कवयित्री: भावंडीबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ६०.

५०. तत्रैव, पृ. ६२.

५१. रत्नाताई चौधरी, 'निर्भय विठ्ठलभक्त : संत भागूबाई', मुक्त आनंदघन, वर्ष पहिले, अंक पहिला, उनि., पृ. ७२.

५२. ज.र. आजगावकर, 'बाइयाबाई उर्फ बयाबाई रामदासी', प्राचीन मराठी संतकवी, खंड २, उनि., पृ. १८२.

५३. महादेवशास्त्री जोशी (संपा.), 'प्रेमाबाई', भारतीय संस्कृतिकोश, खंड पाचवा, उनि., पृ. ७६९.